
# क्षितिज


२०१६-२०१७

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

## मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय

अहमदनगर






नवी दिल्ली येथील 'सिटीझन इंडिग्रेशन पीस इन्स्टिट्युट' या संस्थेच्यावतीने तामिळनाडूचे राज्यपाल डॉ. भीष्म नारायण सिंह यांच्या हस्ते ''भारत ज्योती सन्मान व गोल्ड मेडल फॉर एक्सलन्स, २०१७'' हा पुरस्कार स्विकारताना मा. आमदार नरेंद्रजी घुले पाटील साहेब




नवीन इमारतीच्या कलशपूजन प्रसंगी मा. सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, सौ. तेजस्विनी घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के.के.पवार, प्रा. डॉ. आर.आर.सासवडे, प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, इंजिनियर मोटे साहेब व प्राध्यापकवृंद

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

# क्षितिज २०१६-२०१७

वार्षिक नियतकालिक : अंक पहिला

## • संपादक मंडळ •

- संपादक -

प्राचार्य डॉ. टी.एम. वराट

- कार्यकारी संपादक -

प्रा.डॉ. किसन रंगनाथ पिसाळ

- सह-संपादक -

प्रा. श्रीराम विलास मरकड




- संपादक मंडळ -

प्रा. अमोल यु. डोंगरे
प्रा. अविनाश के. आहेर
प्रा. पुरुषोत्तम अे. फटांगरे
प्रा. कालिंदा आर. ढोबे
प्रा. रूपाली बी. तांबे

## वार्षिक नियतकालिक २०१६-१७

## दि प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८ फॉर्म नं.४ प्रमाणे आवश्यक माहिती


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर |
| प्रकाशन काल | : | वार्षिक |
| राष्ट्रीयत्त्व | : | भारतीय |
| प्रकाशक व संपादक | : | प्राचार्य डॉ. टी. एम. वराट |
| राष्ट्रीयत्त्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर |
| कार्यकारी संपादक | : | प्रा. डॉ. किसन रंगनाथ पिसाळ |
| राष्ट्रीयत्त्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर |
| मालकी | : | मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर |
| मुद्रक | : | निट प्रिंटस्, एम.आय.डी.सी. अहमदनगर |

मी, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट जाहिर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

हा अंक खाजगी वितरणासाठी आहे. त्यातील मते व्यक्तिगत व ललित लेखन स्वतंत्र आहे, असे गृहीत धरले आहे.

# श्रद्धेय



## लोकनेते स्वर्गीय मारूतरावजी घुले पाटील साहेब

(१९३०-२००२)

संस्थापक, अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने

संस्थापक, चेअरमन : श्री. ज्ञानेश्वर सह.सा.का.लि. ज्ञानेश्वर नगर

संस्थापक, अध्यक्ष : श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर


# मार्गदर्शक व प्रेरणास्थान



## मा. आमदार श्री. नरेंद्रजी घुले पाटील

अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने
ता. शेवगांव, जि. अहमदनगर

# कृतिशील नेतृत्त्व



## मा.आमदार श्री. चंद्रशेखरजी घुले पाटील

सचिव : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने
ता. शेवगांव, जि. अहमदनगर

# आशास्थान



## मा.श्री. डॉ. क्षितिजभैय्या नरेंद्रजी घुले पाटील

तज्ज्ञ संचालक - श्री. ज्ञानेश्वर सह. सा. का. लि. भेंडा
सभापती - पंचायत समिती शेवगाव, जि. अ.नगर



## मा. श्री. के. के. पवार

प्रशासकीय अधिकारी, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने




प्राचार्य,

## डॉ. टी.एम. वराट

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अ.नगर

# गुणवंत-यशवंत



**प्रा.डॉ. किसन पिसाळ**
सेट परीक्षा उत्तीर्ण व पीएच.डी.



**प्रा. राजेश नेटके**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. सोपान दहातोंडे**
नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा.अमोल डोंगरे**
नेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. गिताबाई सोनवणे**
नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. अमोल दरंदले**
नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. सुभाष काळे**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. किशोर ताके**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**श्री. प्रविण दळवी**
वरिष्ठ लिपिक, एम.ए. उत्तीर्ण



**सागर केवट**
बॉक्सिंग २०१६
विभागीय पातळीवर निवड



**प्राजक्ता लांडे**
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक



**अभिजीत मंचरे**
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

## विश्वस्त मंडळ



| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा. ॲड. सतिष किसनराव पाटील | उपाध्यक्ष |
| ३. | मा. आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सचिव |
| ४. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | खजिनदार |
| ५. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | विश्वस्त |
| ६. | मा.श्री. सुभेदार बाबुराव शेख | विश्वस्त |
| ७. | मा.श्री. शब्बीर छन्नुभाई शेख | विश्वस्त |
| ८. | मा.श्री. मच्छिंद्र बारकू काळे | विश्वस्त |
| ९. | मा.श्री. सुधाकर गबाजी कांबळे | विश्वस्त |

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

## विश्वस्त मंडळ

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा. ॲड. सतिष किसनराव पाटील | उपाध्यक्ष |
| ३. | मा. आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सचिव |
| ४. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | खजिनदार |
| ५. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | विश्वस्त |
| ६. | मा.श्री. सुभेदार बाबुराव शेख | विश्वस्त |
| ७. | मा.श्री. शब्बीर छन्नुभाई शेख | विश्वस्त |
| ८. | मा.श्री. मच्छिंद्र बारकू काळे | विश्वस्त |
| ९. | मा.श्री. सुधाकर गबाजी कांबळे | विश्वस्त |

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

## महाविद्यालयीन स्थानिक व्यवस्थापन समिती

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सदस्य |
| ३. | मा. ॲड. सतिष किसनराव पाटील | सदस्य |
| ४. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | सदस्य |
| ५. | मा.श्री. कुंडलिक कडू पवार | सदस्य |
| ६. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | सदस्य |
| ७. | मा.डॉ. तुकाराम माणिकराव वराट | सदस्य सचिव |
| ८. | प्रा. अविनाश कारभारी आहेर | शिक्षक प्रतिनिधी |
| ९. | प्रा. पुरुषोत्तम आप्पासाहेब फटांगरे | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | श्री. प्रविण विष्णु दळवी | शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी |

# प्राचार्यांचे मनोगत...

प्रिय विद्यार्थी मित्रहो,

आपल्या महाविद्यालयाचा 'क्षितिज' हा पहिलाच वार्षिक अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. सहकारमहर्षि लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी विविध घटकातील मुलामुलींना शिक्षणाची सुविधा प्राप्त व्हावी, त्यांचा बौद्धिक व आर्थिक विकास व्हावा, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी आणि शिक्षण हे समाज परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे, शिक्षणामुळे व्यक्ती, कुटुंब व समाज यांचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकास होतो, या विचाराने प्रेरित होऊन ६ जून १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना दहिगांव ने ता. शेवगांव जि. अ.नगर या ठिकाणी केली. त्यांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर होऊन आज संस्थेची ३ प्राथमिक, ९ माध्यमिक, ५ कनिष्ठ विद्यालये, २ वरिष्ठ महाविद्यालये आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु आहेत.

जागतिकीकरण आणि स्पर्धेच्या युगात आजचा विद्यार्थी २१ व्या शतकातील आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे. त्यांच्या अंगी मूल्य संस्कार रूजवले जावेत व तो शिस्तप्रिय जबाबदार नागरिक झाला पाहिजे; या भूमिकेतून आणि पारंपरिक शिक्षणाचा वसा कायम ठेवून या संस्थेने अहमदनगर या ऐतिहासिक शहराच्या एम.आय.डी.सी. परिसरामध्ये मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना जून २००९ साली केली.

समाजातील दुर्बल, वंचित, गोरगरीब, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलामुलींना उच्च शिक्षणाची सोय करून त्यांना स्वावलंबी, सक्षम, सबल करणे हे या महाविद्यालयाचे उद्दिष्टय आणि ध्येय आहे. या उद्दिष्टांना व विचाराला अनुसरुन संस्थेचे अध्यक्ष मा.आ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालय यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. आ. नरेंद्र घुले पाटील साहेब यांनी गेली ३० वर्षे शैक्षणिक, सामाजिक सहकार व राजकीय क्षेत्रात केलेल्या अविरत व उल्लेखनीय कार्याबद्दल नवी दिल्ली येथील 'सिटीझन इंटिग्रेशन पीस इन्टिट्यूट' या संस्थेच्यावतीने तामिळनाडूचे राज्यपाल डॉ. भीष्मनारायण सिंह यांच्या शुभहस्ते ''भारत ज्योती सन्मान व गोल्ड मेडल फॉर एक्सलन्स'' हा पुरस्कार २०१७ मध्ये प्रदान करण्यात आला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाचे नवीन इमारतीत स्थलांतर झाले असून अध्ययन-अध्यापन ही प्रक्रिया अधिक सक्षम व प्रभावीपणे होण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज वर्ग खोल्या, समृद्ध ग्रंथालय, प्रशस्त क्रीडांगण आणि प्रशिक्षित व अनुभवी अध्यापक वर्ग यामुळे शैक्षणिक दर्जा उंचावून विद्यार्थ्यांची जडणघडण होण्यास मदत होत आहे. याबरोबरच शिक्षणपूरक अनेक उपक्रमांचे महाविद्यालयात आयोजन केले जाते. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास योजना, विशेष मार्गदर्शन योजना, विविध विषयांच्या अभ्यासू व तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, शैक्षणिक सहली, क्रीडा स्पर्धा इत्यादींचे आयोजन केले जाते. विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केलेले आहे.

शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील अध्ययन, अध्यापन, संशोधन, विस्तारकार्य, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमपूरक, सांस्कृतिक, साहित्य, कला व क्रीडा या बाबतच्या उपक्रमांचे प्रतिबिंब महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात दिसून येत असते. महाविद्यालयातील विविध विभाग, समित्या, मंडळे यांच्या विविध उपक्रमातून महाविद्यालयास गुणवत्ता प्राप्त होते. त्या सर्वांची नोंद वार्षिक अंकात घेतली जाते. महाविद्यालयातील गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेले यश, प्राध्यापकांनी वाढविलेली गुणवत्ता, त्यांचे संशोधन, लेखन यांचीही नोंद विभाग अहवालाच्या माध्यमातून वार्षिक अंकात ठेवली जाते. विद्यार्थ्यांच्या साहित्यिकदृष्ट्या सुप्त गुणांना, विचारांना, भावनांना व्यक्त करण्यासाठी त्यांच्याकडून लेख, कविता, कथा व इतर साहित्य वार्षिक अंकात प्रकाशित केले जाते. या दृष्टिकोनातूनच महाविद्यालय या शैक्षणिक वर्षापासून 'क्षितिज' हा वार्षिक अंक प्रकाशित करीत आहे. विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास व त्यांच्या ज्ञानाची क्षितिजे अधिक समृद्ध, संपन्न व व्यापक करण्यासाठी महाविद्यालय कटीबद्ध आहे.

प्राचार्य व संपादक
**डॉ. टी. एम. वराट**

# संपादकीय...

महाविद्यालयातील युवा शक्तीच्या सद्सद्विवेक बुद्धीतून साकारलेला 'क्षितिज' नियतकालिकाचा हा पहिलाच अंक आपल्या हाती सुपूर्त करताना मला मनापासून आनंद होत आहे.

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी. एम. वराट यांच्या मौलिक प्रेरणादायी मार्गदर्शनातून हा अंक साकार झाला आहे.

इतिहास प्रसिद्ध अहमदनगर जिल्ह्याला साहित्याचा खूप मोठा वारसा परंपरेने मिळाला आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'भावार्थदिपिका' या ग्रंथाची निर्मिती करून अवघ्या विश्वाला ज्ञानमार्ग दाखविला आहे. ते ज्ञानेश्वरीच्या चवथ्या अध्यायात लिहितात, ''जैसे बिंब तरी बचके एवढे । परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडे । शब्दाची व्याप्ति तेणे पाडे । अनुभवावी ।। संत ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटल्याप्रमाणे शब्दांचा अर्थ, त्याची व्याप्ती, महात्म्य, जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना आकलन होऊन अपेक्षित परिवर्तन घडून यावे हा 'क्षितिज' अंकाचा हेतू आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांच्या ठायी कला, गुण, अभिरूची, अभिव्यक्ती, संस्कारशिल समृद्ध असे व्यक्तिमत्त्व निर्माण होण्यासाठी तसेच त्यांची सामाजिक जाणीव जागृत होण्यासाठी त्यांच्याकडून साहित्य लेखन मागविण्यात आले. त्यास विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यातील निवडक लेखांनाच या अंकात समाविष्ट करण्यात आले आहे.

क्षितिज या अंकातील गद्य व पद्य विभागातील विषयाकडे लक्ष वेधल्यास विद्यार्थ्यांच्या मनाचा ठाव घेता येतो. गद्य विभागात महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण, युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद, सहकारमहर्षि मारूतरावजी घुले पाटील, संत तुकडोजी महाराज, शेतकरी आत्महत्या, आंतरराष्ट्रीय दहशतवाद, नोटाबंदी अशा अनेक महत्त्वाच्या विषयावर लेखन करून विचार व्यक्त केले आहेत. तसेच पद्य विभागामध्ये आई वडील, बदलतं आयुष्य, मी मराठी, प्रेम, शिक्षणाचा बाजार, शेतकरी अशा वैविध्यपूर्ण विषयावर कविता लेखन करून आपल्या भावना व विचारांना वाट मोकळी करून दिली आहे. याशिवाय काही शिक्षकांनीही या अंकात लेखाच्याद्वारे आपले विचार व्यक्त केले आहे. त्यामुळे या अंकाची मौलिकता वाढलेली दिसून येते.

या अंकामध्ये साहित्य विश्वाबरोबरच महाविद्यालयातील शैक्षणिक व शिक्षणपूरक उपक्रमांचा परिचय करून दिला आहे. त्याद्वारे महाविद्यालयाची ओळख आपणांस होऊन महाविद्यालयाशी आपले ऋणानुबंध अधिक दृढ होतील असे वाटते.

या पहिल्याच वार्षिक अंकाच्या निर्मितीसाठी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांनी प्रेरणा व प्रोत्साहन दिले. तसेच नेहमी आम्हांला सहकार्य करणारे युवा नेते डॉ. क्षितिज घुले पाटील यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरले. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त मंडळ, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री. के. के. पवार, संस्थेचे समन्वयक प्रा. डॉ. आर.आर. सासवडे, महाविद्यालय व्यवस्थापन समिती या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्याबद्दल सर्वांचे मी आभार मानतो.

संपादक मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांनी अंकाच्या निर्मितीपासूनच योग्य मार्गदर्शन करून प्रेरणा दिली. त्यामुळे अंकाच्या कामात सुलभता व नीटनेटकेपणा आला. तसेच संपादक मंडळातील सदस्य प्रा. एस.व्ही. मरकड, प्रा. ए. के. आहेर, प्रा. ए.यू. डोंगरे, प्रा. पी.ए. फटांगरे, प्रा. के. आर. ढोबे, प्रा. रूपाली तांबे यांनी अंक निर्मितीसाठी विशेष सहकार्य केले. याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवकवृंद या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभल्यामुळे हा अंक वेळेत पूर्ण होऊ शकला. तसेच या अंकासाठी साहित्य देणारे विद्यार्थी, विद्यार्थीनी या सर्वांसह ज्ञात अज्ञात ज्यांचे ज्यांचे अंकासाठी सहकार्य लाभले; त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. त्याचप्रमाणे या अंकाची सजावट व मुद्रण करणारे निट प्रिंटस् व त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारीवृंद यांच्या ऋणात राहणेच मला अधिक आवडेल.

**प्रा. डॉ. के. आर. पिसाळ**
कार्यकारी संपादक, क्षितिज

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

प्राचार्य, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवकवृंद

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

## कला शाखा

- **मराठी विभाग**

१. प्रा. डॉ. के. आर. पिसाळ
२. प्रा. आर. ए. नेटके

- **हिंदी विभाग**

१. प्रा. एस. बी. दहातोंडे
२. प्रा. एस. ए. काळे

- **इंग्रजी विभाग**

१. प्रा. पी. ए. फटांगरे

- **इतिहास विभाग**

१. प्रा. एस. व्ही. मरकड
२. प्रा. श्रीमती जी. एस. सोनवणे

- **अर्थशास्त्र विभाग**

१. प्रा. श्रीमती पाऊलबुद्धे अे.आर.
२. प्रा. एन.एन. झिंज

- **भूगोल विभाग**

१. प्रा. ए.एस. दरंदले

- **राज्यशास्त्र विभाग**

१. प्रा. व्ही. आर. तिवारी

## वाणिज्य शाखा

**वाणिज्य विभाग**

१. प्रा. श्रीमती के. आर. ढोबे
२. प्रा. के. बी. ताके
३. प्रा. श्रीमती पी. एस. साबळे

# विज्ञान शाखा

- **रसायनशास्त्र विभाग**

१. प्रा. अे.यू. डोंगरे
२. प्रा. श्रीमती ए.एन. सांगळे
३. प्रा. एस. एस. शेलार
४. प्रा. श्रीमती बी. एस. पवळे

- **भौतिकशास्त्र विभाग**

१. प्रा. एस. बी. डोईफोडे

- **वनस्पतीशास्त्र विभाग**

१. प्रा. बी. बी. माताडे

- **प्राणीशास्त्र विभाग**

१. प्रा. के. डी. जगताप

- **गणित विभाग**

१) प्रा. एफ. बी. खान २) प्रा. श्रीमती एन.एफ. खान

- **संगणकशास्त्र विभाग**

१) प्रा. श्रीमती एस.एम. भिसे २) प्रा. श्रीमती आर.बी. तांबे ३) प्रा. आर.ए. साठे

# प्रशासकीय सेवकवृंद

१. श्री. पी. व्ही. दळवी
२. श्री. एस. ए. भोर
३. श्री. एन. बी. शिरसाट
४. श्रीमती एस. आर. वाळके
५. श्रीमती व्ही. एन. उंडे

# भावपूर्ण श्रध्दांजली

या शैक्षणिक वर्षात स्वातंत्र्य सेनानी, थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, साहित्यिक, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती तसेच आपल्या संस्थेचे हितचिंतक दिवंगत झाले, त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

# गुणवंत विद्यार्थी



**जाधव सुवर्णा**
प्रथम वर्ष, कला (प्रथम)



**मरकड अश्विनी**
द्वितीय वर्ष, कला (प्रथम)




**मैड घनश्याम**
तृतीय वर्ष, कला (प्रथम)



**केंगार स्वाती**
प्रथम वर्ष, वाणिज्य (प्रथम)



**वाघ स्वाती**
द्वितीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)



**राजळे गणेश**
तृतीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)




**वाकचौरे वैशाली**
प्रथम वर्ष, विज्ञान (प्रथम)



**गव्हाणे योगिता**
द्वितीय वर्ष, विज्ञान (प्रथम)



**वाळुंज रंजना**
तृतीय वर्ष, विज्ञान (प्रथम)



**भोर निकीता**
प्रथम वर्ष, संगणक शास्त्र (प्रथम)



**पालवे सोनी**
द्वितीय वर्ष, संगणक शास्त्र (प्रथम)



**केदार ऐश्वर्या**
तृतीय वर्ष, संगणक शास्त्र (प्रथम)

# मान्यवरांच्या भेटी




महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रयोगशाळा परीक्षण समितीने भेट दिली असता अ.नगर महाविद्यालय अ.नगर गणित विभाग प्रमुख प्रा.डॉ. ए.इ.लगड यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी. एम. वराट समवेत प्रा.डॉ.व्ही. एस. काळे व प्रा.एस.एन.पोकळे




सा. फु. पुणे विद्यापिठ, महाविद्यालय स्थानिक चौकशी समितीचे अध्यक्ष डॉ. जाधव अे.डी. यांचे स्वागत सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट तसेच समिती सदस्य डॉ. फसले एम.के., डॉ. मोटे डी.के., प्रा. डॉ. आर.आर सासवडे, प्रा. महेश शेजूळ व प्रा. डॉ. के.आर पिसाळ



महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रयोगशाळा परीक्षण समितीने भेट दिली असता मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. व्ही.एस.काळे समवेत प्रा.डॉ. अे.ई.लगड, प्रा.डॉ.एस.एम.पोकळे, डॉ. ए.डी.काकडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट




सावित्रीबाई फुले विद्यापीठ स्थानिक चौकशी समितीने माहविद्यालयास भेट दिली असता मार्गदर्शन करताना डॉ. जाधव अे.डी. समिती सदस्य डॉ. मोटे डी. के., डॉ. फसले एम.के., प्रा. डॉ. आर. आर. सासवडे व प्रा. महेश शेजूळ



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्थानिक चौकशी समितीने महाविद्यालयास भेट दिली असता कागदपत्रांची तपासणी करताना प्राचार्य डॉ. फसले एम.के., डॉ. मोटे डी.के., प्रा. डॉ आर.आर. सासवडे, प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व प्रा. महेश शेजुळ



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रयोगशाळा समितीने नवीन इमारतीस भेट दिली असता नवीन इमारतीची माहिती देताना प्राचार्य डॉ.टी.एम.वराट

# विशेष व्याख्यानमाला



इतिहास विभाग आयोजित शिवजयंती उत्सवानिमित्त प्रमुख पाहुणे प्रा. सचिन मोरे (इतिहास विभाग अ.नगर कॉलेज) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समवेत प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व इतिहास विभाग प्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड





हिंदी विभाग द्वारा आयोजित हिंदी दिन समारोह के अवसरपर कार्यक्रम का प्रास्ताविक करते हुए प्रा. एस.बी.काळे, मंचपर उपस्थित कार्यक्रम अध्यक्ष प्राचार्य डॉ.टी.एम.वराट, प्रमुख अतिथी प्रा.डॉ. अशोक गायकवाड (हिंदी विभाग, न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर), हिंदी विभाग अध्यक्ष प्रा.एस.बी.दहातोंडे



मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मराठी साहित्याचे महत्त्व सांगताना पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य व जिजामाता महाविद्यालय भेंडे येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिरीष लांडगे समवेत प्राचार्य डॉ. टी. एम. वराट




एन.एस.एस. व इतिहास विभाग आयोजित महात्मा गांधी जयंती कार्यक्रम प्रसंगी विचार व्यक्त करताना प्रा. विलास नाबदे (अ.नगर महाविद्यालय अ.नगर), प्राचार्य डॉ. टी.एम.वराट व इतिहास विभाग प्रमुख एस. व्ही. मरकड



राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. ए.एस. शाळीग्राम (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर)



विशेष मार्गदर्शन योजनेअंतर्गत अर्थशास्त्र विभागतर्फे मार्गदर्शन करताना मा.सौ. डॉ. व्ही.डी. पाटील समवेत प्राचार्य डॉ. टी.एम. वराट, प्रा.ए. आर. पाऊलबुध्दे व प्रा. एन. एन. झिंज

# विद्यार्थी विकास मंडळ



विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी प्रतिमापूजन करताना पी.एस.आय.पूजा बक्षी, प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा. दहातोंडे एस.बी. व मान्यवर




विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे उद्घाटन करताना श्रीमती निलीमा बंडूले जाधव (मा. जनसंपर्क अधिकारी म.न.पा. अ.नगर) समवेत महाविद्याचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व मान्यवर



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत वृक्षारोपण सप्ताह निमित्त नूतन इमारतीच्या प्रांगणात वृक्षारोपण करताना प्रा. डॉ. टी. एम. वराट, प्राध्यापकवृंद व कमवा व शिका योजनेचे विद्यार्थी




विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास शिबीर उद्घाटन प्रसंगी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना श्रीमती निलीमा बंडूले-जाधव समवेत प्राचार्य टी.एम.वराट व मराठी विभाग प्रमुख डॉ.के.आर. पिसाळ



विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान कार्यशाळा अंतर्गत विद्यार्थिंनींना स्वयंसरंक्षणाची तंत्रे यांचा परिचय देताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी लाटे व भूतकर



विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान प्रसंगी पी.एस.आय. पूजा बक्षी, प्राचार्य. टी. एम. वराट व महाविद्यालयातील विद्यार्थीनी व प्राध्यापकवृंद

# राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर इसळक या शिबिराचे उद्घाटन करताना प्रशासकीय अधिकारी श्री. के.के.पवार, सरपंच श्री. रावसाहेब गेरंगे, मा. सिनेट सदस्य शिवाजीराव साबळे, पं.स.सदस्य विश्वासराव जाधव, डॉ. आर. आर. सासवडे, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीर समारोप प्रसंगी सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक गटातील विद्यार्थ्यांचा सत्कार करताना उपसरपंच श्री. अमोल शिंदे समवेत सरपंच श्री. रावसाहेब गेरंगे व प्राचार्य टी. एम वराट



राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर इसळक या ठिकाणी योगा प्रात्यक्षिके सादर करताना विद्यार्थिनी कु. प्राजक्ता लांडे व मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना शिबीर प्रसंगी मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्थेचे समन्वयक डॉ. आर. आर. सासवडे यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट समवेत श्री. शिवाजीराव साबळे (माजी सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)



राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी विद्यार्थ्यांची प्रशंसा करताना दैनिक प्रभातचे उपसंपादक श्री. आर बी. कदम समवेत सरपंच श्री. रावसाहेब गेरंगे, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट, उपसरपंच श्री. अमोल शिंदे व मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना श्रम संस्कार शिबीर समारोप प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनी समवेत प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व प्राध्यापकवृंद

# दिन विशेष कार्यक्रम



२७ फेब्रुवारी जागतिक मराठी भाषा गौरवदिनानिमित्त प्रतिमापूजन करताना कवी श्री. बाळासाहेब अमृते (अ.नगर), प्राचार्य टी.एम.वराट मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पिसाळ के.आर. व इतर प्राध्यापकवृंद



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त डॉ. व्ही. के. धस (पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख, न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर) यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डोंगरे अे.यु.



दि. १९/२/२०१७ रोजी महाविद्यालयात साडी डेज साजरा करताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी एक क्षण



महाविद्यालयात वेषभूषा दिन साजरा करताना महाविद्यालयातील विद्यार्थी




मराठी वाङ्मय मंडळ आयोजित मराठी भाषा गौरव दिनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व विद्यार्थी



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद

# शैक्षणिक सहल - २०१६-१७



श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना भेंडे येथे औद्योगिक क्षेत्र भेट दिली असता विद्यार्थ्यांना माहिती देताना मा. आमदार श्री. पांडुरंग अभंग समवेत प्रा.डॉ. आर. आर सासवडे, श्री. कल्याणराव म्हस्के व मान्यवर



जिजामाता महाविद्यालय भेंडे या ठिकाणी भेट दिली असता प्राध्यापक - वृदांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. जे. आप्पाराव समवेत डॉ. संभाजी काळे, प्रा.डॉ. वाकचौरे, प्रा.डॉ. कसबे, प्रा. मरकड, प्रा. काळे, प्रा. साबळे व प्रा. ढोबे.




जिजामाता महाविद्यालय भेंडे या ठिकाणी महाविद्यालयास भेट दिली असता स्वागत करताना उपप्राचार्य प्रा. डॉ. संभाजी काळे व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद





वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी एक दिवसीय सहलीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट दिली असता एक क्षण...

## स्पर्धा परीक्षा केंद्र



महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्र उद्घाटन प्रसंगी प्रतिमापूजन करताना प्रा. डॉ. एस. बी. उगले (भूगोल विभाग प्रमुख, न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर), प्राचार्य डॉ. टी.एम. वराट व स्पर्धा परीक्षा केंद्र प्रमुख प्रा. अमोल दरंदले व मान्यवर



स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. एस.बी. उगले, समवेत प्राचार्य व प्रा. अमोल दरंदले

# जयकर व्याख्यानमाला



डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला उद्घाटन प्रसंगी प्रतिमापूजन करताना डॉ. शिंदे एन.ए. समवेत प्राचार्य व केंद्र प्रमुख प्रा. डोंगरे अे.यू.



डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला प्रसंगी 'मन करा रे प्रसन्न' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबा खरात व विद्यार्थी

# विद्यार्थी स्वागत व निरोप समारंभ



वाणिजय विभाग आयोजित ''स्वागत विद्यार्थ्यांचे'' या कार्यक्रमात स्वागतगीत सादर करताना महाविद्यालयीन विद्यार्थीनी व मान्यवर



तृतीय वर्ष कला निरोप समारंभ प्रसंगी सभापती मा. डॉ. क्षितिज घुले पाटील व सौ. तेजस्विनी घुले पाटील यांचा सत्कार करताना कला शाखा प्रमुख प्रा. एस.व्ही. मरकड व विद्यार्थी



तृतीय वर्ष वाणिज्य निरोप समारंभ प्रसंगी प्रतिमापूजन करताना प्राचार्य, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा. के. आर. ढोबे व प्राध्यापकवृंद



वाणिज्य विभाग आयोजित कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थीनी कु. स्वाती केंगार हिचा सत्कार करताना प्रा. पी. ए. फटांगरे समवेत प्राचार्य व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.के.आर.ढोबे

# विविध उपक्रम



स्व. मारूतरावजी घुले पाटील यांच्या ८६ व्या जयंती निमित्त प्रतिमापूजन करताना प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मा. सिनेट सदस्य श्री. शिवाजी साबळे व प्राध्यापकवृंद



लोकनेते सहकार महर्षि स्व. मारूतीरावजी घुले पाटील यांच्या १४ व्या पुण्यस्मरणदिनी प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद



स्व. मारुतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून तीन दिवसीय स्पर्धेचे उद्‌घाटन व रांगोळी परीक्षण करताना मा. सिनेट सदस्य श्री. शिवाजीराव साबळे व प्राध्यापकवृंद



स्व. मारूतरावजी घुले पाटील यांच्या जयंती निमित्त त्यांचे जीवन कार्याविषयी विचार व्यक्त करताना मा. सिनेट सदस्य श्री. शिवाजीराव साबळे, प्रा. डॉ. के. आर. पिसाळ व प्रा. एस.बी. दहातोंडे



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट



दि. ३/३/२०१७ रोजी संगणक कक्षामध्ये संगणक शाखेतील विद्यार्थी प्रात्यक्षिक करताना एक क्षण

# विविध उपक्रम




२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये प्रथम ध्वजारोहण करताना प्राचार्य टी. एम. वराट व मान्यवर



प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. आर.आर. सासवडे समवेत उजवीकडुन प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, परिसरातील नगरसेवक मा. श्री. किसन भिंगारदिवे, श्री. कुमारसिंह वाकळे पाटील, श्री. संपत बारस्कर, श्री. सागर बोरूडे, इंजिनियअर मोटे साहेब व श्री. अनिल देशमुख



प्रजासत्ताक दिनी ध्वजास मानवंदना देताना महाविद्यालयातील विद्यार्थी



१ मे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद व प्राध्यापकेतर सेवकवृंद



महाविद्यालयात रक्तदान शिबीर आयोजित प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी एक क्षण



एन.एस.एस. अंतर्गत स्वामी विवेकानंद जयंती व युवादिनी प्रतिमापूजन करताना प्रमुख पाहुणे श्री. शेखर देव, प्राचार्य, व मान्यवर

# क्रीडा विभाग



प्रथम वर्ष कला वाणिज्य व शास्त्र शारीरिक शिक्षण परीक्षा प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. शरद मगर, शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अे.के.आहेर व प्रा.डॉ. के.आर. पिसाळ



शारीरिक शिक्षण स्पर्धा प्रसंगी उपस्थित असलेले प्रा. डॉ. शरद मगर (न्यु आर्टस्, कॉलेज अ.नगर) प्रा. अे.के. आहेर, प्रा.डॉ. के.आर. पिसाळ व महाविद्यालयीन विद्यार्थी



न्यु. आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज अ.नगर येथे आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये सहभागी झालेला कबड्डी संघ




शारीरिक शिक्षण स्पर्धा प्रसंगी शारीरिक चाचणी देताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी एक क्षण

# चर्चासत्र व परिषद सहभाग




बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी येथे अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेत 'महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे छत्रपती शाहु महाराज' या विषयावर शोधनिबंध वाचन करताना प्रा. मरकड एस.व्ही.



अ.नगर महाविद्यालय अ.नगर येथे रा.से.योजना प्रशिक्षण कोर्स पूर्ण केल्याबद्दल प्रा.डॉ. के.आर.पिसाळ यांना प्रशस्तिपत्र देताना केंद्र प्रमुख डॉ. ए.एस. शाळीग्राम व प्रा. एस. डॉ. शरद बोरूडे

# नवीन इमारत कलशपूजन समारंभ क्षणचित्रे




शेवगाव पंचायत समिती सभापतीपदी मा. डॉ. क्षिजि घुले पाटील यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट समवेत सौ. तेजस्विनी घुले पाटील, मा. श्री. मोटे साहेब.




कलशपूजन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील व मान्यवर.




महाविद्यालयाच्या कलशपूजन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. टी. एम. वराट व मान्यवर




नवीन इमारत कलशपूजन प्रसंगी प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के.के. यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट








नवीन इमारतीच्या कलशपूजन प्रसंगी शेवगाव पंचायत समिती सभापती मा.डॉ. क्षितीज घुले पाटील व सौ. तेजस्विनी घुले पाटील काही निवडक क्षण

# गद्य विभाग

# गद्य विभाग


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १ | आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील सहकारमहर्षि मारूतराव घुले पाटील | प्रा. एस.व्ही. मरकड |
| २ | महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतरावांचे योगदान | विठ्ठल बारकू कराळे |
| ३ | स्वामी विवेकानंद युवकांचे आदर्श स्थान | अश्विनी विठ्ठल गाडे |
| ४ | संत तुकडोजी महाराज | वैशाली संजय वाक्चौरे |
| ५ | जीवन | दिपाली संजय पाटोळे |
| ६ | वाणिज्य शाखा - एक संधी | प्रा.के.बी. ताके |
| ७ | निसर्ग आणि मानव | अंजली बबन भूतकर |
| ८ | शेतकरी आत्महत्या-एक गंभीर प्रश्न | पूजा बाकले |
| ९ | आजची स्त्री | स्वाती सतिश वाघ |
| १० | आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि भारत | सूरज शहाजी पवार |
| ११ | आयुष्याची एक दिशा | रोहिणी शिंदे |
| १२ | सहनशक्ती एक काळाची गरज | अक्षय विलास वाघ |
| १३ | नोटाबंदी | स्वाती दत्तात्रय केंगार |
| १४ | स्त्री-भ्रूण हत्या | अंजली भोसले |
| १५ | स्वतःला ओळखता आले पाहिजे | पाटील सुरज बाबासाहेब |
| १६ | Importance of English in our life | भाऊसाहेब म्हस्के |
| १७ | The Pencil | योगिता गव्हाणे |
| १८ | Save girl Child | प्रविण जगन्नाथ वांढेकर |
| १९ | Android - The Computing Platform | निकीता भोर |
| २० | Cashless Economy | प्रा. एस.एम. भिसे |

# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील सहकारमहर्षि मारूतरावजी घुले पाटील



**प्रस्तावना –**

अहमदनगर जिल्हा नव्हे तर महाराष्ट्राला परिचित असे स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील यांचा जन्म श्रीरामपूर तालुक्यातील छोट्याशा खेडे गावात सामान्य कुळात पडेगाव येथे १५ सप्टेंबर १९३० साली झाला. त्यांचे पूर्ण नाव विश्वनाथ दादापाटील बनकर होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व जिज्ञासू-दूरदुष्टी असे होते. शालेय जीवनातच ते गोरगरीब मुलांना वसतिगृहात जाऊन मदत करायचे. त्यांना समाजसेवेची आवड होती. १९४५-४६ मध्ये माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असताना स्वातंत्र्याच्या चळवळीने देशाचे वातावरण भारले होते. पुढाऱ्यांना स्वातंत्र्याशिवाय दुसरा ध्यासच नव्हता. एकापेक्षा एक सरस त्यागी नेते स्वातंत्र्याची चळवळ चालवित होते. नगर जिल्ह्यात काँग्रेस आणि राष्ट्र सेवा दलाचे कार्य अत्यंत उत्साहात चालू होते.

राष्ट्रभक्त अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, रावसाहेब पटवर्धन आदींची भाषणे ऐकण्याची त्यांना संधी मिळाली. त्याचा त्यांच्या मनावर परिणाम झाला व गांधीजींच्या सत्य-अहिंसा-प्रेम या त्रिसूत्रीवर त्यांची श्रद्धा जडली. यातून त्यांच्या मनात राष्ट्रप्रेम निर्माण झाले. त्यानंतर साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्ल्यावर अनेक समाजोपयोगी कार्यासाठी त्यांनी योगदान दिले. नंतर १६४९ रोजी ते शेवगांव तालुक्यातील दहिगांव-ने येथे शंकरराव घुले पाटील यांनी त्यांना दत्तक घेतले व त्यांचे नामांतर मारूतराव शंकरराव घुले पाटील असे झाले. मारुतराव घुले पाटील यांनी संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, थोर विचारवंत बाळासाहेब भारदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी क्षेत्रात कार्य चालू केले. वयाच्या २५ व्या वर्षापासून सहकारी चळवळीत असणाऱ्या या नेत्याने महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांना गुरु मानले.

**सामाजिक योगदान –**

मारुतराव घुले पाटील यांनी १९५४ मध्ये दहिगांव-ने विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना केली. तर १९५८ मध्ये शेवगाव सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली. त्यानंतर १९५९ रोजी जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. ग्रामीण भागातील मुलांकरिता नवजीवन विद्यालय व वसतिगृहाची स्थापना केली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेपासून ते संचालक होते. बँकेच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांनी बँकेच्या संचालक म्हणून केलेल्या कामामुळे आज बँकेचे नाव देशात पोहचले आहे. सन १९६१ मध्ये अखिल भारतीय कृषक समाज नवी दिल्लीचे ते सदस्य होते. मारुतराव घुले पाटील १९६२ साली शेवगाव-नेवासा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून गेले. पुढे त्यांनी १९७२ ते ७८ पर्यंत विधानसभा व विधान परिषदेवर आमदार म्हणून काम पाहिले. आपल्या पुरोगामी विचारसरणीमुळे आरक्षणाचा कायदा होण्याच्या अगोदर मागासवर्गीय तरूणांना त्यांनी पंचायतराज संस्थेमध्ये प्रतिनिधित्व दिले. १९६६ साली जायकवाडी प्रकल्पग्रस्तांचे सुशिक्षित बेरोजगार मुलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांनी शेवगावसारख्या दुष्काळी भागात औद्योगिक शिक्षण संस्था स्थापन केली.

मारुतराव घुले पाटील यांनी मुळा आणि जायकवाडी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांकरिता कायदा करावा अशी मागणी केली होती. धरणग्रस्तांसाठी कायदा करण्यास भाग पाडणारे मारुतराव घुले पाटील हे महाराष्ट्रातील पहिले आमदार होते.

**सहकारातील योगदान –**

मारुतराव घुले पाटील हे शेतकरी हिच आमची खरी जात आणि मानवता हाच आमचा धर्म असे मानत असत. केवळ विचार करून न थांबता विचाराला कृतीची जोड देऊन शेतकरी, कामगार, व्यापारी, मजूर, गोरगरीब सुशिक्षित तरुण यांना संजीवनी देण्याचे काम स्वर्गीय मारुतराव घुले पाटील यांनी केले.

**एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ।।"**

तसेच

**"विना सहकार नाही उद्धार"**

या उक्तिप्रमाणे विस्तापितांच्या जीवनात स्थिरता यावी याकरिता १९७० मध्ये त्यांनी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे रजिस्ट्रेशन मिळविले. कारखाना उभारणी करून सन १९७४-७५ मध्ये यशस्वी चाचणी गळीत हंगाम सुरु केला. आज ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील आदर्शवत समजला जातो. ह्या कारखान्याचे तसेच जिल्हा सहकारी बँकेच्या जडण-घडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे.

**पुरस्कार –**

१) मारुतराव घुले पाटील यांना १९९४ मध्ये ऑल इंडिया नॅशनल युनिटी कॉन्फरन्स नवी दिल्ली यांचा इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार मिळाला.

२) असोशिएशन नवी दिल्ली यांचा भारतीय उद्योगरत्न पुरस्कार १९९६ मध्ये मिळाला.

३) सन १९९७ मध्ये सहकार व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबाबत जिल्हा सहकारी बँकेतर्फे सहकार भूषण पुरस्कार मिळाला.

कर्तृत्त्व संपन्न मारुतराव घुले पाटील यांच्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य माणसाला विविध शिक्षणाची दारे खुली झाली. शिक्षण, शेती, सहकार, समाज व राजकारणात मारुतराव घुले पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले सहकारमहर्षि महाराष्ट्राच्या नवनिर्मितीचे शिल्पकार मारुतराव घुले पाटील यांनी दिनांक ८ जुलै २००२ रोजी जगाचा अखेरचा निरोप घेऊन अनंतात विलिन झाले.

**समारोप –**

अशा प्रकारे अतिशय सामान्य कुटूंबातून खडतर जीवन जगताना मारुतराव घुले पाटील यांनी आपला जीवन प्रवास केला. जायकवाडी धरणाच्या विस्तापिथांसाठी पुर्नउभारणीचे मोठे कार्य त्यांनी केले. सहकार उभारणीतून आपल्या भागाच्या विकासासाठी मोठे कार्य केले. दगडात हजारो शिल्प कोरली, लाखोंनी पाहिली. कुणाचं पोट भरलं, कुणाची भूक भागली, पण साहेब मातीत कोरलेल्या तुमच्या या कर्तृत्त्व लेण्यानं सर्वांना सधन केलं. जगात निर्माण झालेली महान शिल्पे आम्ही पाहिली उद्या ती ढासळू लागतील, कोसळू लागतील, उन्मळूनही पडतील पण स्वकर्तृत्त्वाच्या पायावर उभे राहिलेले तुमचे शिल्प अजरामर राहिल.

दुसऱ्याला उपयोगी पडणाऱ्या, चंदनाप्रमाणे सुगंध देणाऱ्या, फुलांप्रमाणे नवीन जगणाऱ्या मारुतराव घुले पाटील यांचे कार्य पिढ्यानपिढ्या 'दीपस्तंभा' प्रमाणे मार्गदर्शक ठरेल.

**– प्रा. मरकड एस.व्ही.**
कला शाखा प्रमुख



# महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतरावांचे योगदान

आपला महाराष्ट्र नेमका कसा आहे ? याचा विचार आपण करु लागतो. त्यावेळी राम गणेश गडकरी तथा कविवर्य गोविंदाग्रजांच्या महाराष्ट्र गीतामध्ये याचे उत्तर मिळते. त्या गीतामध्ये गोविंदाग्रज म्हणतात,

**''राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।**
**नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्यांही देशा ।**
**अंजनकांचन करवंदीच्या काटेरी देशा ।**
**बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ।**
**शाहिरांच्या देशा, कर्त्या सर्वांच्या देशा ।''**

असा हा मंगल देश, पवित्र देश आणि मराठमोळ्या मर्दाचा राकटही देश. या देशाचे भाग्य उजळले, १ मे १९६० रोजी नवमहाराष्ट्राची निर्मिती झाली. नवमहाराष्ट्राच्या भवितव्याची सफर सुरु झाली परंतु हीच सफर महाराष्ट्राच्या कल्याणाची सफर आहे. पण या सफरीचा नेता कोण ? बिकटसमयी वाट दाखविणारा सेनापती कोण बरे ? ते म्हणजे यशवंतरावजी चव्हाण होय. कारण या सफरीच्या नेतृत्त्वाची धुरा युगपुरुष यशवंतरावजी चव्हाणांकडे आली. आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकाराचा बहुमान त्यांना मिळाला. महाराष्ट्राच्या आम जनतेची इच्छा, आकांक्षा पाहून या देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंनी 'सुसंस्कृत मनाचा' हा नेता महाराष्ट्राला बहाल केला.

युगपुरुष राजा शिवछत्रपतींच्या नंतर हा बहुमान यशवंतरावजींना मिळाला. आपल्या प्रेमळ वाणीने तसेच अष्टपैलू व्यक्तीमत्त्वाने ते जनतेच्या गळ्यातील ताईत बनले. त्यांनी अत्यंत कृतज्ञतेच्या भावनेने महाराष्ट्राचे राज्य करण्यास सुरुवात केली.

यशवंतरावांनी व्यवहारी आणि राजकारणी म्हणून जीवनात अनेक प्रश्नावर तडजोडी केल्या. तथापि जाज्वल्य राष्ट्रभक्ती आणि पुरोगामी, सामाजिक दृष्टीकोन याबाबत त्यांनी जीवनात कधीही तडजोड केली नाही.

महात्मा गांधीजींच्या वधानंतर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर जाळपोळ झाली होती. अनेक ब्राम्हण कुटुंबे निराधार झाली होती. त्यांना शासनाने पुर्नवसनासाठी कर्जे दिली होती. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होताच त्यांनी ती कर्जे माफ केली. ही कर्जे माफ करण्यासाठी असणारा अनेकांचा विरोध त्यांनी मानला नाही. कारण हा वर्ग समाजापासून दूर गेला होता. त्यामध्ये भयग्रस्ततेची, विफलतेची भावना निर्माण झालेली होती. ती दूर करण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. दूर गेलेला समाज जवळ केला. म्हणून यशवंतरावांनी आपल्या उदारमतवादी दृष्टीकोनाने सामंजस्याचे वातावरण निर्माण केले.

यशवंतराव म्हणजे मराठी मातीत जन्मलेला लोकोत्तर पुरुष होय. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे बहुतेक अस्पृश्य समाज बौद्ध झालेला होता. या समाजाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे त्यांना मागासलेपणाच्या सवलती द्याव्या की नाही हा प्रश्न निर्माण झाला होता. यशवंतरावांनी नवबौध्दांनाही या सर्व सवलती मिळतील हे सांगून हा प्रश्न महाराष्ट्रापुरता निकालात काढला. सर्वांना समान न्याय मिळेल, सर्वांना विकासाची संधी मिळेल. यासाठीच त्यांनी पुरोगामी धोरणाचा पुरस्कार केला. त्यामुळेच महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे आदर्श राज्य आहे अशी प्रतिमा अवघ्या भारतात निर्माण झाली.

यशवंतरावांनी खेडे हा केंद्रबिंदू मानून आपल्या शासनाच्या योजना आखल्या. कृषि औद्योगिक समाजाचा विचार या देशाच्या राजकीय व्यासपीठावरून प्रथमच यशवंतरावांनी मांडला. कृषि औद्योगिक समाजाचे सुंदर स्वप्न यशवंतरावांनी उराशी बाळगले. हा विचार मांडण्याचे त्यांचे सामर्थ्य अजोड स्वरूपाचे होते. सहकाराची चळवळ यातून फोफावली. अनेक छोटे मोठे उद्योग यातून उभे राहिले. सहकारी उद्योग धंद्यातील ध्येयधोरणाचा यशवंतरावांनी मोठ्या निष्ठेने पाठपुरावा केला. धनंजय

गाडगीळ, पद्मश्री विखे पाटील इ. च्या सहकारी चळवळीच्या माध्यमातून सहकार साखर कारखाने उभे राहिल. महाराष्ट्राच्या भूगोलावर नसलेली छोटी-छोटी गावे आता हरितक्रांतीने बहरून गेली. यातूनच प्रवरानगर, सांगली, भुईंज, राहुरी यासारख्या अनेक सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली.

महाराष्ट्राचा कायापालट करणारी ही आधुनिक तीर्थक्षेत्रेच आहेत. या तीर्थांचा एकमेव शिल्पकार म्हणजे यशवंतरावजी होय. त्यांच्याच विचारातून ही सहकारी मंदिरे उभी राहिले आहेत. महाराष्ट्राचा कायापालट घडला आहे; घडत आहे. यशवंतरावांनी विचार बोलून दाखववा. एखादी योजना मांडावी. विधानसभेत मान्य करून घ्यावी आणि त्यांच्या छोट्या मोठ्या सहकारी मित्रांनी आपआपल्या भागात जाऊन ते कार्य उभे करावे. कार्य उभे राहत असताना यशवंतरावांनी प्रत्येक ठिकाणी जावे, अचूक मार्गदर्शन करावे अशी यशवंतरावांनी अवघ्या महाराष्ट्रात भ्रमंती केली. क्षणाची उसंत न घेता ते फिरत राहिले. आपल्या प्रेमळ आणि अमोघ वाणीने सर्वांना आपलेसे केले. प्रत्येकालाच विधायक कामाला लावले. कारण सुंदर आणि समृद्धशाली महाराष्ट्राचे स्वप्न त्यांना साकार करावयाचे होते.

इ.स. १९६१ मध्ये नवोदित लेखकांना प्रेरणा मिळावी. मराठी भाषेत दर्जेदार ग्रंथ प्रसिध्द व्हावे म्हणून राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली. बॉम्बे इन्फिरिअर व्हिलेज अबॉलिशन १९५८ साली पास करून महार वतनातून मागासवर्गीयांची सुटका केली. असे अनेक निर्णय होत असताना शिक्षण, सहकार, पाटबंधारे, सांस्कृतिक, कृषिउद्योग आणि विकेंद्रीकरण इ. बाबत पुरोगामी दृष्टीकोन स्विकारल्यामुळे महाराष्ट्रात कॉंग्रेसची प्रतिमा उजळलीच परंतु कॉंग्रेस ही लोकप्रिय झाली. फेब्रुवारी १९६२ मध्ये झालेल्या विधानसभेच्या २६५ जागांपैकी यशवंतरावजींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसला २१४ जागा प्राप्त झाल्या आणि फक्त ५१ जागांवर विरोधी पक्षांना समाधान मानावे लागले. यातच त्यांच्या यशाचे गमक आहे.

यशवंतरावांनी आपल्या सभेतून विचार मांडावे आणि ते विचार घेऊन त्यांचे सहकारी मित्र तसेच अनुयायी जनतेसमोर जात असत. त्यांचे ते अमोल विचार अनेकांना जन्मभर पुरले आहेत. त्यांच्या विचारांमुळे अनेकांचे नेतृत्त्व आकाराला आले आहे. आपल्या विचार आचाराने कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण करणारा आगळा वेगळा नेता म्हणून त्यांचा नावलौकीक झाला. महाराष्ट्राची अस्मिता निर्माण झाली. महाराष्ट्राचे नवे असे शिल्प उभे राहिले. या शिल्पाचा एकमेव मानकरी यशवंतरावजी चव्हाण होय.

**– कराळे विठ्ठल बारकू**
टी.वाय.बी.ए.

# स्वामी विवेकानंद युवकांचे आदर्श स्थान...

१२ जानेवारी हा विवेकानंदांचा जन्मदिवस आपण 'युवादिन' म्हणून साजरा करतो.

माझ्या प्रिय तरूण मित्रांनो, तुम्ही सामर्थ्यशाली व्हा! गीतेचा अध्याय वाचून तुम्ही पुढे स्वर्गाच्या निकट जाऊ शकाल हे धाडसाचे शब्द आहेत. पण माझे तुमच्यावर प्रेम असल्यामुळे, तुमची चूक कोठे होत आहे हे मला दिसते. मला असा फार अनुभव आला आहे की, तुमचे शरीर चांगले सुदृढ झाल्यावर गीता अधिक चांगली कळेल. तुमच्या शरीरातील रक्त शक्तीशाली झाले म्हणजे तुम्हांला भगवान श्रीकृष्णांची अलौकिक प्रतिमा व अपार सामर्थ्य यांचे अधिक आकलन होईल. तेव्हा तुमचे शरीर मजबूत होऊन आपण मनुष्य आहोत अशी तुम्हाला जाणीव होईल व तुम्हाला मन व आत्म्याचा महिमा अधिक कळेल.

"Straight is like,
Weekness is death"

स्वामीजी म्हणतात, युवकांची मने ही धबधब्यासारखी असतात. मोठ्या उंचीवर पाण्याचा साठा अधिक बेभानपणे खाली झेपावतो. स्वैरपणे सर्वत्र पसरतो आणि काही साध्य न करता विशाल महासागरात आपली अस्मिता विसर्जित करून टाकतो. युवकांनो पुस्तक वाचा. पुस्तक वाचल्याने मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक कोणासमोरही ते नतमस्तक होत नाही असा वसाही लक्षात

घेतला पाहिजे. असा सोनेरी विचार या जगातील तरुण युवकांना सांगितला पण त्याचे युवकांना मोल कळले पाहिजे. स्वामीजी कायमस्वरूपी सांगतात की,

**''युवकांनो झेप घ्या**
**दिशा तुम्हाला शरण येतील''**

असे म्हणणारे योद्धासंन्यासी स्वामी विवेकानंद होय. हाच तो नरेंद्र विवेक की, अमेरिकेत जाऊन तेथील पुरुष-महिलांना माझ्या प्रिय बंधू-भगिनींनो म्हणणारे आणि जग जिंकणारे असे ते स्वामी विवेकानंदाचे नाव घेताच अंगावर शहारेच उभे राहतात.

सूर्याची उपमा द्यावी तर त्याला आग आहे. चंद्राची उपमा द्यावी तर त्याला डाग आहे. म्हणून त्यांना उपमेची गरज नाही. तर उपमेलाच त्यांची गरज आहे. खरच स्वामी विवेकानंदांबद्दल जेवढे लिहावे तेवढे कमी आहे. त्यांचे वर्णन करायला शब्दही अपुरे पडतात.

**'' झाला जरी सूर्यास्त, राहतो तसाच संधीप्रकाश**
**विवेकानंदांचे विचार स्मरूण भविष्याचा घेऊ ध्यास''**

धन्यवाद !

**– गाडे अश्विनी विठ्ठल**
टी.वाय.बी.ए.

# संत तुकडोजी महाराज

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. येथे प्राचीन काळापासून अनेक ऋषीमुनी व संत महंताचे कार्य सर्वज्ञात आहे. येथील सर्व संतानी धर्मजागृतीचे, समाजकल्याणाचे व लोकोद्धाराचे काम निःस्वार्थी भावनेने केले. लोकसेवा हिच ईश्वर सेवा मानून समाज जागृती घडवून आणली. अडाणी अज्ञानी समाजाला विचार देणारे ठरले. आत्मोद्धाराच्या तळमळीने संतानी तळागाळातल्या लोकांना ज्ञान सांगितले. समाजातील जाती व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. देश सेवेचे व्रत लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी संतांनी अभंग, भारूडे, गौळणी यासारख्या वाङ्मयातून समाजाला शहाणे करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही तर प्राणी मात्रावर दया करावयास शिकविले. ईश्वर हा प्रत्येकात वास करतो. त्याला शोधायला सांगितले. हेच कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले. तुकडोजींचे मूळ नाव माणिक बंडोजी ब्रम्हभट असे आहे. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यात 'यावली' या ठिकाणी झाला. मोत्यासारख्या सतेज असणाऱ्या माणिकच्या घरात मात्र दारिद्र्याने झडप घातली होती. त्यामुळे शिक्षणाऐवजी राना-वनांत हिंडून परमेश्वर प्राप्तीची आस निर्माण झाली. देहाची तमा न बाळगता संत अकडोजींच्या सानिध्यात राहून ईश्वर सेवेचा मंत्र जपला. एवढेच नाही तर समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी ठिकठिकाणी संघटना स्थापन केल्या. आपल्या आदर्श ग्रामगीतेतून ग्रामराज्याची संकल्पना मांडली. लोकांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. खंजिरीच्या खणखणाटात भजनाच्या सुरेल चालीवर मंगलमय भजने गायली. शिक्षणाविनाच त्यांची कविता साकारली; ती देशसेवेचे व्रत घेवून. तुकड्यादास म्हणे 'आवडले तैसे कवित्व पिसे जडले आम्हां। असे ते सांगत. त्यांच्या कवित्वाला काही थट्टा करणारे लोक हसत. त्यामुळे त्यांना अतोनात दुःख होई. लोकांच्या झाड लोटीपासून ते मुलांना शाळेत घेवून जाण्यापर्यंत त्यांना सर्व कामे करावी लागत. त्यांना परमेश्वर प्राप्तीची आस निर्माण झाल्यानंतर गावोगावी जाऊन मठ मंदिरातून ते भजन कीर्तन करू लागले. हवनतीबुवाकडून शिकलेल्या खंजिरी वाजविण्यात ते धन्यता मानत. महाराजांची खंजिरी वाजण्यास सुरुवात होताच लोक आपोआप गोळा होत असत आणि तल्लिन होऊन ती ऐकत. भजनासाठी व उदर निर्वाहासाठी तुकडे मागणाऱ्या या माणिकला गावचे लोक अगोदर तुकड्या म्हणू लागले. एका प्रसंगी 'अकडोजी महाराजांनी (सद्गुरु) तुकड्या अशी हाक मारली असे वचन येऊ लागले. पुढे अनेक ठिकाणी भ्रमंती करत असताना पंढरपूरला जाण्याचा योग आला. अंगावर फाटके तुटके कपडे घालून ते मंदिरात गेले असता पुजाऱ्यानी त्यांना फटके मारून बाहेर काढून दिले. त्याच अवस्थेत त्यांनी भजन म्हटले आणि हे भजन ऐकताच, त्याच पुजाऱ्याने माफी मागितली. तेव्हापासून ते नियमित पंढरीची वारी करू लागले. तुकडोजींच्या हिंडण्या फिरण्यामुळे लोक त्यांना भोंदू पोटभऱ्या म्हणू लागले. रात्री

अपरात्री चोर म्हणून पोलिसांनी त्यांना मार दिला. त्याचा परिणाम असा झाला की, मनातील सर्व अहंकार गळून गेला. ते म्हणतात, ''मजवाटे छान प्रसाद मिळाला. अहंकार गळून गेला माझा झणी.''

ईश्वर सेवा करताना तुकडोजींना अनेक जीवघेणे अनुभव आले. रामदेघी गावात राहणाऱ्या एका साधूने त्यांना रस्ता स्वच्छ करण्याचे काम दिले. त्यातून ते आजारी व बेशुद्ध पडले. चिमूर या गावी पोहचल्यावर त्यांनी आनंदामृत ग्रंथ पूर्ण केला. हा सगळा त्रास सहन केल्यानंतरही रघुनाथाला आपली दया येत नसेल तर आपण वाघापुढे आपला देह फेकून देवू आणि तसे पत्रही त्यांनी वडिलांना पाठविले. तीर्थयात्रा करत असताना गुरु अकडोजी वरखेडला आले. अकोडजीच्या समाधीचे काम अपूर्ण होते; ते त्यांनी पूर्ण केले. पुढे संत दर्शनाच्या अनुषंगाने अनेक तीर्थस्थानांना भेटी दिल्या.

दऱ्याखोऱ्यातून जात असताना एकदा वाघ त्यांच्या समोर आला. तुकडोजी एकटे होते. मनाची निश्चलता ढळू न देता ते तसेच उभे राहिले. वाघाची क्रूरता एकाएकी मावळली असे अनेक प्रसंग महाराजाच्या आयुष्यात आले. समाजाची धार्मिक भावना वाढीस लागण्यासाठी त्यांनी सालबर्डीचा यज्ञ केला. ही बातमी महात्मा गांधीजींच्या कानावर गेली. त्यांनी स्वतः तुकडोजींना पत्र पाठवून सेवा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या सहवासात आल्यानंतर महाराज दररोज एक भजन म्हणून दाखवित असत. तेव्हा महात्मा गांधी म्हणतात, ''मी आजपर्यंत असा माणूस पाहिला नाही.'' महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून तुकडोजी महाराजांना आणखी जोश आला. त्यांनी भारतातील संतांना राष्ट्रकार्य करण्याचे आवाहन केले. ''सोड चल उठ गडया, झोप सोड, अग्नी हे पेटले, चहूकडून आग लागली.'' निद्रिस्त समाजाला जागृत करण्याच्या प्रयत्नात त्यांनी समाजाला नव चेतना दिली. आम्ही अहिंसेचे पुजारी आहोत. अन्यायाविरूद्ध आम्ही उभे राहू. राष्ट्रसेवा हिच प्रभुसेवा होय असाच संदेश ते देत होते.

**– वाकचौरे वैशाली संजय**

एस.वाय.बी.ए.

# जीवन

आजच्या युगात सर्वजण हे भौतिक सुखामागे धावू लागले आहे. सर्वांमध्ये तो आपल्या जीवनाचे भान विसरला आहे. यासाठी त्याला जीवनाविषयी सांगणे हे गरजे बनले आहे.

आकाशाच्या सरोवरात एक विराट कमलपुष्प उमलले आहे. त्यावर एक दवबिंदू पडला. त्याचेच नाव जीवन आहे. अशा या जीवनात महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे आत्मविश्वास. मग हा आत्मविश्वास म्हणजे काय? आत्मविश्वास म्हणजे यशाची खरी गुरुकिल्ली. जो जगण्यातील उर्मी, आनंद, उत्साह डोळ्यात लकाकणारे तेज, निर्भीडपणा, शुन्यातून जग निर्मितीची नशा. आत्मविश्वास तो मरगळलेल्या मनावर फुटलेली जणू पालवीच.

**''निवडुंगावर आलेलं सुंदर फुल**

**नदीला आलेला अवखळ पूर''**

आत्मविश्वास दुबळ्याची काठी, लंगड्याचा पाय, जमिनीवरून गगनात धाव याला म्हणतात आत्मविश्वास. या सर्व गोष्टी जर आपल्यात असेल तर जीवनात काहीच अशक्य नाही. (Nothing Impossible in Life)

जीवन जगताना अनेक समस्या येतात. आपण त्यांना तोंड देतो आणि द्यावेच लागते. कधी कधी आपण कंटाळतो, तडफडतो, नाराज होतो. पण खरं सांगू हे सर्व म्हणजेच जीवन होय. यशस्वी लोक हे काय यायला हवे याचा विचार तासन तास करतात. आपल्या सारख्याला काय व्हायला हवे ? याचा विचार करणं म्हणजे दिवसा स्वप्न पाहणे असं ते म्हणतात. आपण मात्र अजूनही काय व्हायला हवे याचाच विचार करतो म्हणजे आपण अजूनही स्वप्नच पाहतो. स्वप्न हे केवळ स्वप्नच असतं. म्हणून वर्तमानकाळावर विश्वास ठेवा. यासाठी काय करू शकेल याचा विचार करा. जीवनात नेहमी भविष्यकाळाचा विचार न करता वर्तमानकाळाचा पर्यायी यशाचा विचार करा.

घड्याळाला जशी स्प्रिंग असते तशी मानवी जीवनाला असते. ती शिस्त म्हणजे आपले जीवन होय. आपण नेहमी मी काय गमावले याचा विचार करतो. पण

आपण मजजवळ काय आहे याचा विचार कधी करतच नाही. कारण हो ला नाही ची किंमत मोजावी लागते. आपण जीवनात नेहमी म्हणायला हवे I have to do it, I shall do it, I can do it (मला ते करायचे आहे. मी ते करीनच. मी ते करण्यास समर्थ आहे असे म्हणणारे लोकच जीवनात यशस्वी होतात. वेळ किंवा पैसा विनाकारण घालवणे म्हणजे दिलेले जीवन व्यर्थ घालवणे होय. जीवन मिळणे सोपे असते मात्र जगणे खूप अवघड आहे. जीवन म्हणजे....

**''सृष्टीत असून दृष्टीस न पडणारे,**
**नयनापासून दूर असणारे,**
**हृदयाच्या रम्य बागेत फुलणारे**
**पुष्प म्हणजे जीवन होय.''**

आपण आपल्या जीवनात खूप अपेक्षा करतो किंवा त्या असतात. पण त्या सर्वच पूर्ण होतात असे नाही. म्हणून खंत करत बसण्यापेक्षा जे आहे त्यात समाधानी रहा म्हणजे जीवनात आनंदाचा अनुभव उपभोगण्यास मिळेल. जीवनात काहीतरी मिळविण्यासाठी काहीतरी गमवावं लागतं. जीवनात अपयश मिळाले की आपण नाराज होतो. मात्र अपयश मिळाले याचा अर्थ असा नाही की, तुमचे स्वप्नच कधी पूर्ण होऊ शकणार नाही. याचा अर्थ असा की, तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तुम्हाला आणखी वेळ द्यायला हवा.

"Life is a dream
You are actor
And God is
Our director."

**– पाटोळे दिपाली संजय**
एफ.वाय.बी.कॉम

# वाणिज्य शाखा – एक संधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर २००९ पासून कार्यरत आहे. तेव्हा पासून वाणिज्य शाखेची विद्यार्थी संख्या व निकालाचा आलेख हा वाढता आहे. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना पदवी घेत असताना पुढे भविष्यात काय करायचे आहे ? हे ठरविता यावे. पदवी नंतर कोणती क्षेत्रे आहेत हे माहिती व्हावे. शिवाय हा लेख लिहिताना वाणिज्य शाखा विद्यार्थ्यांना समजावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवलेला आहे. तसे प्रत्येक शाखा ही विशेष असतेच. विद्यार्थी कशा प्रकारे त्या शाखेचा किंवा त्या विषयाचा अभ्यास करतो त्यावर त्याचे यश अवलंबून असते.

वाणिज्य या शब्दाचा अर्थ व्यापार, उद्योग होय. इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. त्याचे कारण एकच होते ते म्हणजे व्यापार. व्यापाराच्या उद्देशाने ते भारतात आले व भारताचे राज्यकर्ते बनले. एखाद्या देशाचा विकास पहायचा असेल तर ज्या देशात जास्त उद्योग व्यापार आहेत, तो देश आज विकसित समजला जातो. व्यापाराला अर्थव्यवस्थेत खूप महत्त्व आहे. आज माहिती तंत्रज्ञान आणि ई-कॉमर्समेळे वाणिज्य शाखा विकसित झालेली आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात देखील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी निर्माण होत आहे.

वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी नोकरीसाठी फिरण्यापेक्षा इतरांना व्यवसायातून नोकरी देणारे बनावे हे या शाखेचे वेगळेपण आहे. वाणिज्य शाखेत नोकरी तर आहेच पण व्यवसायातून देखील आपल्याला यश संपादन करण्याची संधी या शाखेतून आहे. विशेष म्हणजे आमचे महाविद्यालय हे नागापूर एम.आय.डी.सी. या औद्योगिक क्षेत्रात येत असल्यामुळे वाणिज्य शाखेला एक वेगळेच महत्त्व आहे. वाणिज्य शाखेचा संबंध सरळ अर्थशास्त्राशी येत असल्यामुळे अर्थशास्त्रातील संधीही वाणिज्य विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण जागतिकीकरणाच्या जगात वाणिज्य शाखेचे महत्त्व आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगाने वाढत आहे.

वाणिज्य शाखेची पदवीनंतर पदव्युत्तर शिक्षण व नोकरीच्या असणाऱ्या संधी पुढीलप्रमाणे –

M.Com
C.A. (Chartered Accountant)
C.S. (Company Secretary)
ICWA
M.Com B.ed (Jr. Professior)

M.Com SET\NET (Sr. Professior)
MCA (Commerce)
M.B.A.
L.L.B.
Banking Exam
MPSC and UPSC Exam
HRS (Human Resource Manager)
Economist
Tax Consultant
Insurance Consultant
Accountant
Loan Executive
Stock Broker

अशा अनेक क्षेत्रात वाणिज्य शाखेच्या पदवी धारकांना नोकरीच्या संधी आहेत. पण मी विद्यार्थ्यांना आर्वजून सांगेल की, तुम्हाला ज्या क्षेत्रात मनातून आवड आहे त्या क्षेत्रात करिअर करा. जसे सचिन तेंडूलकरला जर म्हटले असते, तू गायन कर व लता मंगशकरला म्हटले असते तू क्रिकेट खेळ तर विचार करा ते जेथे आहेत तेथे पोहचले नसते. ते त्यांच्या जीवनात यशस्वी झाले कारण त्यांनी त्यांच्या आवडत्या क्षेत्रात करिअर केले. विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात जाऊन जीवनात यशस्वी होण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे काम महाविद्यालय करत आहे.

Life is a not parking Space, It is a Racing Track....
Keep on moving... no matte
When, Where, and how
You Start but reach your
Goal and make a new
Record in this world !

– प्रा. ताके. के. बी.
वाणिज्य विभाग

# निसर्ग आणि मानव

नित्य नियमाप्रमाणे ७ जूनला पाऊस आला आणि नंतर मात्र तो कुठेतरी गुडूप झाला. वाट पाहून पाहून सर्वांचे डोळे थकले. तोंडचे पाणी पळाले आणि दुष्काळाच्या भितीने माणसे हवालदिल झाली. निसर्गराजाच्या लहरीपणाला दोष देऊ लागली. स्वतःला सर्वेसर्वा, कर्तबगार मानणाऱ्या माणसाच्या हातापायातील त्राणच गळून गेले. आणि पुढे काय असे प्रश्न चिन्ह माणसापुढे उभे राहिले.

खरेच काय बरे नाते आहे माणसाचे आणि निसर्गाचे, निसर्ग हा माणसाचा मोठा भाऊ, दादा, अग्रगण्य म्हणून तर अवखळपणे वागणाऱ्या या माणसाला निसर्ग काही वेळेला कानपिचक्या देतो. शासन करतो. मग उन्मत झालेला हा मनुष्य काही काळ तरी आपला अवखळपणा आवरता घेतो. पण काही काळापुरताच ! पुन्हा आपले पाढे पंचावन्नच !

आज काय आढळते ? आपल्या वैज्ञानिक औद्योगिक विकासामागे लागलेला माणूस कळत नकळत निसर्गाच्या विनाशाला कारण होतो. समृध्द जंगल संपत्ती उद्ध्वस्त करून माणूस नगरे उभी करतो. वृक्षतोड झाल्यामुळे पाऊस अनिश्चित झाला आहे. जमिनीची विलक्षण धूप होते. निसर्गाचा समतोल बिघडतो. माणूस अशाप्रकारे निसर्गाचा संहारक ठरत आहे. माणसाच्या दुष्ट प्रवृत्तीमुळे अनेक पशुपक्ष्यांच्या जाती नष्ट होत आहे.

निसर्ग हा माणसाचा खरा सखा आहे. आपल्याजवळ असलेले सर्व काही तो माणसाला देऊन टाकतो. झाडांची पाने, फुले, फळे, नद्यांचे पाणी, सागराचे क्षार, रत्ने, इंधन, सारे सारे माणसांसाठी. नद्या सागरातील जलचर माणसाच्या भोजनाची लज्जत वाढवितात. त्याला आवश्यक ती प्रथिने देतात. हवे शिवाय माणसाचे जगणे अशक्य आहे. वारा माणसाला त्याचे जगणे सुसह्य करतो. वेगवेगळ्या प्रकारे निसर्गातील घटक माणसाला मदत करत असतात. पण माणूस मात्र अविचाराने ही देणगी उधळून टाकतो, प्रदूषित करतो.

निसर्ग हा मानवाच्या जीवाचा सखा आहे. निसर्गातील विविध प्राणी, पक्षी, किटक हे देखील माणसाच्या सुखाचाच विचार करतात. मधमाश्यांच्या मेहनतीतून माणसाला मधुर मध मिळते. तुतीच्या पानांवर पोसणारा रेशमाचा किडा आपल्या समर्पणातून माणसाला मऊ सूत रेशीम धागा देतो. निसर्ग फार मोठा किमयागार आहे. तो एक मोठा दाता आहे. तो एक थोर कलावंत आहे. मानवांतील कलावंताचा तो गुरु आहे. म्हणून तर चित्रकार,

गायक, लेखक, कवी हे निसर्गाकडूनच प्रेरणा घेत असतात. माणसांनी हेच नेहमी लक्षात ठेवावे की, या निसर्गाशी आपण सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे. पण माणूस मात्र आज कृतघ्न झाला आहे.

निसर्गाशी असलेले आपले नाते तो विसरला आहे. निसर्गाने युगानूयुगे दिलेले वैभव, सुबत्ता यांची त्याला आठवणही राहिली नाही. शुल्लक स्वार्थापायी तो झाडे तोडतो. जंगले उद्ध्वस्त करतो. नद्यांचे गोड पाणी दूषित करतो. सागरात आपला केरकचरा फेकून त्याच्या अथांगतेलाही अडसर निर्माण करतो. नैसर्गिक टेकड्या, डोंगर, तलाव आपल्या वास्तव्याने दूषित करतो आणि मग मागे उरते केवळ प्रदूषण ! आपल्या शिकारीच्या हौसेपोटी माणसाने आज कित्येक निसर्गदत्त पशु, पक्षी नष्ट केले आहेत. अरण्ये उजाड केली आहेत. माणसाला निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याचा विसर पडला आहे जणू ! निसर्गात असलेले स्वतःचे स्थानच जणू विसरला आहे.

या निसर्गाशी आपण सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे हे तुकाराम महाराजांनी जाणले. ते आपल्या अभंगात लिहितात, 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे' या निसर्गाला संतांनी आपले आप्त मानले आणि त्यांच्यावर आयुष्यभर प्रेम केले म्हणून आपण नेहमीच निसर्गाचा विचार करून त्याच्याशी मैत्री केली पाहिजे.

**– भूतकर अंजली बबन**

एफ.वाय.बी.कॉम

# शेतकरी आत्महत्या एक गंभीर प्रश्न

''काया मातीत–मातीत
घाम जिरवं – जिरवं
तेव्हा उगतं – उगतं
काया मधुन हिरवं...

या कवितेप्रमाणेच आपल्या शेतकऱ्यांचे आहे. जर त्यांनी मातीत घाम जिरवला नाही तर त्यामधून सोनं कसं उगवेल ? कारण जगण्यासाठी तर अन्नाची गरज असते व ते अन्न आपल्याला शेतकरी देतात. जर त्या शेतकऱ्यांसोबतच अन्याय होत असेल तर या सारखे दुःदैव दुसरे कोणतेच नाही. शेतकरी हे आपल्या रक्ताचे पाणी करून शेतात काम करतात. आपल्याला खाण्यासाठी किंवा जगण्यासाठी अन्न धान्य उपलब्ध करून देतात. जर शेतकरी नष्ट होत असेल तर आपल्याला अन्न कोण उपलब्ध करून देईल ?

शेतकरी आत्महत्येचे सर्वात जास्त प्रमाण आपल्या महाराष्ट्रातच आहे. जर जगाचा पोशिंदा असणारा हा शेतकरी आत्महत्येच्या संकटात संपून जात असेल तर ही भीती मनामध्ये घर करून राहिलेली आहे. त्यासाठी आजच आपण सर्वांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्यासारखे दिग्गज आपल्याला मार्गदर्शनासाठी उभे आहेत. 'नाम' च्या माध्यमातून ते केवळ आर्थिक मदत करण्याचे काम करीत नाही; तर प्रत्यक्ष त्यांच्या दारात जाऊन त्यांची विचारपूस करीत आहेत. सावकारी कर्जापायी अथवा बँकांच्या कर्जापायी मनःस्वाथ्य हरपून जाते. कितीही पैसे भरले तरी मुद्दल फिटत नाही हा अनुभव अनेकांचा आहे. या चिंतेत असताना कर्ज फिटत नाही. तथापि कर्ज परतफेडीसाठी बँकांचा तगादा, सावकारांची अरेरावी, धमक्या यांचा भडीमार चालूच असतो. त्यामुळे चिंतातूर मनाला अधिक काळजी वाटू लागते. ती उद्याची !

या आत्महत्या आज नव्या नाहीत. दररोजचेच होऊन बसले आहे. बळीराजा संघटित नसल्याने तो न्याय मागू शकत नाही. त्याचे विचार कोणी ऐकून घेत नाही. संसदेवर हल्ला करणारे अतिरेकी मेल्यावर जीवाचा आकांड तांडव करून मानवी हक्कवाले मानवतेस काळीमा लागल्याची बोंब ठोकल्याचे सर्वश्रुत आहे. मग शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर असा का समाज निष्ठूर झाला आहे. दिवसभर शेतात राब–राबूनही शेती मालास किंमत मिळत नाही. तसेच सावकार शेतकऱ्यास लुटतच आहे.

जमिनीला म्हणतात शेतकऱ्याची आई
तरी आमच्या शेतकऱ्याचा विकास का नाही?

लोकांच्या पोटासाठी दिवसभर राबतो
स्वतः मात्र चटणी–भाकरीवर जगतो

कष्ट करून सुख याच्या नशिबात नाही
दोन नवीन कापडं याच्या अंगात नाही

शेतीत कष्ट करून निसर्ग कोपतो
दुष्काळाच्या भीतीने शेतकरी कापतो

मी शेतकरी झालो यात माझा काय गुन्हा
दुबार पेरणी करून कष्ट करायला लावतो पुन्हा

शेतमालाला योग्य भाव मिळत नाही
सावकाराच्या त्रासातून याची सुटका नाही

परमेश्वरा तू जरी कोपला पण मी हरणार नाही
येणाऱ्या संकटाचा सामना करेल
पण फास घेऊन मरणार नाही.

या कवितेप्रमाणे जर प्रत्येक शेतकऱ्याने ठरविले तर किती चांगले होईल परंतु प्रत्येक मनुष्य हा मजबुरीमध्ये काहीही करतो. त्यामुळे गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात १८६२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची ही संख्या संपूर्ण देशात ३३४० इतकी आहे. याचाच अर्थ एकट्या महाराष्ट्रात दरवर्षाला देशाच्या तुलनेने १/३ आत्महत्या होतात. शेतकऱ्यांभोवतीचा आवळला जाणारा कर्जाचा फास अद्यापही सैल तर झालेला नाहीच; उलट तो अधिकच घट्ट होत आहे. त्यामुळे सरकारला पण आता शेतकऱ्यांचा विचार करावा लागेल. त्यांच्या न्यायासाठी सरकारला काही पाऊले उचलावी लागतील. तरच शेतकरी जिवंत राहतील. जर एक-एक करत सर्व शेतकरी मरणाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचले तर देशाचा विकास कधीच होणार नाही. कारण आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वाचविणे खूप महत्त्वाचे आहे. जर त्यांच्या हितासाठी काही चांगली पावले उचलली गेली तर आपला शेतकरी मरण्याचा विचारच करणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होईल. जर जगाचा पोशिंदा सुरक्षित असेल तरच संपूर्ण देश सुरक्षित आहे असे मानले जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांची आत्महत्या थांबविणे फार महत्त्वाचे आहे. नव्हे ती काळाची गरज आहे.

**– बाकले पूजा**
एस.वाय.बी.कॉम

# आजची स्त्री

एकेन राजहंसेन या शोभा सरसो भवेतः ।
बकसहप्रेन, सरिता परिसा वासिना ।।

या छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'बुधभूषण' या संस्कृत ग्रंथातील श्लोकाप्रमाणे शंभूराजे म्हणतात, ''हजारो बगळ्यांनी तलावाला जी शोभा येत नाही. ती एका राजहंसाने येते.'' तशीच एका स्त्रीने घराला जी शोभा येते. ती दुसऱ्या कशानेच येत नाही.

आजची स्त्री ही 'कही धूप कही छाव' या प्रमाणे आहे. आज आपल्या देशाची स्थिती पाहता काही स्त्रिया ऑलम्पिकमध्ये पदके पटकावत आहे. तर काही आजही चूल फुंकत आहे. काही स्त्रिया आज आय.टी. क्षेत्रात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरत आहे तर काही स्त्रिया या कोपर्डी सारख्या घटनांना बळी पडून आपले जीवन या जगातून संपवून टाकत आहे.

आजही घरामध्ये स्त्रीला दुय्यम स्थानच दिले जात आहे. मग ती त्या घरातील पुरुषापेक्षा कितीही कर्तबगार असो. पण आज कुठेतरी का होईना ही परिस्थिती बदलत आहे याचा मला अभिमान आहे. आजच्या स्त्रियांनी उंच शिखर गाठले आहे. कल्पना चावला, ललिता बाबर, पी.व्ही. सिंधू, प्रतिभाताई पाटील यासारख्या स्त्रियांनी आपला ठसा उमटविला आहे. अशक्य गोष्टी ही शक्य करून दाखविल्या आहे. म्हणूनच मी प्रत्येक स्त्रीला सांगू इच्छिते,

ढाळू नकोस अश्रू तू
पुसणारं कोणी नाही
ही हाक यातनांची
ऐकणारं कोणी नाही
जीवनात जगण्याचे मार्ग जरी खुंटले ग
तुझ्याच देवतांनी तुला आज लुटले ग

त्यामुळे आजच्या स्त्रीने प्रत्येक क्षेत्रात पुढे असायला हवे. चूल आणि मूल यापलीकडेही आपले एक विश्व आहे हे ओळखायला पाहिजे. स्त्रीने स्वावलंबी झाले पाहिजे. आजची स्त्री ही पूर्वीच्या स्त्रीपेक्षा झपाट्याने बदलत आहे. नागरी भागात ही स्थिति दिसून येते. मात्र खेड्यात आजही पूर्वीचीच स्थिती आढळून येते. प्रत्येक क्षेत्रात आज स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे. आज प्रत्येक

क्षेत्रावर स्त्रीने कब्जा केलेला आहे. कोणतेही काम असे नाही की, ते ती करू शकणार नाही. त्यामुळे ती पुढे जात आहे.

मात्र प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. आजही काही ठिकाणी स्त्रीला आपल्या मनासारखे, इच्छेप्रमाणे क्षेत्र निवडता येत नाही. शिक्षण घेता येत नाही. लहानपणापासून तिला आपण स्त्री म्हणून जन्माला आलो याची जाणीव करून दिली जाते. पण आता हे थांबलेच पाहिजे. स्त्रीला प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी घरातूनच सुरुवात झाली पाहिजे. घरापासून सुरुवात झाली तरच समाज स्त्रीला आदराने स्वीकारेल. स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने वागणूक दिली जाईल.

पण आता हे थांबवले तरच हां भारत सुजलाम सुफलाम ज्याप्रमाणे आपण म्हणतो त्याप्रमाणे सत्यात उतरेल. जेव्हा प्रत्येक स्त्रीचा विकास होईल; तेव्हा आपल्या या भारतमातेचा नक्कीच विकास होईल. म्हणूनच स्त्री जन्माचे स्वागत करा.

तसेच सरकारही आज मुलींच्या जन्मासाठी योजना राबवित आहे. घरातही तिला सन्मान दिला पाहिजे. म्हणूनच एवढेच सांगावे वाटते की,

जिंदगी में काटें फैलाने वाले तो बेंहत है ।
लेकीन हमें भी उनको पार करकर आगे
निकलना है ।
तभी हम हमारी मंजील तक पहुँच सकेंगे ।

**– वाघ स्वाती सतिश**
टी.वाय.बी.कॉम

# आंतरराष्ट्रीय दहशदवाद आणि भारत

ढोबळमानाने आपण दहशतवादाची व्याख्या कशी करतो ? म्हणजे कुठे अतिरेक्यांनी बॉम्ब स्फोट केला किंवा हल्ला केला. साधारणतः आपण त्यास दहशतवाद म्हणतो. परंतु एक लक्षात घेत नाही किती दहशतवाद्यांची दहावी स्टेप असते. १ ते ९ मध्ये जे काही घडते त्यास आपण दहशतवाद म्हणत नाही. उदाहरणार्थ बहुसंख्य भाषिक अल्प संख्यांकास धमकावतात ते काय असते ? व्होट बँकेच्या जोरावर धार्मिक अल्पसंख्यांक मोर्चा काढतात आणि एका शहिद स्मारकाची विटंबना करतात. तेव्हा तो बहुसंख्यांक आणि अल्पसंख्याक लोकांचा दहशतवाद असतो आपण हे मान्य करतो का ? उदाहरणार्थ जेव्हा काही शाकाहारी लोक म्हणतात कि, आम्ही मांसाहार करत नाही म्हणून आमच्या शेजारी मांसाहारी लोक नकोत; तो हि एक प्रकारचा दहशतवादच असतो. हे आपणास मान्य आहे का ? इथे ही दहशत पसरवली जातेच, भले तिचे स्वरूप सौम्य असेल पण मुद्दा उरतोच की, दहशत आहेच.

काही मूलतत्त्ववादी आपली मते रुजविण्यासाठी दहशतवादाचा आश्रय घेतात. ते चूक आहे. लोकशाही मार्गाने ते त्यांच्या मागण्या लोकांपुढे सत्तेपुढे/ जगापुढे मांडु शकतात परंतु ते तसे न करता दहशतीचा मार्ग अवलंबतात. पाकिस्तानातील लोक/क्रिकेटपटू इथे येवू नयेत हा माझा मुद्दा आहे. पण तो मान्य करावयास लावण्यासाठी काळे फासणे हे कशात बसते ? आम्ही खळ खट्याळ करू हे काय आहे ? हैदराबादमध्ये एक माथेफिरु म्हणतो, पंधरा मिनिटे पोलिसांना रजा द्या; मग बघा आम्ही काय करतो ? हे सगळे दहशतीचे प्रकार आहेत. पण ह्यांची उतरंड १ ते ९ आकड्यात बसते. संभावत: आम्ही त्यास दहशतवाद मानत नाही. एका विशिष्ट धर्मियांनी किंवा आपण मूलतत्त्ववाद्यांनी केलेल्या हिंसाचारास दहशत मानू लागलो आहोत की नाही?

शेवटी दहशतवाद दहशत पसरविण्यासाठी केला जातो. मग आम्ही गटाने मोठे आहोत म्हणून तुम्हास ह्या ट्रेनमध्ये चढू देणार नाही. आम्ही हे विशिष्ट मांस खात नाही म्हणून तुम्ही खाऊ नका किंवा तुम्हास खाऊ देणार नाही. आम्हास कोण सांगणारे हेल्मेट घालू नका. ह्यावर सुप्रिम कोर्टाचा निर्णय झुगारुन लोक बेदरकार वाहने चालवतात; तेही हेल्मेट न घालता. आम्ही शाकाहारी आहोत म्हणून तुम्ही मांसाहार सोडा. आम्ही विशिष्ट भाषा बोलतो मग तुम्हीही ती बोललीच पाहिजे. आमचे सणवार/संस्कृती पाळण्यासाठी आम्ही रस्ते अडवू. ढोल, ताशे, डी.जे चा

खणखणाट करत मिरवणूक काढू. तूम्ही आम्हास अडवणारे कोण ? आम्ही रस्त्यावर बसून नमाज पाडू. कर्णे लावून लोकांची झोपमोड करू. हे सगळे प्रकार दहशतीत बसतात.

मग जे बॉम्बस्फोट करतात, हल्ले करतात त्यासच फक्त दहशदवाद किंवा हल्ले कसे म्हणायचे ? भारतीय संविधानाने केलेले कायदे पायदळीस तूडवून आपलाच हेका सुरु ठेवणे हाही दहशतवादच झाला.

दहशतवाद हि जागतिक समस्या बनली आहे. संपूर्ण जग या दहशतवादाच्या विळख्यात सापडले आहे. २०-२५ वर्षापूर्वी प्रामुख्याने भारत, पाकिस्तान, इराक, इंडोनेशिया ही दहशतवादाला प्रामुख्याने बळी पडलेली राष्ट्रे म्हणून ओळखली जायची; परंतु ९-११-२००१ ला अमेरिकेवर जगातील सर्वात मोठा दहशतवादी हल्ला झाला आणि तेव्हा पासूनच दहशतवाद खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय समस्या म्हणून ओळखली जाऊ लागली. त्यापूर्वी दहशतवाद ही समस्या आशियायी देशांपुरतीच मर्यादित होती.

अमेरिकेला दहशतवादाची झळ बसल्यामुळे दहशतवादाचा पाठपुरावा करणे सोडून अमेरिकेने दहशतवाद हि जागतिक समस्या असून सर्व राष्ट्रांनी मिळून दहशतवादाचा बिमोड करायचे ठरविले. २००१ च्या हल्ल्याचा सूत्रधार ओसामा बिन लादेनचा तब्बल दहा वर्षानंतर अमेरिकेने खात्मा केला असला तरी अमेरिका आजही दहशतीच्या सावटाखाली असल्याचे दिसते. ज्या प्रमाणे अमेरिकेने ओसामाचा खात्मा केला त्याप्रमाणे दहशतवादाला नेहमीच बळी पडणाऱ्या भारताच्या सुरक्षेचा प्रश्नही लवकरात लवकर सोडवला गेला पाहिजे. मुंबई, दिल्लीच्या बॉम्बस्फोटातील आरोपींना पकडण्यास भारताला सहकार्य करायला हवे. जगातील सर्वच प्रगतशिल राष्ट्रांनी मिळून दहशतवादाचा समूळ नाश करण्यासाठी एकत्र यायला हवे, अन्यथा दहशतवाद संपणे कठीण आहे.

**– पवार सुरज शहाजी**
एस.वाय.बी.कॉम

# आयुष्याची एक दिशा

शब्द बोलताना शब्दाला धार नको तर आधार असला पाहिजे. कारण धार असलेले शब्द मन कापतात आणि आधार असलेले शब्द मन जिंकतात. निर्णय चुकतात आयुष्यातले आणि आयुष्य चुकत जाता जाता प्रश्न कधी कधी कळत नाही आणि उत्तर मात्र चुकत जाते.

प्रश्न सोडवताना वाटतं सुटत गेला गुंता पण प्रत्येकवेळी नविन गाठ बनत जाते, दाखवणाऱ्याला वाट माहित नसते, चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते.

दिसतात तितक्या सोप्या नसतात काही गोष्टी. अनुभव म्हणजे काय ते तेव्हाच कळते. असे मित्र बनवा जे कधीच साथ सोडणार नाही. असे प्रेम करा, ज्यात स्वार्थ असणार नाही. असे हृदय बनवा की, ज्यात रहस्य असणार नाही. आयुष्यात असे लोक मिळवा, जे वेळेला तुमची सावली आणि वेळेला तुमचा आरसा बनतील. कारण आरसा कधी खोटं बोलत नाही आणि सावली कधी साथ सोडत नाही. कोणी कसं दिसावं यापेक्षा कोणी कसं असावं याला महत्त्व आहे. स्वप्न पूर्ण झालं नाही तर रडायचं नसतं. रंग उडाले म्हणून चित्र फाडायचं नसतं. फक्त लक्षात ठेवायचं असतं. सर्वच काही आपलं नसतं. छोट्याशा आयुष्यात खूप काही हवं असतं. पाहिजे तेच मिळत नसतं.

असंख्य चांदण्यांनी भरूनसुध्दा आपलं आभाळ मात्र रिकामं असतं. हव्या असलेल्या सगळ्याच गोष्टी माणसाला का हव्या असतात याचं उत्तर सुरेश भटांनी सागितलं आहे.

"आयुष्य छान आहे, थोडं लहान आहे
रडतोस काय वेड्या लढण्यात शान आहे
काट्यात ही फुलांची झुलती कमान आहे
उचलून घे हवं तर दुनिया दुकान आहे.
जगणे निरर्थक म्हणतो तो बेईमान आहे"

सुखासाठी कधी कधी हसावं लागतं तर कधी कधी रडावं लागतं. कारण सुंदर धबधबा बनायला पाण्यालाही उंचावरून पडावं लागतं. आकाशातील तारे कधीच मोजून होत नाही. माणसाच्या गरजा कधीच संपत नाही. शक्य तेवढे तारे मोजून समाधानी रहावं. तरच आयुष्य सुंदर वाटतं.

आयुष्यातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद. गंमतीची गोष्ट अशी की मौल्यवान असूनही परमेश्वरानं ती विनामूल्य दिलेली आहे. त्याहूनही गंमतीची गोष्ट अशी की, आपल्यापैकी बऱ्याच लोकांना आयुष्य संपेपर्यंत त्याचा पत्ताच नसतो. उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला आनंदाने सामोरे जा. मावळताना तो तुम्हाला खूप समाधान देऊन जाईल. आनंद हा फुलपाखरासारखा असतो. त्याचा पाठलाग केला की तो दूर जातो व आपण निश्चिंत बसलो की, अलगद आपल्या खांद्यावर येऊन बसतो. प्रश्न सुटण्यासारखा असेल तर काळजी करण्यासारखे काय अन प्रश्न सुटत नसेल तर काळजी करून उपयोग काय ? पराभवाने माणूस संपत नाही. प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. कठीण काळात सतत स्वतःला सांगा की, शर्यंत अजून संपलेली नाही कारण मी अजून जिंकलेलो नाही.

''हसता हसता सामोरे जा आयुष्याला
तरच घडवू शकाल भविष्याला
कधी निघून जाईल आयुष्य कळणार नाही
आताचा हसरा क्षण परत मिळणार नाही''

कधी कोणावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःचे निर्णय स्वतःच घ्या. बरोबर ठरला तर खूप काही जिंकल्याचा आनंद मिळतो आणि चुकला तर अनुभव मिळतो. शिक्षण, पदवी, पैसा यावरून माणूस कधीच श्रेष्ठ किंवा मोठा होत नसतो. कष्ट, अनुभव व माणूसकी हिच माणसाचं श्रेष्ठत्त्व ठरवते.

लोक म्हणतात आयुष्य छोटं आहे. पण असं बिलकूल नाही. खरं तर आपण जगायला उशिरा सुरुवात करतो. क्षणाला क्षण दिवसाला दिवस जोडत आयुष्य पुढे सरकत असते. कधी तरी, कुठे तरी, केव्हा तरी असा क्षण येतो; जो आख्खं आयुष्यच बदलून टाकतो. फक्त तो क्षण ओळखता आला पाहिजे. यालाच 'आयुष्य' जगणे म्हणतात. ''गेलेल्या क्षणासाठी झुरत बसण्यापेक्षा समोर असलेलं आयुष्य भरभरून जगा''

**– शिंदे रोहिणी**
एफ.वाय.बी.कॉम

# सहनशक्ती एक काळाची गरज

मित्रांनो ! आपण हल्ली वर्तमानपत्रामध्ये नेहमी बातम्या वाचतो की, आई रागावल्याने मुलीची आत्महत्या. वडिलांनी अभ्यासाला बसण्यासाठी सांगितले म्हणून मुलीची आत्महत्या. खेळायला सोडले नाही म्हणून मुलगा घर सोडून गेला. मित्रांबरोबर भांडण झाल्याने आत्महत्येचा प्रयत्न. परीक्षेमध्ये नापास झाल्याने मुलाचा आत्महत्येचा प्रयत्न. या सर्व बातम्या आपल्याला काय सांगतात ? की नवीन पिढी अशी नेभळट व भित्री आहे का ? या सगळ्या प्रश्नांवर चिंतन करण्याची वेळ आज आली आहे हेच खरे ! मित्रांनो या सर्वामागे एकच कारण म्हणजे सहनशक्तीची कमतरता.

आपली भारतभूमी ही संतांची भूमी आहे. सहनशिलता, दया, क्षमा, शांती, परोपकार यांनी संतांचे, महात्म्यांचे जीवन नटलेले असते. म्हणूनच आपल्याच वयाच्या ज्ञानेश्वर माऊलीच्या जीवनात किती सहनशिलता होती हे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जीवनातील प्रसंगावरून समजेल.

संत ज्ञानेश्वर महाराजाचा जन्म श्रावण वद्य अष्टमी शके ११९७ रोजी आपेगांव येथे झाला. त्यांचे घराणे वतनदार कुलकर्ण्यांचे. वडिलांचे नाव विठ्ठलपंत व आई रुक्मिणी होय. विठ्ठलपंतांनी संसाराचा त्याग करून ते घर सोडून निघून गेले. त्यांनी काशीला श्रीरामानंद महाराजांच्या आश्रमात संन्यासाश्रम स्विकारला. एके दिवशी श्रीरामानंद महाराज आळंदीला आले. तेथे त्यांची रुक्मिणीशी भेट झाली. रुक्मिणीच्या सांगण्यावरून त्यांना कळले की, रुक्मिणीचे पती नवे संन्याशी चैतन्य हे आहेत. ते काशीला परत जाताच विठ्ठलपंतांना घरी परत जाऊन प्रपंच करण्याची आज्ञा करतात.

संन्याश्रमानंतर परत प्रपंच करणे हे धर्म बाह्य वर्तन आहे. यामुळे विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांना प्रायश्चिताची शिक्षा धर्म मार्तंडांनी जाहीर केली. आपेगांवाला येताच तिथेही त्यांचा छळ झाला. त्यांना निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताई अशी अपत्ये म्हणजेच चार वेदच जन्माला आले. मुलांचा व पती पत्नीचा समाजाने अतोनात छळ केला. त्यांना संन्याशाची मुलं म्हणून हिणवत असत. माधुकरी

मागत या मुलांना दारोदार हिंडावे लागे. तेव्हा कुणी त्यांच्या झोळ्या हिसकावून फाडून टाकीत तर कुणी अन्न फेकून देत. पदोपदी अपमान व कडवट बोलणे. ज्यावेळी चारही भावंडांची मुंज करण्याची वेळ आली. तेव्हा ब्राम्हणांनी याला भयंकर विरोध केला. संन्याशाच्या मुलांना मुंजीचा अधिकार नाही असा शास्त्री पंडितांनी निर्णय दिला. विठ्ठलपंत व रुक्मिणी यांना देहांत प्रायश्चित घेण्यात सांगितले. एका रात्री हे पती-पत्नी मुलांना सोडून देहांत प्रायश्चित घेण्यास निघून गेले. तेव्हा या चार भावंडांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण'

या एका पंक्तीत सहनशीलतेची सगळी वैशिष्ट्ये सामावलेली आहे. श्री. ज्ञानदेवादि भांवडांचा छळ झाला तरी त्यांनी समाजावर कधी राग काढला नाही. आई-बाप जाऊनही पूर्ण निराधार होऊनही ते समाजासाठीच जगले. व्यवहारी आणि स्वार्थी लोकांनी अतोनात छळ केला पण सारे आघात सहन केले. ज्ञानदेवांनी किती सोसले; त्यांची मोजदादाही करता येणार नाही. सर्व भावंडांचा छळ होऊनही त्यांनी समाजाच्या भल्याचा विचार केला. एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवांचा वाचायज्ञच होय. हा प्रसाद त्यांनी ज्ञानेश्वरीमध्ये शेवटी मागून त्याला पसायदान असे नाव दिले. ज्ञानदेवांनी स्वतःसाठी काहीही मागितले नाही. संपूर्ण जगासाठी व समाजासाठी त्यांनी मागणी केली.

''दुष्टांच्या मनातील दुष्टपणा जावो. माणसा-माणसांमध्ये जिवाभावांची मैत्री असो. दलित पिडितांच्या जीवनातील अंधकार नाहीसा होवो. सर्वत्र कल्याण असावे. ईश्वरावर निष्ठा असलेल्या व ईश्वराची भक्ति करणाऱ्या सज्जनांची संख्या वाढो'' असे त्यांनी पसायदान मागितले. केवढी ही प्रचंड सहनशक्ती !

सहनशीलता हा तसा दुर्मिळ असाच गुण आहे. या गुणाने मनाचे ऐश्वर्य वाढते. सहन करणे ही फार मोठी शक्ती आहे. त्यासाठी हवे असते मानसिक बळ. संघर्ष करण्याची ज्याच्या मनात ताकद असते. तोच सहनशील राहु शकतो.

मित्रांनो ! तुम्ही नेहमी प्रवास करीत असाल किंवा केला असेल तर तुमच्या लक्षात येईल की रस्ता नेहमी सरळ गुळगुळीत नसतो. तर तो वळणावळणाचा खाच खळगे असलेला, कधी गुळगुळीत तर कधी वेडावाकडा असतो. जीवन हे असेच आहे. नेहमी आनंद, सुख कसे असेल ? दुःख, संकटे ही असणारच. अशा वेळी धीर न सोडता मन खंबीर ठेवून सहनशीलतेने प्रत्येक प्रसंगाला तोंड दिले पाहिजे.

ध्येयासक्त जीवन जगणे हाच सहनशक्तीचा मार्ग आहे.

**- वाघ अक्षय विलास**

एफ.वाय.बी.कॉम

## नोटाबंदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार बहुमताने सत्तेवर आल्यानंतर अनेक महत्वाचे निर्णय घेऊन बदल घडवून आणले. त्यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये 'स्वच्छ भारत अभियान, मन की बात व पाकिस्तानात जाऊन आपल्या सैन्याने केलेले 'सर्जिकल स्ट्राईक वॉर' यासारख्या धाडसी निर्णयाने ते अधिक लोकप्रिय झाले. याशिवाय पंतप्रधान पदावर विराजमान झाल्यानंतर त्यांनी आपल्या देशात उद्योगधंदे वाढावेत, तरूणांच्या हाताला काम मिळावे म्हणून अनेक देशांचे दौरे करून तेथील उद्योजक व राज्यकर्त्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून दिवसेंदिवस लोकांच्या अपेक्षामध्ये वाढ होत असतानाच ८ नोव्हेंबर २०१६ रोजी त्यांनी चलनातून ५०० व १००० रूपयाच्या नोटा रद्द करण्याची घोषणा केली. या निर्णयाने भारतासह जगातील अर्थतज्ज्ञ, विचारवंत गोंधळून गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मात्र आपल्या भाषाणात सांगितले की, एवढा मोठा निर्णय मी विचारपूर्वक घेतला आहे. त्यामुळे देशातील काळा पैसा, नकली नोटा व भ्रष्टाचार यांना आळा बसेल. त्यासाठी आपण सर्वांनी थोडासा त्रास सहन करून सरकारला सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. देशासाठी त्याग करण्याची हीच खरी वेळ आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णयानुसार दुसऱ्या दिवसापासूनच लोकांनी ५०० व १००० रूपयाच्या नोटा बँकेत जमा करण्यासाठी व बदलून घेण्यासाठी रांगाच रांगा लावल्या. एकाचवेळी संपूर्ण देशातील लोक बँकेकडे आल्यामुळे मोठा गोंधळ उडाला. तासन्तास रांगेत उभे राहिल्यामुळे काही वयोवृध्द व आजारी लोकांना नाहक आपला प्राण गमवावा लागला. जसजसे दिवस जाऊ लागले तसतशा समस्यांचे स्वरूप वाढत जाऊन जनक्षोभ वाढू लागला.

नोटाबंदी केल्यामुळे ज्या अनेक समस्या निर्माण झाल्या, त्यामध्ये शेतकऱ्यांनी विक्रीस नेलेल्या मालाला पैशाअभावी तसेच सोडून यावे लागले. परिणामी शेतकऱ्याच्या मालाची विक्री बंद झाली. ज्यांच्या मुला-मुलींच्या लग्नाची तारीख निश्चित झाली होती, ती लग्ने पैशा अभावी रद्द करून पुढे ढकलावी लागली. दवाखान्यात दाखल झालेल्या आजारी पेशंटला औषधे खरेदी करणे अवघड झाले. जमीन, इमारती खरेदी विक्री व्यवहार बंद झाले. परिणामी ज्या ज्या गोष्टींसाठी पैशाची गरज होती असे सर्वच व्यवहार ठप्प झाले. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी बँकेकडून फक्त दोन हजार रूपये दिले जात असल्यामुळे घरातील व्यक्तीला कामधंदा सोडून दिवसभर बँकेतच राहावे लागत होते. ज्यांचे हातावर पोट होते त्यांचा रोजगार बंद झाला. या सर्व गोष्टींमुळे लोक मेटाकुटीला आले.

नोटाबंदीमुळे लोकांना येणाऱ्या समस्या जेव्हा वर्तमानपत्रे व प्रसारमाध्यमांद्वारे व्यक्त होऊ लागल्या तेव्हा सरकार त्यावर उपाय योजना करण्यासाठी झपाट्याने प्रयत्न करीत होते. लोकांच्या समस्या दूर करण्यासाठी बँकेतील कर्मचाऱ्यांचे कामाचे तास वाढविले. त्यांच्या नियमित सुट्ट्या रद्द केल्या. सरकारने काही गोष्टींवर उपाय योजना केल्या परंतु नोटाबंदी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर नोटा छापण्यास सुरुवात केल्यामुळे आवश्यक तितक्या नोटा उपलब्ध होण्यावर मर्यादा आली. त्यामुळे बँकेतील नवीन नोटा संपल्या की रांगेत उभे असणारी माणसे बँक अधिकाऱ्यांशी भांडण करू लागली. त्यातच जिल्हा बँकेस पैसे जमा करण्यास बंदी आणल्यामुळे खेड्यापाड्यातील लोकांचे खूपच हाल झाले. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी बँकांना लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. या सर्व प्रसंगावर मात करीत बँक अधिकाऱ्यांनी शक्य होईल तेवढ्या लोकांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला. हा काळ सर्वांच्याच दृष्टीने फार कसोटीचा ठरला.

नोटाबंदीनंतरची ही एक बाजू झाली तर दुसऱ्या बाजूने पहिल्यास काही लोकांनी आपल्या जवळचा बेहिशोबी पैसा जाळून तसेच कचऱ्यात टाकून दिल्याचे वर्तमानपत्रात पाहवयास मिळाले. अतिरिक्त अशा बेहिशोबी पैशाची विल्हेवाट लावताना पोलिसांनी या काळात कोट्यावधी रूपये पकडून, कारवाई केली. पण एक विशेष असे की, कोणीही विशेष व्यक्ती पैसे जमा करण्यासाठी रांगेत उभी राहताना दिसली नाही. त्यांनी बँक अधिकाऱ्यांना हाताशी धरून काम फत्ते करून घेतले. या संदर्भात लाच खाऊन काम करणारे काही बँक अधिकारी पकडले गेल्याची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली. तेव्हा व्यवस्थापन व प्रशासन यासंदर्भात अनेक अपुऱ्या बाबी उजेडात आल्या.

नोटाबंदीमुळे भ्रष्टाचारी, नकली नोटा तयार करणारे व काळा पैसा जमवणाऱ्यांवर एक प्रकारची दहशत निर्माण झाली. मोदी सरकार काहीही करू शकते हा संदेश त्यांच्यापर्यंत पोहचला. या नोटाबंदीमुळे देशाची आर्थिक स्थिती भविष्य काळात खूप सुधारेल असे मोदी सरकार सांगत असले तरी अशी वेळ पुन्हा पुन्हा येऊ नये यासाठी नियोजनबद्ध व वेळीच कार्यवाही व्हावी असे मनापासून वाटते.

**– केंगार स्वाती दत्तात्रय**
**एस.वाय.बी.कॉम**

# स्त्री भ्रूण हत्या

प्रसुतीपूर्व गर्तजळ निदान करून स्त्री भ्रूणहत्या करणे ही भावी पिढी समोरील गंभीर समस्या आहे.

देवी पार्वतीच जर नसती तर गणपती आले असते का ? मग गर्भातल्या कन्येमध्ये ही पार्वतीचे रुप पहा ना...!

भारतीय दंड संहिता कलम ३७७ समलैंगिक बंधनांना अनैतिक ठरवून त्यांना आता दखलपात्र गुन्हा

ठरवतं. आपल्या देशावर इंग्रजांचे परके सरकार होते. तेव्हा वसाहतवादी शोषणाचं धोरण राबवणाऱ्या गोऱ्या सरकारनं मेकॉलेद्वारा भारतीय दंड संहितेच्या माध्यमातून बुरसटलेल्या १९ व्या शतकातल्या व्हिक्टोरीयन नैतिकतेचे बंध आपल्यावर लादले. पण आता आपण स्वतंत्र आहोत. सम लैंगिकाना ही स्वाभिमानी राष्ट्राची गरज आहे.

कारण आपल्या देशात घरात मुलीचा जन्म झालेला कुणालाच नको आहे. सर्व घरांमध्ये मुलंच जन्मणार. मुली नकोशी झाल्या की मग एका पिढीच्या आत समलैंगिकतेशिवाय पर्यायच उरणार नाही.

मुलगी माझ्या घरात जन्माला यायला नको, पण शेजारच्या घरात मात्र जन्माला यावी. हुंडा मिळण्याच्या कामी येते आणि पुढच्या पिढीच्या कुलदिपकाचा जन्म कसा होणार ? माझ्या घरात मुलगाच जन्माला यायला हवा. कुलदीपक !

मुलगी होणार असेल तर टेन्शन नको. गर्भपात करता येतो. कायदा त्याविरूध्द आहे म्हणून काय झालं ? कायदा भ्रष्टाचार अन जातिभेदाविरूध्द सुद्धा आहे. त्यानं थांबला का भ्रष्टाचार आणि जातिभेद ? तसंच आहे. जन्माला येणारी जर मुलगी असेल तर निःस्वार्थी भावनेनं आणि कायद्यापासून धोका पत्करून गर्भपात करणारे समाजसेवक स्त्री-पुरूष डॉक्टर आहेत की; त्यांनीही शपथ घेतलेली असते ना की, रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मुलाचे गर्भ आम्ही पाडूच पाडू. शिवाय मुलीला जन्माला घालणाऱ्या आईला आपण अवदसा, पांढऱ्यापायांची म्हणतोच की.

जन्माला येणाऱ्या बाळाचं लिंग पुरुषावरून वडिलांवर ठरतं असं विज्ञान सांगतं म्हणून काय झालं ? मुलगी जन्माला आली म्हणजे काय मेली चांडाळीण, अवदसा, घरभेदी. दोष सावित्रीचा नाही असं दीडशे वर्षापूर्वी महात्मा फुले सांगून गेले. त्याचं काय राव तो काळ जुना होता. फुले महात्मा होते. आम्हाला चौकात आमचे पुतळे नकोत; घराण्याची परंपरा चालवणारा कुलदीपक हवा. मुलीला जन्माला येण्याचा हक्क नाही. आलीच तर तिला बालपणीच मारून टाकली पाहिजे. पोट भरता आलं नाही तर कुपोषण, शिक्षणाचा अभाव, गुराढोरांचं हगणं, मुतणं काढ. वर्षाच्या वर्षाला जन्माला येणाऱ्या भाऊरायाला पाठुंगळी बांधून कंबरडं मोडून घे असे अनेक उपाय आहेत. सूनबाई हुंडा आणायच्या कामी येते ना. आणला नाही किंवा आणून झाल्यावर तिचा घात झाला की तिला जाळून मारता येते. मुळात स्त्री इतकी समजूतदार आहे की, ती जाळून मारण्याची वेळ येऊ देत नाही. आपणहून दोर, पंखा, स्टोव्ह, विहिर यांना जवळ करते.

उगीच नाही आपण ईश्वराची स्त्री रुपात पूजा करणाऱ्या संस्कृतीचे वारस आहोत. ती विश्वजननी असते. जगदंबा असते, आई भवानी असते. आपण पृथ्वीला धरती माता, देशाला भारत माता, गृहिणीला गृहलक्ष्मी म्हणतो. मातृदेवो भव म्हणणारी आपली संस्कृती आहे. तिनं अमृर्त देवताच राहावं. मानवरूपात जन्म घेऊ नये. आपल्या भारत भूमीवर जेवढे महापुरूष जन्माला आले आहेत ते एका स्त्रीपोटीच जन्माला आलेले आहेत. मग का बरं ? या आपल्या पावनभूमीवर स्त्री भ्रूणहत्येसारखे प्रकार घडत आहेत. हे कुठं तरी थांबायला पाहिजे.

स्त्रीचा आदर हीच आपली संस्कृती आहे.

**कोटी कोटी ऋण तुझे । जन्म मज दिला ।।**
**मुलगी असूनही कधी । नाही दुरावा दिला ।।**
**स्त्री असूनही केला । तू माझा सांभाळ ।।**
**आई मी आयुष्यात तुझी । पावले वंदिन सांज सकाळ ।।**

**- भोसले अंजली**
एस.वाय.बी.कॉम

# स्वतःला ओळखता आले पाहिजे

जगणे ही एक शोधयात्राच आहे. यात आपली भूमिका काय ? आपले विचार, मते अनुभवांनी शिकत मांडत जायचे. कधी निर्णय होऊन मोकळे व्हायचे तर कधी अनुकरण करत जगायचं. खरंच या जीवन प्रवासात स्वतःला ओळखून जगण्याचा आनंद लूटता आला पाहिजे. तो कसा ते पाहूया.

* **तुम्ही एकमेव आहात :-** अनुकर करणे वाईट नाही पण अनुकरणाला मर्यादा पडतात. त्याऐवजी हळूहळू का होईना स्वतःची एक परंपरा निर्माण करा. असे करताना

स्वतःची तुलना कुणाशीही करु नका. तुम्ही एकमेव आहात. रातराणीने गुलाब होण्याचा प्रयत्न करू नये आणि गुलाबाने रातराणी होण्याचा हट्ट धरू नये. दोन्हीही स्वतंत्र आहेत. दोघांचा सुगंध स्वतंत्र आहे. दोघांचे सौंदर्य स्वतंत्र आहे. दोघांची ओळखही वेगळी आहे.

* **व्यक्त व्हायला शिका :–** मनातल्या भावना साठवून ठेवण्यापेक्षा त्या व्यक्त करून आपले भावविश्व स्पष्ट आणि सुंदर करणे आपल्या हातात असते. असे केल्याने आपल्या मनावरचे दडपण कितीतरी पटीने कमी होते. चिंता करत बसण्यापेक्षा हसावेसे वाटले तर मनमोकळे हसून घ्यावे. बऱ्याचदा विनाकारण सामाजिक प्रतिष्ठेमुळे आपण कितीतरी छोट्या छोट्या सुखाला गमावतो. आयुष्य फार लहान आहे. ते वाऱ्यासारखे हातातून निसटण्याआधी आनंदाने जगून घ्यावे.

* **त्रासदायक गोष्टी टाळा :–** समाजात आपल्याला विविध प्रकारची माणसे भेटणे साहजिकच आहे. त्यामुळे त्यांच्या भावभावना देखील वेगवेगळ्या स्वरूपाचे असणारच. मनाला एखादा विचार पटला नाहीतर त्याचा त्रागा करण्यापेक्षा तो त्रासदायक विचारच टाळता येऊ शकतो. असे केल्याने आपण कित्येक निरर्थक वादविवादांपासून स्वतःला वाचवू शकतो.

* **भावनांचा ओलावा महत्त्वाचा :–** जीवनात भावनांचा ओलावा अतिशय महत्त्वाचा आहे. कुटुंबाप्रती, समाजाप्रती असा ओलावा आपल्यात नसेल तर स्वतःत बदल करणे फार कठीण होऊन जाते आणि त्याचा परिणाम नातेसंबंध तुटण्यावर, स्नेहबंध दूर होण्यावर होतो. अशावेळी विश्वास आणि प्रेम नावाच्या ओलाव्याने आपण नाती सांभाळून ठेवली पाहिजे.

* **वेळ द्या, कारणे नको :–** आज जवळपास प्रत्येकाच्या मनगटावर घड्याळ आहे. पण कोणाकडेच वेळ नाही. भावनिक नात्यांना योग्य वेळी वेळ दिला नाही तर नंतर पश्चात्ताप करावा लागतो. वेळ नाही म्हणून आपण स्वतःच लहान समस्येला गंभीर वळण देतो. लक्षात ठेवा, आपल्या माणसांना वेळ देण्यासाठी इच्छाशक्ती लागते. इतर कोणतीही कारणे देणे गैर आहे. तरच आपण यशस्वी जीवनाकडे वाटचाल करू शकतो.

– **पाटील सुरज बाबासाहेब,** एस.वाय.बी.एस्सी.

# Importance of English in our life

English plays an important role in our everyday life. There is great utility of English in modern world. So, the use of English should be continued along with hindi and other regional languages. In this land of innumerable regional languages in diffrent states. English serves as a link-languages in the country.

English language is widely used in official communications, The abolition of English will adversely affect the office work Most office-goers know English, but many of them do not know other languages besides their mother-thongue or regional language. Thus, they communicate with each other in English for their everyday work. So if the office-goers are asked to bide good bye to the English language, they will face a great difficulty.

The importance of English in education and students life cannot be denied. English remains a major medium of instruction in schools. There are large number number of books that are written in English language. If English is abolished today, it will affect the education system in India. So, unless and until we translate these books into various regional language, it will affect education. But this work is very hard and time consuming indeed.

Students who want to go abroad for education will have learn to English well. If their command over English is poor, they then they may face difficulty in adjusting with the alien environment. The communication of India with other countries takes place in English language. For a developing country like India, it is essential to be in constant intercourse with other countries.

English is an important language for inter-state communications. Modern India has many large states. People of each state converse in their own language and often cannot speak or understand the regional language of other proper

In such cases, English becomes link between these people. So, here too we cannot deny the importance of English in modern India.

**- Mhaske Bhusaheb**

S.Y.B.A.

## The Pencil

A boy was watching his father wirte a letter at one point be asked "What are you writing about ? Who are you writing to ? And Why are you using a pencil ?"

His Father stopped writing the letter and said to his son " I am writing a letter about you, to your grand parents. More importantly I'm using a pencil because I hope you will be like this pencil when you grow up."

Intrigued, the boy looked at the pencil, It didn't look very special, " But it's just like any other pencil. I've ever seen, what's so different about this one ?"

Father replied "That depends an how you look at things. It has five qualities which, if you manage to hang on to them, will make you a person who is always at peace with the world."

First quality : you are capable of great things but you must never forget that there is a hand, guiding your steps. we call that hand God, and he always guides us according to His well.

Second quality : now and then, I have to stop writing and use a sharpener. That makes the pencil suffer a little, but afterwards, its much sharpener. so you too, must learn to bear certain pains and sorrows, because they will make you a better person.

Third quality : the pencil always allows us to use on eraser to rub out any mistakes. This means that correcting something we did is not necessarily a bad things : it helps to keep on the road to justice.

Fourth quality : what really matters in a pencil is not the wooden exterior, but the graphite inside. so always pay attention to what is happening inside you. Your inner self is what defines you.

Fifth quality : finally, the pencil will always leave a mark. In just the same way, you should know that everything you do in your life will leave a mark. so try to be conscious and careful in every action.

The boy will grow up, and just like every one else, he will find it very difficult to keep all those fire qualities in mind, on every step of his life. But one thing we all can do, is be strong while making our decisions, and even stronger in facing the consequence after all life is just a paper, and just like the pencil, we have our destiny in our hands.

**Gavane Yogita**

T.Y.BSc. Chemistry

## Save girl Child

The Status of girl in the Indian society has been greatly believed to be involved in the cooking and playing with dolls, while boys to be involved in the education and other physical activities from the ancient time. such old beliefs of man have simulated them for violence against woman wich resulted in the continuous decrease in the number of girl child in the society. so there is a big need to save girl child in order To equalize the ratio of both as well ensure the development of country.

Effective steps regarding save girl child. The position of girl child in indian society is backward since ages because of the extreme desire of parents for the boy child. It has created gender inequality in the society and has been very necessary to remove by bringing gender

equality. literacy is another issue which can be removed through proper education system for both genders. Empowering woman is the most effective Toll to save girl child. People should be aware through some girl child. People should be aware through some effective companions regarding save the girl child. A girl child is unsafe inside as well as outside the mother's womb. She has fear in many ways all through the life with the men whom she gives birth. She is ruled by the men whom she gives birth and it is totally the matter of laugh and shame for us. Education is the best tool to bing revolution of saving and respecting a girl child.

A girl child should be given equal access and opportunities in every field. There should be safety and security arrangement for girls at all the public places. family members of a girl child can be better target to make save the girl child campaign successful save girl child is not taken by the people as topic only. it is a social awareness which should be taken very seriously. people should save girl child and respect girl child as they have power to create a whole world. they are equally needed for the growth and development of any country.

**- Wandhekar Pravin Jagannath**

T.Y.B.A.

## Android The computing Platform

Android is a computing platform designed for use in some smart phones and other devices. This technology which is owned by Google, Inc. includes an operating system, software, and applications. Android technology is maintained and continually developed by the Android open source project (AOSP)

History of Android

Google purchased Android Inc. a-22 - month old palo Alto, California, Startup in July 2005 Android Inc. was co-founded by Andy Rubin, Maker of Mobile device Danger Inc. The Purchase was key in google's move into the wireless technology market. In 2008, Google introduced the HTC Dream as the first marketed phone to use Android technology.

Programming for Android -

Android technology is based on Java software applications. This technology requires the use of a special software development kit (SDK) toe create applications for an Android device. The SDK is freely available for download from the Internet. For this reason and because it will work an multiple operating systems, many software developers proper Android technology over that used in other smart phones.

How Android is Different -

One of the key differences between Android technology and other smart phone systems is that it is open for modification. This gives venders the opportunity to change and enhance their products based on their own preferences

This has created many versions of Android phones which can very by vendor as well as a range of other devices that use this platform.

A modified version of Android is used in the Google TV the Barnes & Nobel Nook ereader, the samsung galaxy Tab, and countless other devices.

Service Providers -

The iphone has been very popular for AT & 5, but unless you void your warranty to unlock it, you can only use on iphone with AT & T. Android is an open platform. So many carriers can potentially offer Android powered phones.

Google Services -

Because Google developed Android, it

comes with a lot of Google Services installed right out of the box Gmail, Google calendar, Google Maps and Google web search are all pre-installed, and Google is aloo the default web page for the web browser

The Bottom Line -

Android is on exciting platform for consumers and developers.

**- Bhor Nikita**
S.Y.BCS

## Cashless Economy

Introduction -

Barter System was famous in old times, that time banking system ran only on beliefs of people as time passed evolution happened in banking system and recently in 1990 electronic banking become popular By 2016's deigital payment methods were widespread in many countries with examples including intermediaries such as paybal a digital wallet systems operated by companies like. Apple, we indians are also use the electronics payment system frequently but importance was not felt until recently when our honorable pm Narendra Modi declared demonetization of Rs 500 & Rs. 1000 Notes With the cash flow deficit people are being forced to make digital payments.

Modes & digital transactions -

The various options available towards a cashless or less cash economy include unified payments Interface (UIP), Bank cards, prepaid cards, using various cards at any pos (point of sale) / ATM, unstructured supplementary service Data (USSD) based mobile Banking Adhar enabled payment system (AEPS) and e-wallet or digital wallet

Importance of digital Transactions -

The Berlin based corruption watch dog transparency International has put India at rank 76 out of 186 countries in its latest corruption perception Index while Nordic countries such as Denmark, finland and sweden topped the chart, the main reason behind this is they are cashless economies. In their economics cashless transactions are more than 80% while in India its below 20% bribes, illegal money transactions are always in cash because nobody wants to leave identity behind during such corrupt practices more the cash transactions in the economy more will be the black money and more will be the financial inequality, this results in decreasing Governmant revenue and less would be public spendings. The conclusion is more the cashless transactions in the economy more will be the transparency and Government will get relevant taxes on transaction because nobody can bypass the tax system since all the transactions are traceable by Government agencies.

Government Initiatives

Since 2013 DBT (Direct Benefit Transfer) has been implement by government of India in this scheme the beneficiaries of subsides such as LPG kerosene are directly getting the cash on their bank accounts. This scheme proved to be beneficial since cash leakages are substantially come down.

JAM trinity - JAM trinity refers to the consolidation of three critical spokes, that is prime minister Jan Dhan Yojana (PMJDY), Aadhaar and mobile connectivity (JAM) in the wheel of economic policies that are meant to drive the financial inclusion measures to bring about an overall empowerment. JAM trinity is one the key reforms undertaken to deliver the Direct Benefit Transfer (DBT) scheme, including subsidies minimum wage payments for varius government schemes and other payments.

Government from time to time unveiled many new scheme to encourage digital transactions such as 'Digi Dhan Vyapar Yojana' The RBI and finance ministry have made

financial literacy centres (FLC's) ato provide tailored financial education programers to introduce adults to banking products and setting financial goats. Recently Maharashtra Government has announced that 'Maha Wallet' Yojana will be unveiled within next few months and an army of 1000 college student volunteers will coach people on cashless transactions all in preparation for maharashtras cashless economy. FM Arun Jaitley pressed on cashless economy in latest budget.

Impediments in implementation -

Merely 26% of India has internet access and there are 200 million users of digital payment services. The world banks "Global findex" Shows that Indians are significantly less familiar with digital banking the use of credit or debit cards making transactions using mobile phones. According to Economic Survey 2015-16 DBT using JAM trinity is unlikely to work in rural areas, the urban preparedness index finds there is significant variation across stales. some stakes like M.P. and chhattisgarh show preparedness scores about 70 and others such as Bihar & Maharashtra have only 25% TRAI in its latest report stated that India has Teledensity of 83% and many users have multiple sim cards so this figure is virtual. According to the 2015 Data Breaches study by IBM and ponemon Institute, India is most targeted contry for data breaches. From above statements its clear that India is facing many issues such as poor infrastructure digital illiteracy, poor cyber security and lack of awareness among people regarding digital economy

Conclusion -

It is imperative to have cashless economic for sustanable and healthy economic growth of the countrey but this can't be achieved without sufficient teleconnectivity, good cyber security and awareness as well as inclusion of people in this process.

**- Prof. Bhise S.M.**



# पद्य विभाग

# पद्य विभाग

| अ.क्र. | कवितेचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १ | क्षितिजापलिकडे | ताडे आरती बाबासाहेब |
| २ | नातं | शेवाळे अविनाश |
| ३ | वात्सल्याची खाण | गाडे अश्विनी विठ्ठल |
| ४ | शेतकरी | तांबे मनिषा शिवाजी |
| ५ | आठवण माझीही येईल | वांढेकर प्रविण जगन्नाथ |
| ६ | आयुष्य | कराळे विठ्ठल बारकू |
| ७ | आईवडिल | गुलदगड प्रसाद |
| ८ | बदलतं आयुष्य | खामकर सचिन अशोक |
| ९ | जन्म | वाळुंज वर्षा नारायण |
| १० | आयुष्याची स्वप्ने | शिंदे पल्लवी किसन |
| ११ | आठवणींचा एक कप्पा | म्हस्के भाऊसाहेब सुभाष |
| १२ | मी मराठी | क्षिरसागर प्राची सूर्यकांत |
| १३ | शिक्षक | पंडीत सोनाली |
| १४ | मैत्री | मोरे सुरेखा गणेश |
| १५ | असं फक्त प्रेम असतं | सारंधर रजत |
| १६ | बहिण | खंडागळे विशाल |
| १७ | परीक्षा | अंदुरे अक्षय सोमनाथ |
| १८ | शिक्षणाचा बाजार | विटेकर कपिल दत्तात्रय |
| १९ | अपयश | क्षिरसागर आदित्य सुभाष |
| २० | आयुष्य हा एक प्रवाह असतो | जगताप मोनिका |
| २१ | नया रास्ता | भूतकर नम्रता |
| २२ | जिंदगी | ताडे आरती |
| २३ | चारोळ्या | मंचरे अभिजीत |
| २४ | Money | गाडे अश्विनी |
| २५ | Oral | पठारे ऋषिकेश |

## क्षितिजापलीकडे

क्षितिजापलीकडे पाहण्याची दृष्टी असेल
तर क्षितिज नक्की गाठता येते
आपल्या रक्तातच धमक असेल
तर जगही जिंकता येते
आपले क्षिजित हे आपण ठरवायचे असते
त्याच्या पलिकडे पाहण्याचं धाडस
एकदा तरी करायचं असतं
असते आपल्या रक्तात जिद्द व ताकद
त्या ताकदीला एकदा तरी
अनुभवायचं असतं...

– ताडे आरती बाबासाहेब
एफ.वाय.बी.ए.

## नातं

गरज म्हणून, नातं कधी जोडू नकोस
सोय म्हणून, सहज असं तोडू नकोस..
रक्ताचं नाही म्हणून कवडीमोल ठरवू नको
भावनांचं मोल जाण, मोठेपणात हरवू नकोस
आयुष्याच्या प्रत्येक वळणात नवं नातं जुळत जातं
जन्मभर पुरेल इतकं भरून प्रेम मिळत असतं
तुझी ओंजळ पुढे कर, कमीपणा मानू नकोस
व्यवहारातलं देणं–घेणं फक्त मध्ये आणू नकोस
मिळेल तितंक घेत रहा, जमेल तितकं देत रहा
दिलं घेतलं सरेल तेव्हा पुन्हा मागून घेत रहा
नातं म्हणजे ओझं नाही, मनापासून उमजून घे...
विश्वासाचे चार शब्द दुसरे काही देऊ नकोस
जाणीवपूर्वक नातं जप मधे माघार घेऊ नकोस...

शेवाळे अविनाश
टी.वाय.बी.एस.सी.

## वात्सल्याची खाण

आई परी या जगात कोणी नाही
तिच्या विना मला मुळीच करमत नाही
आई म्हणजे माझ्या हृदयातील श्वास
तीच आहे जीवनातील एक सुंदर सहवास
लक्ष्मीचे एक रुप म्हणजे आई
दुधावरची साय म्हणजे आई
आत्मा म्हणजेच आई
वात्सल्याची खान म्हणजेच आई
आई शब्दाची किती थोर व्याप्ती
आईमुळेच घरात नांदते सुख अन् शांती
आईमुळेच घराला येते घरपण
आई म्हणजे साऱ्यांचं सर्वस्वपण
आई म्हणजे एक वेडी माया
आई म्हणजेच थंडगार छाया
आई तुझे हे उपकार कसे विसरु
माझ्या आईचे मी आहे लाडके लेकरु...

– गाडे आश्विनी विठ्ठल
टी.वाय.बी.ए.

## शेतकरी

कष्ट करून थकलो तरी
काम माझं जीवन आहे
निसर्ग साथ देत नाही
तरी मी शेती करीत आहे ।।१।।
जीवनाच्या ह्या वाटेवर
सगळीकडे चढउतार आहे
पाण्याविना शेतं सुकली तरी
आशा मात्र जिवंत आहे ।।२।।

पावसाळा संपत आला तरी
ढगाकडे आस आहे
संसारातील राम आटला तरी
माझ्यातील शेतकरी जिवंत आहे ।।३।।
कष्ट कितीही केले तरी
दारिद्रय मात्र संपत नाही
सुख माझ्यापासून दूर कसे
स्वप्नात ही ते दिसत नाही ।।४।।

शेतकऱ्याचं मन ओळखायला
शेतकरी व्हावं लागतं,
उन्हा-तान्हात उभा राहून
रात्रीचं दिस करावं लागतं ।।५।।

– तांबे मनिषा शिवाजी
टी.वाय.बी.ए.

## आठवण माझीही येईल...

आठवण माझीही येईल मी गेल्यावर...
रात्री झोपेतून दचकून मी जागा होतो
आणि या अंधारात तुला शोधायचा प्रयत्न मी करतो
हताश होऊन पुन्हा झोपायचा प्रयत्न मी करतो
तेवढ्यात एक अश्रू डोळ्यातून गालावर येतो
सुरु होतो आठवणींचा तो खेळ...
नाही राहत पुन्हा झोपायचा ताळ-मेळ
असे का होते की आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करावे
त्या व्यक्तिने क्षणात आपल्याला सोडून जावे आणि
स्वप्नांच्या दुनियेत बांधलेले घर खाडकन फुटावे
कुठे कमी पडत होतो.
प्रत्येक वेळी तर तुलाच समजून घेत होतो
तुझ्यावर येणाऱ्या संकटांना
परतीचा रस्ता मी दाखवत होतो
तू केलेल्या प्रत्येक चुकावर माफी मी मागत होतो.
तुझ्या चुकांनी होणाऱ्या त्रासाने वेळोवेळी मीच रडत होतो
तुझ्याकडून झालेली चूक तुला कधीच दिसली नाही
माझ्या डोळ्यांतून येणाचा अश्रुनांही
किंमत राहिली नाही
काम आहे असे म्हणून तू मला टाळत होतीस
पण या कारणाखाली तूच माझ्यापासून दुरावत होतीस
वाटत होते तुला माझ्या साथीची गरज आहे
तुलाच मी समजून घेणे हेच माझ्या नशीबात आहे
आपल्यातील वाढत गेलेले अंतर
हे तर कधीच मिटले नाही
दररोज झोपताना देवाकडे एकच गाऱ्हाणे असते
तू सदैव खुश रहावी हेच माझे मागणे असते
आशा आहे तू पुन्हा माझ्याकडे परतावी
पण तू येणार नाही हे वास्तव स्विकारता येत नाही
प्रेम माझे संपणार नाही
मी मेल्यावर पण आठवण माझीही येईल
मी गेल्यावर... आठवण माझीही येईल !

– वांढेकर प्रविण जगन्नाथ
टी.वाय.बी.ए.

## आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही
हरवला तो आपसांतला
जिव्हाळ्याचा संवाद

एकमेकांस दोष देऊन
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
ह्रदयाचे पाऊल कधी
ह्रदयाकडे वळत नाही
इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही
क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या

**– कराळे विठ्ठल बारकू**
टी.वाय.बी.ए.

## आई–वडिल

मला या पृथ्वीतलावर आणणारे
माझ्यावर निस्वार्थपणे प्रेम करणारे
दुःखाच्या क्षणी सावरणारे
सुखात सामील होणारे
चुकल्यानंतर समजवणारे
रुसल्यानंतर मनवणारे
तोंडात घास घालणारे
जगण्यास बळ देणारे
नैराश्यात आशेचा किरण दाखवणारे
उडण्यासाठी पंख देणारे
नेहमी प्रेरणा व प्रोत्साहन देणारे
ते म्हणजे आई–वडिल

**प्रसाद गुलदगड**
एफ.वाय.बी.कॉम

## बदलतयं आयुष्य

घरात टी.व्ही. आला
मी वाचन विसरलो !
दारात गाडी आली
मी चालणे विसरलो !
हातात मोबाईल आला
मी पत्रलेखन विसरलो !
कॅल्क्युलेटरच्या वापरामुळे
मी पाढे म्हणणेच विसरलो !
एसीच्या संगतीने
झाडाखालचा गारवाच विसरलो !
शहरात राहिल्यामुळे
मातीचा वासचं विसरलो !
सतत धावत असतांना
क्षणभर थांबणं विसरलो !
व्हाटस्ॲप आल्यापासून
सुखाने झोपणेही विसरलो !

**– खामकर सचिन अशोक**
एस.वाय.बी.एस.सी.

## जन्म

जन्माला आला आहेस
थोडं जगून बघ
जीवनात दुःख आहे
थोडं सोसून बघ
चिमुटभर दुःखाने कोसळू नको
दुःखाचे डोंगर पचवून बघ
यशाची चव चाखून बघ
घरटं बांधणं सोप असतं
थोडी मेहनत करून बघ
जगणं कठीण मरण सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना सोसून बघ
जीवन मरण एक कोडं असतं
जाता जाता एवढं कोडं सोडवून बघ

**वाळुंज वर्षा नारायण,** एस.वाय.बी.एस.सी.

## आयुष्याची स्वप्ने

आयुष्याची स्वप्ने पाहताना
वास्तवाला कधी विसरायचं नसतं.
गुलाबाला स्पर्श करताना
काट्याचं भान मात्र ठेवायचं असतं
जीवन हे शून्यातून निर्माण करायचं असतं
आपल्या आई-वडिलांचे आणि समाजाचे
ऋण फिटल्याशिवाय मरणाचं नाव कधीही घ्यायचं नसतं
कारण ते फक्त एकदाच मिळत असतं.
एकदा अपयश आलं म्हणून खचायचं नसतं
यशाच्या आशेने पुन्हा उभे रहायचं असतं
कारण अपयश ही यशाची पहिली पायरी असते
ती चढल्याशिवाय कधीही रहायचं नसतं...

**शिंदे पल्लवी किसन,** टी.वाय.बी.ए.

## आठवणींचा एक कप्पा

अडगळीच्या खोलीमधलं
दप्तर आजही जेव्हा दिसतं
मन पुन्हा तरूण होऊन
बाकावरती जाऊन बसतं
प्रार्थनेचा शब्द अन् शब्द
माझ्या कानामध्ये घुमतो
गोल करून डबा खायला
मग आठवणींचा मेळा जमतो
या सगळ्याच लाल खुणांनी
गच्च भरलेली माझी वही
अपूर्णतेचा शेरा आणि
बाई तुमची शिल्लक सही
रोजच्या अगदी त्याच चुका
आणि हातावरचे व्रण
वहीत घट्ट मिटून घेतलेले
आयुष्यातले कोवळे क्षण
पण या सगळ्या शिदोरीवरच
बाई मी आता रोज जगतो
चुकलोच कधी तर तुमच्यासारखं
स्वतःलाच रागावून बघतो
इवल्याशा या रोपट्याची
तुम्ही एवढी वाढ केली
हमखास हातचा चुकण्याचीसुद्धा
सवय आता गेली
चांगले अक्षर आल्याशिवाय
माझा हात लिहून देत नाही
एका ओळीत सातवा शब्द
आता ठरवून सुद्धा येत नाही
दोन बोटे संस्कारांचा
समास तेवढा सोडतो आहे

फळ्यावरच्या सुविचारासारखी
रोज माणसे जोडतो आहे
योग्य तिथे रेघ मारून
प्रत्येक मर्यादा ठेवलेली
हळव्या क्षणाची काही अक्षरे
ठळक अक्षरांत गिरवलेली
तारखेसह पूर्ण आहे वही
बाई फक्त एकदा पाहून जा
दहा पैकी दहा मार्क आणि
सही तेवढी देऊन जा

**– म्हस्के भाऊसाहेब सुभाष**
एस.वाय.बी.ए.

# मी मराठी

नाद मराठी
नाळ मराठी
सप्तसुरांचा ताल मराठी
काळजाचा ठोका मराठी
लक्ष्य गाठणारा झोका मराठी
साद मराठी, प्रतिसाद मराठी
श्वास मराठी, विश्वास मराठी
साज मराठी
आवाज मराठी
माझा हरेकअंदाज मराठी
वर्तमान मराठी
भविष्य मराठी
हरेक क्षण
आयुष्य मराठी

**– क्षीरसागर प्राची सूर्यकांत**
टि.वाय.बी.ए.

# शिक्षक

शिक्षक म्हणजे काय असतात ?
उजेडाचा गाव असतात
ज्ञानामृत पाजणारे
विद्यार्थ्यांचा देव असतात ।।१।।
शिक्षक म्हणजे काय असतात ?
विद्यार्थ्यांचा मित्र असतात
गरजूवंत, गुणवंताच्या
डोक्यावरचे छत्र असतात ।।२।।
शिक्षक कधी छडी असतात
शिक्षक कधी गोडी असतात
विद्यार्थ्यांना पैलतीरी
सोडणारी होडी असतात ।।३।।
विद्यार्थी येतात, विद्यार्थी जातात
शिक्षक मात्र तेथेच राहतात
विद्यार्थ्यांच्या यशामध्ये
स्वतःची स्वप्ने पाहतात ।।५।।

**– पंडीत सोनाली**
**एस.वाय.बी.कॉम**

# मैत्री

आयुष्याचे गणित खूप वेळा केले
पण मैत्रीचे गणित कधी जमलेच नाही
जेव्हा जमले तेव्हा समजले की
आठवण सोडून काही उरलेच नाही
अश्रूंनाही मोती बनवते मैत्री
वेदनेवर फुंकर घालते मैत्री
जेव्हा जीवन जगण्यात अर्थ उरत नाही
तेव्हा मृत्यूलाही जीवन बनवते मैत्री

सुखमय करणारा आयुष्याचा प्रवास
आयुष्याच्या वाटेवर थांबायच नसतं
यशाचे पैलतीर गाठायचं असतं
नशीबच कोणी दुसरं लिहित नसतं
आपल नशीब आपल्याच हाती असतं
येताना काही आणायचं नसतं
जाताना काही न्यायचं नसतं
मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं
या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठीच जन्माला यायचं असतं

**– मोरे सुरेखा गणेश**
एफ.वाय.बी.कॉम

# असं फक्त प्रेम असंत...

असं फक्त प्रेम असतं...
त्याला हृदयातच जपायचं असतं
सुखाचा महासागर, दुःखाचा डोंगर
हास्याचा फुलोरा, कोसळणारा अश्रुंचा मनोरा
फुलपाखरासारखं चंचल, दगडासारखं अचल
असं फक्त प्रेम असतं...
प्रेमात अधिकार असतो
पण गाजवायचा नसतो
प्रेमात गुलाम असतो
पण राबवायचा नसतो
असं फक्त प्रेम असतं.
नेहमीच एकट्याचं असतं
पण दुसऱ्याशिवाय शक्य नसतं
कळत नकळत कसं होतं
ते मात्र कधीच कळत नसतं
असं असं फक्त प्रेमच प्रेम असतं...

**सारंगधर रजत**
एफ.वाय.बी.कॉम

# बहिण

प्रत्येकाला एक बहिण असावी
मोठी शांत लहान खोडकर कशीही असावी
पण एक बहिण असावी...
मोठी असेल तर आई भावांपासून वाचवणारी
लहान असेल तर आपल्या पाठीमागे लपणारी
मोठी असल्यास गुपचूप आपल्या पॉकेटमध्ये
पैसे ठेवणारी
लहान असल्यास चूपचाप काढून घेणारी
लहान असो वा मोठी
छोट्या छोट्या गोष्टीसाठी भांडणारी
एक बहिण प्रत्येकाला असावी...
मोठी असल्यास आपलं चुकल्यावर कान ओढणारी
लहान असल्यास तिचं चुकल्यावर सॉरी दादा म्हणणारी
लहान असो वा मोठी
एक बहिण प्रत्येकाला असावी...
आपल्या एखाद्या मैत्रिणीला वहिनी
म्हणून हाक मारणारी
एक बहिण प्रत्येकाला असावी...
मोठी असल्यास प्रत्येक महिन्याला नवा शर्ट आणणारी
लहान असल्यास प्रत्येक पगारात
आपल्या खिशाला चंदन लावणारी
ओवाळणी काय टाकायची हे
स्वतः ठरवत असली तरीही
तितक्याच ओढीने राखी पसंत करून आणणारी
स्वतःपेक्षा ही जास्त आपल्यावर प्रेम करणारी
प्रत्येकाला एक बहिण असावी...!

**– खांडरे विशाल**
टि.वाय.बी.कॉम

# परीक्षा

परीक्षा एक खूण असते
आपण केलेल्या अभ्यासाची
परीक्षा एक संधी असते
आपल्याला पुढे जाण्याची ।।१।।

परीक्षा एक काळजी वाटते
विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याची
परीक्षा एक भिती असते
अभ्यास न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ।।२।।

परीक्षा एक कसोटी असते
खेळणाऱ्या खेळाडूंची
आक्रमण ही परीक्षा असते
युध्दाला सामोरे जाण्याची ।।३।।

परीक्षा एक प्रयत्न असतो
असूरांना बळी चढवण्याचा
परीक्षा एक दंडक आहे.
सत्याला न्याय देण्याचा ।।४।।

**अंदुरे अक्षय सोमनाथ**
एस.वाय.बी.कॉम

# शिक्षणाचा बाजार

ओळखलंत का सर मला
बेकार आला कोणी
हातात आहे पदवी
अन डोळ्यामध्ये पाणी
क्षणभर बसला नंतर हसला
बोलला वरती पाहून
शिकतच बसलो सर
शेतीकाम गेले राहून

नोकरीची आशा मनात
भिंगरीसारखी फिरली
शिक्षणाचा खर्च करता-करता
शेतीवाडी विकली

शेत गेले काम सरले
होते नव्हते गेले
प्रसाद म्हणुन हातात फक्त
गुणपत्रक तेवढे राहिले

खिशाकडे हात जाता
हसत हसत उठला
पैसे नकोत सर
जरा एकटेपणा वाटला

फोन तेवढा लावून सर
शिफारस माझी करा
पैसे मी जमवलेत सर
वशिला लावून भरा...

**विटेकर कपिल दत्ता्र**
एस.वाय.बी.कॉ

# अपयश

खूप ताकद लागते
आलेले अपयश पचवायला
डोळ्यात आलेलं पाणी पुसून
ओठांवर हसू खेळवायला
आपण केलेले सारे प्रयत्न
वाऱ्यासरशी उडून जातात
रंगवलेली सारी स्वप्ने
सुगंधासारखी उडून जातात.
खूप कष्ट घ्यावे लागतात

मनाला परत उभे रहायला
डोळ्यात आलेलं पाणी पुसून
ओठांवर हसू खेळवायला
आलेलं अपयश एक आव्हान असते.
त्याला न स्विकारता जगणं हे जगणंच
असते
काही ध्येय लागतात आपल्याला आयुष्यात
जगायला
शेवटी अपयशाची गरज असते.
मनाला खंबीर बनवायला
डोळ्यात आलेलं पाणी पुसून
ओठांवर हसू खेळवायला !
ओठांवर हसू खेळवायला !!!

**– क्षिरसागर आदित्य सुभाष**
एफ.वाय.बी.कॉम

# आयुष्य हा एक प्रवाह असतो

या प्रवाहात
सत्कर्मांच्या दिव्य फुलांनी
हे जीवन सुगंधित करणारे
आपणा सारखे कर्मयोगी
फारच कमी आढळतात
अशाच दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी
तुमचं एक व्यक्तिमत्त्व
सर्वांना भारावून टाकणारं
मनात आपोआप
आदरभाव निर्माण करणारं
विश्वासाने अन प्रेमळपणाने
तुम्ही माणसं जोडलीत
आमचं मन जिंकलत
अन आमचे आदर्श झालात
या उत्तुंग हिमालयाच्या सावलीत
राहणारे आम्ही पामर..
आमच्या सारख्यांना काय देणार
तरी अशा शुभ क्षणी हीच सदिच्छा
उदंड आयुष्य लाभो. हीच इच्छा

**– जगताप मोनिका**
एस.वाय.बी.कॉम.

# नया रास्ता

अन्याय के रास्तों को,
नया रास्ता दिखाओ ।
विषमता की परंपरा,
को अब भूल जाओ ।
अंधश्रध्दा के पंडितो को,
विज्ञान से शर्माओ ।
इक्किसवी शताब्दी को,
प्रगती से जगाओ ।
नहीं अब अतिरेकी नहीं अब दंगे,
चारों तरफ हो मंगल ही मंगल ।
बंजर जमीन खेत उदास,
आधुनिक यंत्रोसे करेंगे विकास ।
लोग अब नहीं रहेंगे निरक्षर
सब जनता को करेंगे साक्षर ।
चुनेंगे ज्ञान की मोती,
आगे बढाएँगे शिक्षण की ज्योती ।।

**– भूतकर नम्रता**
एफ.वाय.बी.कॉम

# जिंदगी

कभी हार तो कभी जीत, यह है जिंदगी की रित
कभी आशा तो कभी निराशा, यह है जिंदगी का तमाशा
कभी हँसी तो कभी आँखो में पानी,
यही है जिंदगी की कहानी
कुछ खोना, तो कुछ पाना,
यही है जिंदगी का सपना
कभी रुकता तो कभी चलता
जिंदगी में गिरता है सँभलता
कभी कहना तो कभी चूप रहना
कोई करता है प्यार तो काई करता दिल्लगी
हार नही मानी यार, यही है जिंदगी

**ताडे आरती बाबासाहेब**
एफ.वाय.बी.ए.

# चारोळ्या

१) छोट्याशा या आयुष्यामध्ये
खूप काही हवं असतं
असंख्य चांदण्या भरून सुध्दा
आपल आभाळ रिकाम असतं.

२) पळुन पळुन घड्याळ इतकं थकत असतं.
चावी दयायची विसरली तर
ते सुध्दा मध्येच थांबून बसतं

३) पाण्यात राहायचे तर माशाशी
नुसती मैत्री करून भागत नाही
स्वतःला ही मासा बनावे लागते

४) प्रत्येकाला वाटतं एक आभाळ असावे
भरारण्यासाठी प्रत्येकाला एक घर असावं
संध्याकाळी परतण्यासाठी

**मंचरे अभिजीत,** एस.वाय.बी.कॉम.

# Money

Money can by : jewelry
but no beauty.
money can buy medicine.
but not health.
money can give education
but not intelligence.
money can buy plenty of matters
but not friend.
money is something
but not everything.

**Ashwini Gade**
T.Y.B.A.

# My Ty. Bsc. Oral

In BSc. life some orals are there.
For oral, I sit in front of the external's chair.
External asks me what is a other ?
But I can't answer.
so, external syas, see dear.
Your basic concepts are not clear.
So please try next year.
After that my eyes are full of tear.
Now I have changed my studies gear.
I along with my friends basic concepts share.
In theis year, I go to oral there
I give every answer clear.
I get good marks and reach to first class near.
Now about oral I am taking special care.

**Patare Hrushikesh**
T.Y.BSc.

# विभागीय अहवाल

# विभागीय अहवाल

| अ.क्र. | अहवाल |
|---|---|
| १ | मराठी विभाग |
| २ | हिंदी विभाग |
| ३ | इंग्रजी विभाग |
| ४ | इतिहास विभाग |
| ५ | अर्थशास्त्र विभाग |
| ६ | भूगोल विभाग |
| ७ | वाणिज्य विभाग |
| ८ | रसायनशास्त्र विभाग |
| ९ | प्राणीशास्त्र विभाग |
| १० | वनस्पतीशास्त्र विभाग |
| ११ | पदार्थविज्ञान विभाग |
| १२ | संगणकशास्त्र विभाग |
| १३ | ग्रंथालय विभाग |
| १४ | जिमखाना विभाग |
| १५ | मराठी वाङ्मय मंडळ |
| १६ | सांस्कृतिक मंडळ |
| १७ | राष्ट्रीय सेवा योजना |
| १८ | विद्यार्थी विकास मंडळ |
| १९ | बहिःशाल विभाग |
| २० | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र |
| २१ | प्रसिद्धी विभाग |
| २२ | पर्यावरण जाणिव जागृती उपक्रम |
| २३ | महिला तक्रार निवारण समिती |
| २४ | परीक्षा विभाग |

# मराठी विभाग

मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयास २००९ रोजी विद्यापीठ मान्यता मिळाल्यापासून मराठी विभाग कार्यरत आहे. मराठी विभागाच्या अंतर्गत महाविद्यालयात काव्यवाचन तसेच गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विशेष मार्गदर्शन व्याख्याने आयोजित केली जातात. शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून मराठी विषय विशेषस्तरावर अध्यापन केला जात असून अनेक विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत असलेले दिसून येत आहेत. मराठी विषयाच्या दर्जेदार अध्यापनामुळे मराठी विषयाचा निकाल उत्तरोत्तर प्रगतीपथावर आहे. यामध्ये प्रा. नेटके राजेश अविनाश यांचे सहकार्य मिळत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये डॉ. संदिप सांगळे (तळेगांव ढमढेरे) तसेच शै. वर्ष २०१४-१५ मध्ये डॉ. प्रतिभा घाग (शिक्रापूर, पुणे) यांची गुणवत्तासुधार योजनेअंतर्गत व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे शै. वर्ष २०१५-१६ मध्ये महाविद्यालयीन स्तरावर काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शै. वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम स्तरावर एकूण ९७ विद्यार्थ्यांनी मराठी विषय घेतला आहे. तसेच सामान्य स्तरावर एकूण १४ विद्यार्थी व विशेष स्तरावर एकुण ७ विद्यार्थी मराठी विषय घेऊन अध्ययन करीत आहेत. या वर्षी अ.नगर येथील कवी श्री. बाळासाहेब अमृते यांचे 'मातृपंचक' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले.

शै. वर्ष २०१६-१७ मधील वैयक्तिक अहवाल पुढील प्रमाणे

**प्रा. डॉ. पिसाळ के.आर.**

एम.ए. बी.एड., एम.फिल, सेट, पीएच.डी. (मराठी)

* दि. २७/९/२०१६ रोजी एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावेडी, अ.नगर येथे राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
* दि. ६/१२/२०१६, रोजी मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय अ.नगर रा.से.यो. विशेष हिवाळी शिबिरात 'राष्ट्र उभारणी व युवक' या विषयावर व्याख्यान तसेच सहकार्यक्रम अधिकारी म्हणून सहभाग.
* दि. ३०/१२/२०१६ रोजी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर, जि. पुणे येथे झालेल्या छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम केले.
* दि. ३१/१२/२०१६ रोजी संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य व ब.ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यव्यापी नोंद लेखकांची कार्यशाळेमध्ये सहभाग.
* दि. ५/१/२०१७ ते ११/१/२०१७ या कालावधीत एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण.

  दि. २०/१/२०१७ रोजी जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, ज्ञानेश्वरनगर, भेंडे, अ.नगर येथे राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये 'साहित्य आणि मानसशास्त्र' या विषयावर निबंध सादर केला.
* दि. २७/१/२०१७ रोजी पेमराज सारडा महाविद्यालय अ.नगर येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने 'मराठी संवर्धन' या विषयावर व्याख्यान.
* दि. ६ व ७ फेब्रुवारी २०१७ रोजी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर, जि. पुणे येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत निबंधवाचन केले. तसेच ''डॉ. होमराजन गौरिया यांचे मराठी भाषा व साहित्याला योगदान'' या विषयावरील आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये लेख प्रकाशित

* दि. २७/२/२०१७ रोजी काकासाहेब म्हस्के प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, नागापूर, अ.नगर येथे जागतिक मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान

**प्रा. नेटके आर.ए.**

एम.ए. (मराठी) सेट, पीएच.डी. कार्यरत

* दि. १९ व २० डिसेंबर २०१६ रोजी जनता कला, विज्ञान महाविद्यालय रूईछत्तिसी ता. अ.नगर येथे राज्यस्तरीय चर्चासत्रात 'महात्मा ज्योतीराव फुले यांचे शेतीविषयक विचार' या विषयावर निबंध सादर केला.
* दि. २२/१२/२०१६ रोजी न्यु आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज शेवगांव, जि. अ.नगर येथील राज्यस्तरीय चर्चासत्रात 'संत तुकारामांच्या अभंगातील मूल्ये' या विषयावर निबंध वाचन केले.
* दि. १३ व १४ जानेवारी २०१६ रोजी प्रवरा महाविद्यालय, लोणी येथे राष्ट्रीय चर्चासत्रात 'लोकसाहित्य आणि संत साहित्य' या विषयावर निबंध वाचन केले.
* दि. २० व २१ जानेवारी २०१६ रोजी जिजामाता महाविद्यालय भेंडे ता. नेवासा येथे राष्ट्रीय चर्चासत्रात 'संत तुकारामांच्या तत्वज्ञानातील लोकतत्त्वे' या विषयावर निबंधवाचन केले.

**– मराठी विभागप्रमुख**
प्रा.डॉ. पिसाळ के.आर.

## हिंदी विभाग

महाविद्यालय का आरंभ २००९–२०१० में हुआ था। महाविद्यालय में कला शाखा के अंतर्गत हिंदी विषय सामान्यस्तर और विशेषस्तर पर पढाया जाता हैं। महाविद्यालय में प्रथम से तृतीय वर्ष कला शाखा में सामान्यस्तर पर और द्वितीय तथा तृतीय वर्ष को सामान्यस्तर और विशेषस्तरपर तथा वाणिज्य विद्याशाखा में प्रथमवर्ष को वैकल्पिक विषय के रूप में पढाया जाता हैं। महाविद्यालय की प्रारंभिक वर्ष २००९–२०१० में प्रथम वर्ष के लिए ४० छात्रों ने पंजीकरण किया था। अगले साल वर्ष २०१०–२०११ में हिंदी यह विषय विशेषस्तर पर पढाना प्रारंभ हुआ। महाविद्यालय में छात्रों का हिंदी विषय के प्रति विशेष रुची दिखायी देती है। विभाग की और से प्रतिवर्ष हिंदी दिवस मनाया जाता है। इस अवसर पर १४ सितंबर से हिंदी सप्ताह मनाया जाता हैं। हिंदी सप्ताह में महाविद्यालय में विभाग की ओर से विभिन्न प्रतियोगिताओं का आयोजन किया जाता है। जिसके अंतर्गत काव्यपाठ, निबंधलेखन, आदि उपक्रमों का आयोजन किया जाता हैं। इन उपक्रमों में छात्रों को पुरस्कृत भी किया जाता है।

शैक्षिक वर्ष २०१६–१७ के लिए प्रथम वर्ष सामान्यस्तर हिंदी के लिए छात्रों की संख्या ९७ हैं। द्वितीय वर्ष सामान्यस्तर के लिए २५ तथा विशेषस्तर के लिए १४ छात्र पंजीकृत है। तृतीय वर्ष के लिए सामान्यस्तर पर १८ तथा विशेषस्तर के लिए १० छात्र हैं। इस वर्ष महाविद्यालय में १५ सितंबर २०१६ को हिंदी दिवस समारोह का आयोजन किया गया। इस कार्यक्रम के लिए मुख्य अतिथी के रूप में न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड साइन्स कॉलेज, अहमदनगर के हिंदी विभाग के डॉ. अशोक गायकवाड जी उपस्थित थे। इस कार्यक्रम के लिए महाविद्यालय के प्रधानाचार्य डॉ. टि.एम. वराट अध्यक्ष के रूप में उपस्थित थे। इस कार्यक्रम में महाविद्यालय के छात्रों ने काव्यपाठ प्रस्तुत कियें। इस कार्यक्रम के लिए हिंदी विभागाध्यक्ष स.प्रा. दहातोंडे एस. बी.जी.ने कार्यक्रम का प्रास्ताविक किया और हिंदी विभाग के स.प्रा. काले एस.बी.जी. ने इस कार्यक्रम का सूत्रसंचालन किया। अंतराष्ट्रीय हिंदी दिन २५ जनवरी २०१७ को महाविद्यालय में अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर के हिंदी विभाग द्वारा आयोजित हिंदी भाषा और वैश्विक स्तर इस विषय पर हुए निबंध लेखन में महाविद्यालय के हिंदी विभाग के छात्रों ने सहभाग लिया।

हिंदी विभाग के लिए महाविद्यालय में छात्रों के लिए हिंदी की हंस, मिडीया विमर्श, अनुवाद, शब्द सरोकार, दक्षिण

भारत, प्रतियोगीता, प्रतीक, व्यंग यात्रा, बसव मार्ग, नागरी संगम, स्पाईल दर्पण आदि मासिक, द्वैमासिक और त्रैमासिक पत्रिकाएं ग्रंथालय में उपलब्ध है। साथ ही कमिक पाठ्यपुस्तकों के अलावा संदर्भ ग्रंथ उपलब्ध है। साथही केंद्रीय हिंदी निदेशालय के तरफ से प्रतिवर्ष महाविद्यालय को संदर्भ ग्रंथ भेट किये जाते है।

हिंदी विभाग के प्राध्यापक

## १. सहा. प्रा. दहातोंडे सोपान भानुदास

M.A. Hindi, M.A. Education, SET., NET, Ph.D. App.

### शोधकार्य एवं शैक्षिक उपलब्धियाँ

- ✼ महाविद्यालय में सितंबर २०१२ से हिंदी विभागाध्यक्ष के रुप में कार्यरत
- ✼ २०१२ से २०१५ तक २२ विभिन्न संगोष्ठियों में सहभाग जिसमें ०३ अंतराष्ट्रीय, १२ राष्ट्रीय तथा ०७ राज्यस्तरिय संगोष्ठीयों में सहभाग जिसमें १३ शोध पत्र प्रकाशित हुए है साथही ७ शोध प्रपत्रों का प्रस्तुतीकरण किया गया।
- ✼ सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय में ''प्रवासी हिंदी साहित्यकार सुरेशचंद्र शुक्ल शरद आलोक का साहित्यः संवेदना एवं शिल्प'' इस विषयपर पीएच.डी स्तर का शोधकार्य शुरु।
- ✼ दि. १८ जनवरी २०१६ को ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा में राष्ट्रीय संगोष्ठी में ''साहित्यिक विधाओं में अनुवाद की समस्याएः काव्यानुवाद के विशेष संदर्भ में ''विषय पर शोधालेख का प्रकाशन।
- ✼ २ फरवरी २०१६ को जनता महाविद्यालय, रूईछत्तिसी में राज्यस्तरिय संगोष्ठी में ''भारतीय त्योहार और पर्यावरण ''इस विषयपर शोधालेख प्रकाशित।
- ✼ १३ फरवरी २०१६ को महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा मे राष्ट्रीय संगोष्ठी में '' समकालिन हिंदी कविता : संवेदना और स्वरूप'' विषयपर शोधालेख का प्रस्तुतीकरण।
- ✼ २३ सप्टेंबर २०१६ को न्यू आटर्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर में अंतराष्ट्रीय संगोष्ठी में ''सुरेशचंद्र शुक्ल के काव्य में पर्यावरण चेतना'' विषयपर शोधालेख प्रकाशित।
- ✼ दिसंबर २०१६ को नार्वे की अंतराष्ट्रीय हिंदी नार्वेजीयन द्वैमासिक पत्रिका में प्रवासी साहित्यकार सुरेशचंद्र शुक्ल जी का साक्षात्कार प्रकाशित।
- ✼ महाविद्यालय में २०१३-१४ से महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी के रूप में कार्यरत।
- ✼ महाविद्यालय में २०१४-१५ से विद्यार्थी कल्याण अधिकारी के रुप में कार्यरत।

## २. सहा. प्रा. काले सुभाष आप्पासाहेब

M.A. Hindi, M.phil.SET. Ph.D. App.

### शोधकार्य एवं शैक्षिक उपलब्धियाँ

- ✼ महाविद्यालय में जून २०१६ से हिंदी सहायक प्राध्यापक के रूप में कार्यरत
- ✼ २०१३ से २०१६ तक ९ विभिन्न संगोष्ठियों मे सहभाग जिसमें ६ राष्ट्रीय संगोष्ठीयों में सहभाग और ०३ संगोष्ठीयों में शोध पत्र प्रकाशित हुए है।
- ✼ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद में ''डॉ. विवेकी राय के कथासाहित्य में लोकसंस्कृति'' विषयपर पीएच. के शोधकार्य में कार्यरत।

# DEPARTMENT OF ENGLISH

English language is one of the important language, because it has achieved important place on international platform. in this modern era use of English in every sphere of life and knowledge increased day by day and So it is a major subject in teaching and learning process than other languages in India.

The college has established in 2009. From 2009 English subject has been teaching in six classes as compulsory subject and every year result of English is also better maximum student has passed with well marks in this subject for well score in English subject and command over English language I have guided student through focusing on the enrichment of L.S.R.W. and tried to bring intellectual prosperity among them.

I am very please to infrom you that from academic year 2017-18 college is going to start specialization in English for deeps knowledge about language and literature.

**Prof. Phatangare P. A.**
Head of the Dept. of English

# इतिहास विभाग

२४ सप्टेंबर २००९ रोजी पुणे विद्यापीठाची मान्यता मिळून महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला प्रथम वर्ष कलाविभागात ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला व अध्यापनाचे कार्य सुरू करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१०-११ या वर्षी ५ विद्यार्थ्यांनी इतिहास विषय विशेष स्तरावर घेऊन आज ती संख्या १४ आहे. आजपर्यंत इतिहास विषयाचा निकाल उत्तरोत्तर प्रगती पथावर आहे. शैक्षणिक वर्ष २००९ ते २०१६ पर्यंतचे एकूण विद्यार्थी व इतिहास विषयाच्या विद्यार्थी संख्येचा अहवाल खालीलप्रमाणे

| अ.नं. | शैक्षणिक वर्ष | एफ.वाय. बी.ए. एकुण विद्यार्थी | एस.वाय. बी.ए. | | | टी. वाय. बी.ए. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकुण विद्यार्थी | इतिहास जनरल | इतिहास स्पेशल | एकुण विद्यार्थी | इतिहास जनरल | इतिहास स्पेशल |
| १ | २००९-१० | ४० | - | - | - | - | - | - |
| २ | २०१०-११ | ५२ | २१ | १४ | ०५ | - | - | - |
| ३ | २०११-१२ | १२० | ३३ | ११ | ०७ | २० | ०९ | ०५ |
| ४ | २०१२-१३ | १२० | ८८ | ५३ | ३३ | ४१ | १९ | १३ |
| ५ | २०१३-१४ | ११९ | ६४ | ३० | २० | ५८ | ३५ | २८ |
| ६ | २०१४-१५ | १११ | ५८ | २६ | १४ | ५४ | ३० | १९ |
| ७ | २०१५-१६ | ९९ | ५७ | ३० | २१ | ३३ | १३ | ०७ |
| ८ | २०१६-१७ | ९६ | ६४ | ३९ | १७ | ४२ | २० | १४ |

अशाप्रकारे आजपर्यंत ५४ विद्यार्थी इतिहास विषय घेऊन बी.ए.पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी बहुतांश विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहे.

गुणवत्ता सुधार व विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन :

दि. ९-१२-२०११ व्याख्याते. प्रा.नवथर एस.एल., न्यु आर्टस् महाविद्यालय शेवगांव, कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्रा. डॉ. अशोक सागडे, संयोजक प्रा. मरकड एस. व्ही.

दि. १९-०२-२०१२ व्याख्याते प्रा. डॉ. विजय कदम (इतिहास विभाग प्रमुख) अहमदनगर कॉलेज अहमदनगर

दि.२०-०२-२०१५ व्याख्याते - इंजिनीयर संजीवजी भोर पाटील (शिवप्रहार संघटनेचे अध्यक्ष) अहमदनगर.

दि. २२-०२-२०१६ व्याख्याते मा. श्री. अफसर शेख (शिव व्याख्याते) शिवजयंती कार्यक्रम

दि.२०-०२-२०१७ व्याख्याते प्रा. सचिन मोरे (अहमदनगर कॉलेज, अहमदनगर), कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. टी.एम. वराट

**शैक्षणिक सहल व प्रकल्प कार्ये :**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षापासून नवीन अभ्यासक्रमानुसार तृतीय वर्ष बी.ए. इतिहास विशेष स्तर -३ या विषयाकरिता ५० गुणांची वार्षिक परीक्षा आहे व महाविद्यालयाकडे ५० गुण असून ३० गुणांसाठी क्षेत्रीय भेट व प्रकल्प कार्य यासाठी आहे. यासाठी शैक्षणिक सहल अनिवार्यआहे. दि. १-२-२०१६ या दिवशी १३ विद्यार्थी सहभागी होऊन अहमदनगर येथील वस्तू संग्रहालय, भुईकोट किल्ला, चाँदबीबी महाल व काही पुरातन मंदिरांना भेट देऊन प्रत्येक विद्यार्थ्यांनी वेगळा विषय घेऊन प्रकल्प कार्ये पूर्ण केले. मौखिक परीक्षेसाठी व प्रकल्प कार्यासाठी बाह्य परीक्षक म्हणून दि.१८-०३-२०१६ रोजी प्रा. डॉ. भारती नवथर (इतिहास विभाग प्रमुख) आर्टस् सायन्य ॲण्ड कॉमर्स कॉलेज राहुरी यांनी काम पाहिले.

**राष्ट्रीय, राज्यस्तरिय चर्चासत्र व कार्यशाळेत सहभाग :**

**प्रा. मरकड. एस. व्ही.**

एम.ए. इतिहास, एम.ए.हिंदी.,बी.एड

- दि. १३ सप्टेंबर २०१० रोजी महाविद्यालयात रुजू असून कला शाखा प्रमुख व इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१० ते २०१५ पासून ०२ राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध वाचन केले असून नियकालिकामध्ये लेख प्रकाशित आहे व ०५ राज्यस्तरिय चर्चासत्रात सहभाग असून शोधनिबंध वाचन केले.
- मार्च २०१६ (बी.सी.यू.डी. सावित्रीबाई फुले, पुणे युनिर्व्हसिटी) अंतर्गत बी.ए.नवीन अभ्यासक्रम कार्यशाळा सहभाग.
- दि. ९ फेब्रु. २०१६ या कालावधीत जनता आर्टस् ॲण्ड सायन्य कॉलेज,रूईछत्तीसी अ.नगर राज्यस्तरिय चर्चासत्रात 'आदर्श पर्यावरण संरक्षण छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर शोधनिबंध वाचन केले व ''बदलत्या पर्यावरणाचा समाजावरील परिणामः एक आंतरविद्याशाखीय अभ्यास'' नियतकालिकामध्ये लेख प्रकाशित.
- दि. २ फेब्रु. २०१६ अहमदनगर कॉलेज, अ.नगर राज्यस्तरिय चर्चासत्रात 'आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील सहकार महर्षी मारूतरावजी घुले पाटील' या विषयावर शोधनिबंध वाचन केले व 'आधुनिक जडणघडणीतील महाराष्ट्र' या नियतकालिकात लेख प्रकाशित.

* दि. १६ व १७ फेब्रु. २०१७ सावित्रीबाई कला महाविद्यालय पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा राज्यस्तरिय चर्चासत्र यात 'सबलर्टन इतिहास लेखनातील :महाराष्ट्रातील आदिवासी समाज' या विषयावर शोधनिबंध वाचन केले व भारतीय इतिहास लेखनातील नवीन प्रवाह या नियतकालिकामध्ये लेख प्रकाशित

* दि. २० व २१ जाने. २०१७ बाबुजी आवहाड महाविद्यालय पाथर्डी अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद २५ व्या रौप्य महोत्सवी राष्ट्रीय अधिवेशनात 'महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे आद्य पुरूषःराजर्षी छत्रपती शाहुमहाराज' या विषयावर शोधनिबंध वाचन केले.

* दि. ४ फेब्रु. २०१७ दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय आदिनाथनगर राज्यस्तरिय चर्चा सत्रात 'छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे पर्यावरण पूरक विचार' या विषयावर शोधनिबंध वाचन केले व मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय इतिहास या नियतकालिकात लेख प्रकाशित.

**महाविद्यालयातील सहभाग**

१) कला शाखा प्रमुख २०१० पासून कार्यरत.
२) प्रसिध्दी विभाग प्रमुख
३) परीक्षा विभाग (सहाय्यक)
४) स्पर्धा परीक्षा (सदस्य)
५) शिस्त विभाग (सदस्य)
६) सांस्कृतिक विभाग (सदस्य)
७) क्षितिज वार्षिक अंक (सह. संपादक)

### प्रा. सोनवणे गिताबाई शिवराम

एम.ए.बी.एड, नेट, सेट (इतिहास)

शैक्षणिक वर्ष २०१४ पासून सहाय्यक प्राध्यापक इतिहास या पदावर कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०१४ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक कोर्स पूर्ण करून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमात सहकार्यक्रम अधिकारी म्हणून काम केले. शैक्षणिक वर्ष २०१४ ते २०१५ यामध्ये एक राष्ट्रीय व दोन राजयस्तरीय चर्चासत्रात सहभाग घेतला. यामध्ये राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध प्रसिध्द करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ यामध्ये दि. २०/२/१७ ते २१/२/२०१७ रोजी बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी येथे महाराष्ट्र इतिहास परिषद रौप्यमहोत्सवी अधिवेशनात सहभाग. महाविद्यालयातील इतर उपक्रमात सहभाग.

इतिहास विभाग प्रमुख

**प्रा. एस.व्ही.मरकड**

# अर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयाची सुरूवात शैक्षणिक वर्ष २००९-१० ला झाली. त्यावेळी प्रथम वर्ष कला शाखेत ५० विद्यार्थी संख्या होती. शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये द्वितीय वर्ष सुरू झाले. तेवहा अर्थशास्त्र हा विषय पदवीस्तरावर विशेषस्तर सुरू करून महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग सुरू झाला. त्यावेळी १५ विद्यार्थ्यांनी हा विषय निवडला. २०१०-११ पासून २०१७ पर्यंत विद्यार्थी संख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांचा अर्थशास्त्र विषयाकडे वाढता कल लक्षात घेता चर्चासत्र असे वेगवेगळे उपक्रम विभाग अंतर्गत आयोजित केले जातात.

गुणवत्ता सुधार कार्यक्रम व्याख्याने

महाविद्यालयात अर्तशास्त्र विभाग सुरू झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रा. डॉ. राजेंद्र शिंदे, पेमराज सारडा महाविद्यालय अ.नगर यांनी 'भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर व्याख्यान दिले.

२०१४-१५ मध्ये गुणवत्ता सुधार कार्यक्रमाअंतर्गत प्रा. संजय बाबर यांनी 'अर्थशास्त्राचे व्यावहारिक महत्त्व' या विषयावर व्याख्याने दिले.

२०१६-१७ या शैक्षणिक वर्षात दि. ०१/०३/२०१७ रोजी 'नोटाबंदीचे समाजावर होणारे चांगले वाईट परिणाम' या विषयावर प्रा. डॉ. वैशाली पाटील, राधाबाई काळे महिला महाविद्यालय अ.नगर यांचे व्याख्यान झाले.

शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून ते २०१६-१७ पर्यंत या महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागात प्रा. पाऊलबुध्दे ए.आर व प्रा. झिंज एन.एन. हे प्राध्यापक कार्यरत आहेत. प्रा. पाऊलबुध्दे डी.आर. यांचे २००९-१० ते २०१६-१७ पर्यंत राज्यस्तरीय कार्यशाळेत २ पेपर सादर झाले. तसेच अभ्यासक्रम निवड चर्चासत्रात ३ वेळेस सहभाग नोंदविला आहे. प्रा. झिंज एन.एन. यांनी अभ्यासक्रम निवड चर्चा सत्रात एक वेळेस सहभाग नोंदविला आहे.

**अर्थशास्त्र विभाग प्रमुख**

प्रा. पाऊलबुध्दे ए.आर.

# DEPARTMENT OF GEOGRAPHY

Since the establishment of the college itself in 2009 the college offers Geography subject to undergraduate degree students of bachelor of arts at general level. Most individual define geography as a field of study that deals with maps. This definition is only partially correct. Geography may be defined as the study of natural and human constructed phenomena relative to a spatial dimension. In the geography disciplined studies, physical characteristics of the Planet, Earth eg. Lithosphere, Atmosphere, Hydrosphere, Biosphere etc. as well as human constructed phenomena like agriculture, settlement, population, transportation etc. besides, environment and human interactions, areal differentiation is also studied in the subject. The subject is also applicable in many areas vig-Remote sensing, GIS, Competitive Examination, Agriculture, Regional Planning Etc.

The department has equipped with geographical tools like Maps, Charts, Globes along with reference books, text books, atlases, etc. Teaching - Learning is carried out with the aid of power point presentation, educational video clips for better understanding, geographical documentaries etc. In addition topical lectures conducted by experts under special guidance.

For creating awareness among the students various days are celebrated in the department like Environment Day, Literacy Day, Population Day and Geography day. As a part of curriculum the department organises education tours to visit various location and places of geographical importance.

The department has organised a lecture on "Introduction to Geography and Opportunities for Geographers" on 26th August 2015 by Prof. N.K. Agale, Dnyneshwar Arts, Commerce and Science College, Newasa.

**Academic Activities of Faculty :**

**Dr. T.M. Varat :** (Academic year 2016-17)

**Invited as a Resource person** : 1) Lecture delivered on Research Methodology in Ph.D. Workshop held at Ahmednagar College on 8-6-2016.
: 2) State level seminar on Global Issues and Movements held at Newasa College on 17-01-2017.

**Paper Presentation** : 1) National Seminar on Application of GIS in geographical study held at S.P. College, Pune on 30-01-2017

**Research Paper Publications**

1) Title : "Rural - Urban differences in Occupational structure of population" published under ISSN- 2278 Nov 2016
2) Tittle : "A Geographical Assessment of Environmental Problems" published under ISSN 2394 on Sep. 2016
3) Title : A geogrpahical study of Clied Sex Ratio published under ISSN-2394 on Oct. 2016

**Research Guidance to**

1) Awarded Ph.D. degree to Mr. Nikam under the guidance of Dr. T.M. Varat Dec. 2016.

2) Submitted M.Phil dissertation by Mr. Satpute to SPPU under the guidance of Dr. T.M. Varat on Jan 2017

**Ph.D. Referee** : Assessed Ph.D. Thesis for the following universities during 2016-17
- Swami Ramanand Teerth, Marathwada University, Nanded
- Dr. Babasaheb Ambedkar, Marathwada University, Aurangabad
- Tilak Mahashtra University, Pune

**2. Asst. Prof. A. S. Darandale** (2014-2016)

Qualified UGC cum CBSE NET exam for lectureship in June 2015 with 60.57 %.

Participated in National Seminar on Conservation and Management of Natural Resources (Soil and water) in India in January 2016.

**Asst. Prof. Amol Shankarao Darandale,**
Head, Department of Geography

# वाणिज्य विभाग

जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव ने संचलित मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय नागापूर अ.नगर शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून वाणिज्य प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातून ''विपणन व्यवस्थापण'' व ''बँक व्यवसाय व वित्त व्यवहार'' हे स्पेशल विषय शिकविले जातात.

प्रथम वर्षापासून वाणिज्य शाखेचे सर्व वर्गाचे निकाल ८०% पेक्षा जास्त आहेत. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेशित विद्यार्थी संख्या १५० पेक्षा अधिक असून यात पुढील शैक्षणिक वर्षात ५०% वाढ होण्याची अपेक्षा आहे.

चालू शैक्षणिक वर्षात दि. २८-७-२०१६ रोजी प्रथम वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना ''विद्यार्थी जडणघडण'' या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. के.आर. पिसाळ व वाणिज्य शाखेचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

दि. २६-१२-२०१६ रोजी वाणिज्य शाखेची औद्योगिक क्षेत्र भेट नेवासा तालुक्यातील भेंडा येथे श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना या ठिकाणी गेली होती. या वेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक शेवाळे साहेब, जनरल मॅनेजर शिंदे साहेब, जनसंपर्क अधिकारी म्हस्के साहेब यांनी विद्यार्थ्यांना कारखान्यातील साखर उत्पादनाच्या विविध प्रक्रियाबाबत मार्गदर्शन केले. तसेच विधानसभा सदस्य पाडुरंग अभंग साहेब, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.जे. आप्पाराव, उपप्राचार्य डॉ. एस.बी. काळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून मार्गदर्शन केले.

यशस्वी उद्योजक व औद्योगिकरणाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी; यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांनी मार्गदर्शन केले. यामधून विद्यार्थ्यांनी औद्योगिक क्षेत्र भेट प्रकल्प तयार केला. ही शैक्षणिक सहल यशस्वी होण्यासाठी वाणिज्य विभाग प्रमुख के.आर. ढोबे, प्रा. के.बी. ताके, प्रा.पी.एस. साबळे, प्रा.एन.एन. झिंज व कला विभागप्रमुख प्रा.

एस.व्ही. मरकड प्रा. एस. ए. काळे यांनी सहकार्य केले.

वाणिज्य पदवी मिळाल्यानंतर नोकरी अथवा स्पर्धा परीक्षेसाठी दि. १५-२-२०१७ रोजी ''वाणिज्य व करिअर'' या विषयावर प्रेमराज सारडा महाविद्यालयाचे प्रा.एस.डी.थोरात यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

दि. ७/३/२०१७ रोजी एफ.वाय.बी.कॉम. या वर्गासाठी 'अकाऊंट' या विषयावर न्यु आर्टस् कॉमस् अॅण्ड सायन्स कॉलेजचे उपप्राचार्य झेंडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य व वाणिज्य विभागाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होऊन भविष्यात त्यांना सर्व अडचर्णींना धैर्याने सामोरे जाण्याचे मनोबल या विभागामार्फत वाढविण्याचे काम विभागातील सर्व प्राध्यापक सातत्याने करत असतात.

**प्रा. ढोबे. के. आर**
वाणिज्य विभाग प्रमुख

## DEPARTMENT OF CHEMISTRY

The Department of Chemistry has started from the establishment of college, since the academic year 2009-10 the department has been running success fully on the path of progress. In this department the specialization has started from 2012-13 and 13 student selected chemistry as special subject since 2012-13 the strength of student found continuously increased.

In Academic year 2016-17 thirty student select chemistry as special subject on the basis of its industrial importance as well as major subject in science faculty. The department has arranged Educational Exursion for deep knowledge of chemistry subject.

In every academic year, The result of the department has been better and those students has passed in chemistry with higher marks, They get more opportunities to seek the job in various pharmaceutical industries.

In department of Chemistry there are four teaching faculty members.

**Prof. Dongare A.U.** (Msc-NET)
Participated in National level conference and two state lavel conference in 2012-13 participated in state level conference. on "Recent Development In material Characterization and its impact on material research" in 2017 at JiJamata College of Science Bhenda.

**Prof. Shelar S.S.** (Msc. B.Ed)
13 year teaching experience

**Prof. Sangale A.N.** (MSc. B.Ed)
- Visited at IMS College A.Nagar for Fest-Der-Tech-2016 The district level technology based compitition on 28-8-2016 at A.Nagar

**Prof. Pawale B.S.** (Msc.)

★ Participated in National Conference on "Recent development chemical science (RDCS-2016) at Radhabai kale Mahila Mahavidyalaya A.Nagar.

★ Invited as judge for compition "HTML web designing at IMS College A.Nagar 'Fest-Der-Tech-2016' The district level technology based compitition, on 28-8-2016

**- Assit. Prof. Dongre A.U.**
Head of the Department Chemistry &
Faculty Incharge Science

# DEPARTMENT OF ZOOLOGY

Department of Zoology has been working from the foundation of college especially 2009 - 2010. Every year number of students has been studding in this subject & their results are also satisfactory.

In academic year 2016-17 various activities has arranged by department such as.

Educational trips c for visit to agricultural farm in Mahatma Phule Agricultural university rahuri by second year B.Sc. Students

- Visit to Mula dam for study of water body & their ecosystem.
- Department also arranged seminars of students trough power point presentation
- Department also participated in National Science day in the college.

From academic year 2016-17 Asst. prof. K.D. Jagtap is working as Head of the zoology department and he had also participated in two national conference.

Head participated in two national Conferences.

1) Dada patil Mahavidyalaya Karjat under title "Recent trends in life science"

2) New Arts commerce & science college, Ahmednagar under title "Biodiyersity of India past present future - 2015

**-Prof. K.D. Jagtap**
Head of the department

# DEPARTMENT OF BOTANY

The Botony department Constantly on progress since the college has established. The Department has Organized various Programs for all round development of Students in the subject. Such as Educational Excursion and lectures under quality improvement program me.

From 2009 -10 the subject has been teaching as a general subject. In academic year 2016-17 for F.Y.B.Sc. 14 student choose botony as a general subject and is S.Y.BSc. 33 students select same subject.

The result of Department is Satisfactoraly Maximum Students passed in this subject every year.

In this Academic year The head of Department prof. Matade B.B. organised Educational Excursion (Dt. 17/01/2017) under the subject of Bio Technology, Medicinal plant, Tissue culture and They visit Mahatma Phule Agricultural University Rahuri for the detail study of BioTechnology In this Exeursion Prof. Jagtap K.D. and Prof. Pavale Madam play vital role to Encourage Students to understand the new knowledge about this subject.

**Prof. Matade B.B.**
Department of Botany

# DEPARTMENT OF PHYSICS

Physics department is one of the Important department of this college. Prof. Doiphode is Head Department of Physics.

Prof. Doiphode Attended International seminar at Jijamata college Arts & Science of Bhenda on 20 Jan 2017 on Sub. "Recent Development in material characterization & It's impact on material Research "& attended one day state level seminar at shree Dyaneshwar college Newasa on 21 Jan on subject Renewable energy resources opportunities in India"

For Students -

For impropement is students personality and to face the challanges of todays competitive world. We arrange guest lecture's & celebrate National science day 28 Feb. for every year. Guest of this year for science day was Dr. V.K. Dhas He gives Knouwledge on "raman effect" to our students all student are participated in this lacture and take We should focused on research without any boundaries of frame.

**- Prof. Doiphode S.B.**
Head of Deparment

# DEPARTMENT OF COMPUTER SCIENCE

Department of Computer Science has started in our college in year 2010-11, This department start for special goal to seek an opportunity to rural as well as urban area students. We know to maintain our tradition of excellent academic record and we are proud to tell that Alumni holding on top most position in information & technology industry in India.

The department has fully facilitate computer laboratories equiped with cilent server connection, wi-fi and all latest technologies, so that our students connected with world always been. our computer laboratory are fully facilitating multiple operating system like windows, linux etc.

Department has highly professional & dedicated teacher always trying to deliver 100% to student By following university schedules of syllabus & practical. Department providing to an number of reference books to student. so that non-of the student should be left behind.

Department always looking for an opportunity to organize or to be a part of extra curricular activity to bring versatility among the student. The students had participated in IMS College, A.Nagar Competition "fun-fare 2016". competition like HTML page developing, paper presentation quiz competition & got prices.

**- Prof. Tambe R.B.**
Head of Department

# ग्रंथालय विभाग

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून ग्रंथालय विभाग कार्यरत आहे. सुसज्ज व समृध्द ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा व विकासाचा मार्ग असल्यामुळे ग्रंथालयात २००९ ते २०१६ पर्यंत अंदाजे पाच लाख रूपये किंमतीची पुस्तके खरेदी केलेली आहे. यामध्ये अभ्यासक्रम, संदर्भ ग्रंथ व स्पर्धा परीक्षा पुस्तकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच अवांतर विषयाची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

आज अखेर आपल्या महाविद्यालयातील ग्रंथालयात ३५०० पुस्तके असून कला, वाणिज्य व शास्त्र शाखेतील विद्यार्थी त्यांचा नियमित वापर करतात. याशिवाय ग्रंथालयात नियमित मासिके, नियतकालिके व संशोधन पत्रिका विद्यार्थी व शिक्षकांना अध्ययन, अध्यापन व संशोधनासाठी मागविल्या जातात. सद्या ग्रंथालयात ८ मासिके, ८ नियतकालिके ६ संशोधन पत्रिका मागविल्या जात असून दरवर्षी त्यामध्ये वाढ होत असते. त्याद्वारे सतत नवनवीन अद्ययावत विषय माहिती विद्यार्थी व शिक्षकांना पुरविली जाते.

याशिवाय ग्रंथालयात सर्व प्रकारची वर्तमानपत्रे (मराठी, हिंदी, इंग्रजी) नियमितपणे येत असून विद्यार्थी व शिक्षकांसाठी वाचनकक्ष तयार करण्यात आला आहे. नवीन इमारतीत ग्रंथालयामध्ये अभ्यासिकेबरोबरच अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.

**- प्रा. आहेर अ. के.**
प्रभारी ग्रंथपाल

# जिमखाना विभाग

जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव-ने- संचलित मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय नागापूर अ.नगर शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून जिमखाना विभाग कार्यरत आहे.

सुरुवातीपासूनच जिमखाना विभागात विविध खेळाचे साहित्य उपलब्ध आहे.

* शैक्षणिक वर्ष २०१०-११ या वर्षी झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत मुलांनी खो-खो स्पर्धेत भाग घेऊन चांगली कामगिरी केली.
* शैक्षणिक वर्ष २०११-१२ या वर्षी झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत ॲथलॅटिक्स स्पर्धेत भाग घेतला.
* शैक्षणिक वर्ष २०१२-१३ या वर्षी झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत संगमनेर येथे झालेल्या ॲथलॅटिक्स स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चांगली कामगीरी केली.

तसेच 7th National Budo Martial Arts Championship 2013 या स्पर्धेत F.Y.BSc. मधील विद्यार्थीनी घेमुड कोमल हिने तिसरा क्रमांक मिळविला.

* शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षी झालेल्या आंतर महाविद्यालय स्पर्धेत ॲथलॅटिक्स स्पर्धेत गोळा फेक व ८०० मीटर धावणे स्पर्धेत चांगली कामगिरी केली.

तसेच या वर्षी महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले. यामध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

* शैक्षणिक वर्ष २०१४-१५ या वर्षी झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा (श्रीरामपूर सी.डी. जैन कॉलेज) मध्ये आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी राहुल राजू येनगुल (कॉमर्स) हा विद्यार्थी (६० कि.ग्रॅ.) गटात प्रथम आला व त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षी जिजामाता कॉलेज भेंडा येथे झालेल्या आंतर महाविद्यालय कबड्डी स्पर्धेत चांगली कामगिरी केली.

तसेच सी.डी. जैन कॉलेज श्रीरामपूर येथे झालेल्या आंतर महाविद्यालय बॉक्सिंग स्पर्धेत (५२ कि.ग्रॅ.) गटात आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी सागर केवट दुसरा क्रमांक मिळवून विभागीय पातळीवर निवड झाली.

**शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी**

आपल्या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार प्रथम वर्ष सर्व वर्गासाठी विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी परीक्षेचे आयोजन दि. १५ व १६ मार्च २०१६ रोजी करण्यात आले होते.

* शैक्षणिक वर्ष २०१६-१७ शैक्षणिक वर्षात आंतरमहाविद्यालय कबड्डी स्पर्धा जिजामाता कॉलेज भेंडा येथे विद्यार्थांनी भाग घेऊन चांगली कामगिरी केली. तसेच बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला.

# मराठी वाङ्मय मंडळ

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या ठायी असणाऱ्या साहित्यिक गुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांना मराठी साहित्याची आवड निर्माण व्हावी यासाठी हे मंडळ कार्यरत आहे. मराठी वाङ्मय मंडळाचे प्रथम उद्घाटन ५ सप्टेंबर २०१२ रोजी प्राचार्य डॉ. के. एस. सोनवणे यांच्या शुभहस्ते शिक्षकदिनाचे औचित्य साधून करण्यात आले होते. त्यानंतर या मंडळाच्या माध्यमातून काव्यवाचन, निबंधलेखन असे उपक्रम राबविले गेले आहेत.

शै. वर्ष २०१६-१७ मंडळाचे उद्घाटन मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. शिरीष लांडगे, (भेंडे, ता. नेवासा) यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम.वराट हे होते. याप्रसंगी त्यांनी मराठी साहित्याची विविध रुपे विशद करून सांगितली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच दि. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी महाविद्यालयात जागतिक मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अहमदनगर येथील नवोदित कवी श्री. बाळासाहेब अमृते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विविध कवितांचे सादरीकरण करून मराठी भाषेचे श्रेष्ठपण विद्यार्थ्यांना पटवून दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य टी.एम. वराट हे होते. यावेळी शिंदे रोहिणी, जाधव सुषमा, भूतकर नम्रता, गवळी शुभांगी, ताडे आरती, वांढेकर प्रविण, केंगार स्वागी या विद्यार्थ्यांनी काव्यवाचन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. के.आर. पिसाळ यांनी केले तर आभार प्रा. आर.ए. नेटके यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**– प्रा.डॉ. पिसाळ के.आर.**

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख

# सांस्कृतिक मंडळ

शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय सुरु आहे. त्यामध्ये सांस्कृतिक विभाग विविध कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन करत असतो. महाविद्यालयाचा प्रारंभ झाल्यापासून आज अखेर सर्व थोर व्यक्तींची जयंती आणि पुण्यतिथी साजरी करत असतो. तसेच महाविद्यालयाचे प्रेरणास्थान स्वर्गीय मारूतरावजी घुले पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहाने महाविद्यालयात साजरी केली जाते. या जयंतीसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी प्रतिसाद देतात. या जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालयात दरवर्षी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, इ. विविध कार्यक्रम साजरे केले जातात,

वक्तृत्त्व स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी ओंकार खुंठाळे, राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होऊन द्वितीय पारितोषिक मिळविले आहे.

* शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षात ८-७-२०१६ रोजी स्व. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांची १४ वी पुण्यतिथी साजरी केली.
* ५ सप्टेंबर २०१६ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी केली.
* १५ सप्टेंबर २०१६ रोजी स्व. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांची ८६ वी जयंती साजरी करण्यात आली या

निमित्ताने महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा, इ. कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे न्यु आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर येथील माजी सिनेट सदस्य मा. शिवाजी साबळे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मारूतरावजी घुले पाटील यांचे जीवनकार्य उलगडून सांगितले.

* चां. ता. बोरा महाविद्यालय शिरूर येथे राज्यस्तरीय छत्रपती संभाजी महाराज वाद-विवाद स्पर्धेसाठी कु. स्वाती केंगार, आणि भाऊसाहेब म्हस्के हे दोन विद्यार्थी 'नोटाबंदी सकारात्मक की नकारात्मक' हा विषय घेऊन सहभागी झाले होते.

* दि. २-१०-२०१६ रोजी महात्मा गांधी जयंती स्वच्छता अभियान कार्यक्रमाने साजरी केली.

* दि. २-१-२०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी अनेक विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

* दि. १-२-२०१७ या दिवशी महाविद्यालयातील कु. स्वाती केंगार व ओंकार खुंठाळे प्रेमराज सारडा महाविद्यालय लोकसत्ता वक्तृत्त्व स्पर्धा २०१७ यामध्ये 'माझी देशभक्ती' हा विषय घेऊन सहभागी झाले होते. यामध्ये ओमकार खुंठाळे याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

* दि. ७-२-२०१७ ते ११-२-२०१७ पर्यंत महाविद्यालयात विविध प्रकारचे डेज साजरे करण्यात आले. त्यामध्ये साडी डेजला मुलींनी मोठ्या प्रमाणात उत्सफूर्तपणे प्रतिसाद दिला. तसेच पारंपारिक डेजच्या दिवशी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, बाळासाहेब ठाकरे, शेतकरी अशा अनेक वेशभूषा करून आनंद साजरा केला.

* दि. १९-२-२०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे अहमदनगर महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. सचिन मोरे यांनी 'शिवचरित्राकडे विद्यार्थ्यांनी वैचारिक दृष्टीकोनातून पहावे' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर सांस्कृतिक विभाग नेहमीच कार्यरत असतो. वर्षभरातील विविध उपक्रम साजरे करण्यासाठी प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांची प्रेरणा सांस्कृतिक मंडळाला मिळत असते आणि हे कार्यक्रम घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळ व आर्टस, कॉमर्स, सायन्स शाखेतील सगळे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी सहकार्य करतात.

**– प्रा. ढोबे के.आर.**

सांस्कृतिक विभाग प्रमुख



# राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयाची शै. वर्ष २००९ साली स्थापना झाल्यानंतर शै. वर्ष २०१४-१५ साली राष्ट्रीय सेवा योजना विभागास ५० विद्यार्थ्यांच्या एककास मान्यता मिळाली. त्यानंतर ५० विद्यार्थ्यांची निवड करून रा. से. योजनेचे उद्घाटन जिल्हा कार्यक्रम अधिकारी समन्वयक प्रा. डॉ. मालुंजकर (पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर) यांचे शुभहस्ते करण्यात आले.

शै. वर्ष २०१४-१५ मध्ये रा.से. योजना विभागातर्फे विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, रस्ता सुरक्षा अभियान, राष्ट्रीय सेवा योजना दिन, महात्मा गांधी जयंती असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याबरोबरच विद्यार्थ्यांचे प्रबोधन होण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

या वर्षी रा.से.यो. विभागातर्फे विशेष हिवाळी शिबीर इसळक ता.जि.अ.नगर येथे घेण्यात आले. यासाठी रा.से.योजनेतील २५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. हे शिबीर ११ डिसेंबर २०१४ ते १७ डिसेंबर २०१४ या कालावधीत घेण्यात आले या शिबिराचे उद्घाटन युवा नेते मा.श्री. क्षितिज घुले पाटील यांनी केले. या कार्यक्रमास सरपंच सौ. गेरंगे, प्रा.डॉ. मालुंजकर, मा.श्री. प्रताप शेळके पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. के.आर. पिसाळ उपस्थित होते. या कालावधीत स्त्री साक्षरता, जलसुरक्षा, ऊर्जा संवर्धन ही उद्दिष्ट्ये समोर ठेवून गावामध्ये कामे करण्यात आली. त्यासाठी इसळक ग्रामस्थ व सर्व प्राध्यापकांचे सहकार्य मिळाले. या शिबीर काळात श्रमदानाबरोबरच विविध वक्त्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. दि. १२/१२/२०१४ रोजी सामाजिक कार्यकर्ते मा. दिपक काळे यांचे 'सामाजिक बांधिलकी' दि. १३/१२/२०१४ रोजी प्रा.डॉ. के.आर. पिसाळ यांचे 'ग्राम इतिहास', दि.१४/१२/२०१४ रोजी प्रा.डॉ. वाडकर यांचे 'अंधश्रध्दा निर्मूलन', दि. १५/१२/२०१४ रोजी प्रा. डॉ. अनिल गर्जे यांचे 'व्यक्तिमत्त्व विकास' आदी विषयांवर व्याख्याने घेण्यात आली. त्यास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबिराच्या अखेर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

या शिबिराचा समारोप प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के.के. पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी इसळक गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. के.आर. पिसाळ सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवकवृदांचे सहकार्य लाभले.

रा. से. योजनेअंतर्गत इसळक हे गाव तीन वर्षासाठी दत्तक घेऊन पुढील कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. शै. वर्ष २०१५-१६ मध्ये नियमित कार्यक्रमांअंतर्गत स्वच्छ भारत अभियान घेऊन युवा सप्ताह, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण आदी कार्यक्रम घेण्यात आले. या वर्षीचे शिबिर दि. १३ ते १९ डिसेंबर २०१५ रोजी घेण्यात आले. यावेळी शैक्षणिक धोरण, अंधश्रध्दा निर्मूलन, ग्रामराज्य, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता ही उद्दिष्टये निश्चित केली. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री. के.के. पवार यांचे शुभहस्ते करण्यात आले.

या शिबीर काळात दि. १४/१२/२०१५ रोजी उज्ज्वला दिदी यांचे 'अध्यात्म व युवक', दि.१५/१२/२०१५ रोजी प्रा.डॉ. खरात यांचे 'राष्ट्रविकास व व्यक्तिमत्त्व विकास', दि. १६/१२/२०१५ रोजी प्रा. दरंदले यांचे 'जल संवर्धन', दि. १७/१२/२०१५ रोजी प्रा. दहातोंडे यांचे 'वैज्ञानिक दृष्टिकोन', दि. १८/१२/२०१५ रोजी प्रा. डॉ. पिसाळ यांचे 'महिला सबलीकरण' या विषयावर व्याख्याने घेण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सरपंच रावसाहेब गेरंगे, उपसरपंच अमोल शिंदे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ, ग्रामपंचायत सदस्य, प्राध्यापकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शै. वर्ष २०१६-१७ मध्ये नियमित कार्यक्रमाबरोबरच महात्मा गांधी जयंती निमित्त रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात

आले. तसेच युवा सप्ताहानिमित्त अ.नगर रामकृष्ण मिशनचे अध्यक्ष शेखर देव यांनी तरूण भारत या विषयावर मार्गदर्शन केले. रा.से.यो. दिनानिमित्त रा.से.यो. प्रशिक्षण केंद्रप्रमुख प्रा.डॉ. शाळीग्राम (अ.नगर कॉलेज) यांनी रा.से.यो. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट हे होते. त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनास प्रा. दरंदले यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

या वर्षी दि. ५ ते ११ डिसेंबर २०१६ या कालावधीत विशेष हिवाळी शिबीर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन सरपंच रावसाहेब गेरंगे यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे समन्वयक प्रा. डॉ. आर.आर. सासवडे, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

शिबीर काळात महिला सबलीकरण, पर्यावरण जाणीव जागृती, रस्ता सुरक्षा अभियान, जलसंवर्धन ही उद्दिष्ट्ये समोर ठेवून गावात कामे करण्यात आली. यामध्ये स्वच्छतेबरोबरच बंधारा बांधण्यात आला. तसेच रा.से.यो. विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून समाज प्रबोधन केले. या शिबिराचा समारोप इसळक गावचे उपसरपंच श्री. अमोल शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी सरपंच रावसाहेब गेरंगे, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट, दै. प्रभात, अ.नगर कार्यकारी संपादक श्री. कदम, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचेच सहकार्य मिळाले.

**– प्रा. नेटके आर.ए.**
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

## विद्यार्थी विकास मंडळ

शै. वर्ष २००९ पासून महाविद्यालय सुरु झाले. सा.फु.पुणे विद्यापीठामार्फत प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले असून महाविद्यालयातील एक प्राध्यापक विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्त केला जातो. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अनेक उपक्रम या विभागामार्फत राबविले जातात. त्यानुसार शै. वर्ष २००९-१० ते शै. वर्ष २०११-१०१२ प्रा. जाधव जी.एल. यांनी काम पाहिले. या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना व विशेष मार्गदर्शन योजना प्रभाविपणे राबविण्यात आल्या. शै. वर्ष २०१२-१३ ते शै. वर्ष २०१४-२०१५ प्रा.डॉ. के.आर. पिसाळ यांनी विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून काम पाहिले. या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना व विशेष मार्गदर्शन योजना राबविण्यात आल्या.

शै. वर्ष २०१४-१५ ते शै. वर्ष २०१६-२०१७ प्रा. एस.बी. दहातोंडे यांनी विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून काम पाहिले. या कालावधीत डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना, विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व योजना व निर्भय कन्या योजना प्रभाविपणे राबविण्यात आल्या. शै. वर्ष २०१६-२०१७ मध्ये विद्यार्थी कल्याण मंडळाचे नवीन विद्यापीठ कायद्यान्वये 'विद्यार्थी विकास मंडळ' असे नामकरण झाले. विद्यार्थी कल्याण अधिकारी हे आता 'विद्यार्थी विकास अधिकारी' या नावाने संबोधले जातात.

या शै. वर्षामध्ये विद्यार्थी विकास मंडळामार्फत विविध योजना राबविण्यात आल्या त्यांचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे

**डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना वार्षिक अहवाल – २०१६-२०१७**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळास पाठवलेल्या प्रस्तावानुसार महाविद्यालयास कर्मवीर भाऊराव

पाटील कमवा व शिका योजनेस ३०/०८/२०१६ रोजी मान्यता मिळाली तसेच विद्यापीठाकडून रूपये २०००० चा प्रथम हप्ताही महाविद्यालयाला बँक खात्यात प्राप्त झाला. त्यानंतर गरजू व सहा लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या एकुण ३० (तीस) विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये १५ विद्यार्थी व १५ विद्यार्थीनींची निवड करण्यात आली.

विद्यार्थी विकासमंडळाच्या नियमानुसार कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर विद्यार्थ्यांचा आवडीनुसार महाविद्यालयातील कामाचे वाटप करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करून कामास सुरुवात झाली. जुलै महिन्यात एकुण ४६ तास विद्यार्थ्यांनी काम केले. ऑगस्ट महिन्यात ३९४ तास काम विद्यार्थ्यांनी केले. सप्टेंबर महिन्यात या योजनेत विद्यार्थ्यांनी अधिक उत्साहाने काम केले. यामध्ये महाविद्यालय परिसरातील गवत काढणे, ग्रंथालय स्वच्छता करणे, ग्रंथालयातील पुस्तके व्यवस्थित ठेवणे, सायन्स लॅब स्वच्छ करणे आदी कामे केली.

ऑक्टोबर महिना हा परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा असूनही विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद या योजनेस मिळाला. या कालावधीत कॉलेज ऑफिसमध्ये विद्यार्थ्यांना काम दिले. तसेच केमिस्ट्री लॅब, कॉम्प्युटर लॅब यामध्ये असणाऱ्या साहित्याची स्वच्छता करून व्यवस्थित मांडणी केली. या महिन्यात विद्यार्थ्यांनी एकुण ७२८ तास काम केले. ऑक्टोबर महिन्यात परीक्षेचा कालावधी असूनही गरजू विद्यार्थ्यांनी १४० तास काम केले.

नोव्हेंबर महिन्यात दिवाळी सुट्टी होती. त्यानंतर डिसेंबर, जानेवारी, व फेब्रुवारी या तीनही महिन्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. या तीनही महिन्यात विद्यार्थ्यांनी ग्रंथालय, परिसर स्वच्छता, गवत काढणे, वृक्षारोपण करणे, ऑफिस देखभाल व्यवस्था, कॉम्प्युटर लॅब, सायन्स लॅब साफसफाई अशा विविध प्रकारची कामे केली. या तीनही महिन्यात अनुक्रमे ५५४, ४१६, ६६९ तासांचे काम विद्यार्थ्यांनी केले.

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा गरजू विद्यार्थी व महाविद्यालयास खूप उपयोग झाला. विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे आम्ही ऋणी आहोत. हा उपक्रम यापुढेही सुरु राहावा हीच सदिच्छा !

## विशेष मार्गदर्शन योजना वार्षिक अहवाल २०१६-१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळास पाठविलेल्या प्रस्तावानूसार ३०/०८/२०१६ रोजी ही योजना महाविद्यालयात राबविण्यास परवानगी मिळाली. त्यानुसार प्रथम वर्ष वर्गाच्या विद्यार्थ्यांना या विशेष मार्गदर्शन योजनेचा लाभ मिळावा या करिता महाविद्यालयाने दि. १९/१२/२०१६ ते २३/१२/२०१६ या कालावधीत महाविद्यालयातील नियमित तासिका संपल्यानंतर १०.३० ते १२.३० या वेळेत कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेच्या प्रथमवर्ष वर्गासाठी आयोजन करण्यात आले.

कला शाखेसाठी इंग्रजी, हिंदी, अर्थशास्त्र, भूगोल तसेच मराठी या विषयासाठी विशेष मार्गदर्शन व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम वर्ष वाणिज्य वर्गासाठी अकाऊंट, बिझनेस मॅथेमेटिक्स, मार्केटिंग व अर्थशास्त्र या विषयांची व्याख्याने झाली. प्रथम वर्ष विज्ञान व संगणक विज्ञान या वर्षासाठी संगणक, मॅथेमेटिक्स, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व भौतिकशास्त्र या विषयासाठी विशेष व्याख्यानमाला पार पडली.

या वर्षीच्या विशेष व्याख्यानमालेतील सर्वच व्याख्याने अप्रतिम अशीच झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचा हा एक स्तुत्य उपक्रम आहे.

## विद्यार्थीनी व्यक्तिमत्त्व विकास योजना वार्षिक अहवाल २०१६-१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळास पाठविलेल्या प्रस्तावानूसार ३०/०८/२०१६ रोजी ही योजना महाविद्यालयात राबविण्यास परवानगी मिळाली. त्यानुसार महाविद्यालयातील विद्यार्थीनी व्यक्तिमत्त्व विकास सल्लागार समितीची बैठक होवून त्यात दि. २६/०२/२०१७ रोजी कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार रविवार दि. २६/०२/२०१७ महाविद्यालयात विद्यार्थीनी व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रमासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या जनसंपर्क अधिकारी व महिला हक्क कार्यकर्त्या श्रीमती निलिमा जाधव बंडूले या उद्घाटक म्हणून उपस्थित होत्या. या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टि.एम.वराट हे अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. दहातोंडे एस.बी. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्राध्यापिका पवळे बी.एस. यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमादरम्यान तीन व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम व्याख्यानासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या जनसंपर्क अधिकारी व महिला हक्क कार्यकर्त्या श्रीमती निलिमा जाधव बंडूले या उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थीनींना 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय व्याख्यान अहमदनगर न्यायालयातील ॲडव्होकेट अनिता दिघे यांनी 'महिलाविषयक कायदे' या विषयावर मार्गदर्शन केले. या व्याख्यानानंतर विद्यार्थीनींना अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाच्या तृतीय व्याख्यानासाठी प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विद्यालय सावेडी येथील ब्रम्हकुमारी उज्ज्वला दिदी या उपस्थित होत्या. त्यांनी 'महिला व अध्यात्म जीवन' या विषयावर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थीनी व महाविद्यालयातील प्राध्यापिका उपस्थित होत्या या कार्यक्रमासाठी सर्वांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ही योजना अतिशय प्रभावी असून या योजनेत विद्यार्थ्यांचा हि समावेश असावा असे वाटते.

## निर्भय कन्या अभियान कार्यशाळा वार्षिक अहवाल २०१६-१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळास पाठविलेल्या प्रस्तावानूसार २६/०६/२०१३ रोजी ही योजना महाविद्यालयात राबविण्यास परवानगी मिळाली. त्यानुसार दि.२८/१२/२०१६ ते ३०/१२/२०१६ या कालावधीत महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी या कार्यशाळेचे उद्घाटन अहमदनगर पोलिस अधिक्षक कार्यालयातील अहमदनगर शहर निर्भया पथकाच्या प्रमुख पी.एस.आय. पूजा बक्षी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट हे अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. दहातोंडे एस.बी. यांनी काग्रक्रमाचे प्रास्ताविक केले. या उद्घाटन कार्यक्रमात पी.एस.आय. पूजा बक्षी यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले व 'आजच्या काळातील समाजाची स्थिती व स्त्री सुरक्षेची आवश्यकता' या गोष्टींचा मागोवा घेतला. महिलांनी आजच्या काळात निर्भय बनण्यासाठी आवश्यक बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थीनी व महिला प्राध्यापिका वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

महाविद्यालायाच्या विद्यार्थी विकास विभागाने या कार्यक्रमासाठी कार्यशाळे दरम्यान विद्यार्थीनींसाठी निर्भय कन्या अभियानासाठी तीन दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या दरम्यान २८ डिसेंबर २०१६ रोजी आत्मभान, संवाद व नाती या मुद्यांवर पावरपॉईट प्रेझेंन्टेशन च्या माध्यमातून प्रा.प्रा. बी.एस. पवळे व प्रा. पी. एस. साबळे यांनी मार्गदर्शन केले. दि. २९ डिसेंबर २०१६ रोजी आत्मसन्मान, स्वसंरक्षण, निवड व निर्णय या मुद्यांवर प्रा. के.आर. ढोबे व प्रा. ए.एन. सांगळे यांनी मार्गदर्शन केले. दि. ३० डिसेंबर २०१६ रोजी मैत्री, मोह, प्रलोभन व पालकांसोबत संवाद या मुद्यांवर प्रा.ए.आर. पाऊलबुध्दे व प्रा.जी.एस. सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींना प्रबोधनाबरोबरच स्वसंरक्षणासाठी कराटे प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महिला कराटे प्रशिक्षक लाटे व कोतकर यांच्याद्वारे विविध स्वसंरक्षण तंत्रांचा प्रात्यक्षिकाद्वारे सराव करण्यात आला. विद्यार्थीनींचे आरोग्य हा महत्वाचा घटक असल्याने या कार्यशाळेत योगासनांचे प्रात्यक्षिक व सरावाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी लांडे प्राजक्ता हिने विविध आरोग्यदायी योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले. महाविद्यालय स्तरांवर एक दिवसासाठी राबविण्यात येणारी ही निर्भय कन्या अभियान कार्यशाळा या वर्षी महाविद्यालयाने प्रायोगिक तत्त्वावर तीन दिवस आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत भारतीय जैन संघटना वाघोली पुणे यांनी तयार केलेल्या निर्भय कन्या कार्यक्रमाचा अवलंब करण्यात आला होता. श्रीमती बांगर शितल मुख्याध्यापिका व प्राचार्या काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांचे यासाठी विशेष सहकार्य लाभले. या कार्यशाळेत पावरपॉईंट प्रेझेंटेशन, व्हिडियो व ऑडिओ या माध्यमाचा वापर करण्यात आला. विद्यार्थीनींना विविध प्रात्यक्षिके व सरावांच्या माध्यमातून संरक्षण व योगासने यांचेही प्रशिक्षण देण्यात आले. अशाप्रकारे ही कार्यशाळा अतिशय यशस्वी झाली. या कार्यशाळेला विद्यार्थीनींचा खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

**– प्रा. एस.बी. दहातोंडे**
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी

# बहि:शाल विभाग

जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे सन २०११ पासून आयोजन करण्यात येत आहे.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना विविध विषयाचे ज्ञान व्हावे. विद्यार्थ्यांची समाजात राहत असताना सामाजिक जाणिव जागृत व्हावी या उद्देशानेच महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयात व्याख्यानमालेअंतर्गत अनेक तज्ज्ञ प्राध्यपकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. के.के. देशमुख, प्रा.डॉ. अशोक शिंदे, प्रा.डॉ. अमरनाथ जगदाळे, प्रा.डॉ. सुधाकर शेलार प्रा. मधुकर कुलकर्णी, प्रा.डॉ. धोंडीराम वाडकर यांसारख्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ अंतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन दि. ११ जानेवारी ते १३ जानेवारी २०१७ रोजी करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचे उद्घाटन प्रा. डॉ. नवनाथ शिंदे (कोल्हार) यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.टी.एम.वराट हे उपस्थित होते. व प्रास्ताविक बहि:शाल केंद्र कार्यवाहक प्रा. डोंगरे अे.यु. यांनी केले. प्रथम पुष्प गुंफताना प्रा. डॉ. शिंदे यांनी ''वाचन एक संस्कृती'' या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय पुष्प या कार्यक्रमात प्रा. बाबा खरात (संगमनेर) यांनी गुंफले. त्यांनी विद्यार्थ्यांना 'मन करा रे प्रसन्न '' या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात शेवटचे पुष्प प्रा. गुंफा कोकाटे (बेलापूर) यांनी गुंफले. त्यांनी 'पोरी जरा जपून' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या व्याख्यानमालेस महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**– प्रा. डोंगरे अे.यु.**
बहि:शाल केंद्रप्रमुख

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

महाविद्यालयामध्ये आदरणीय प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहयोगी प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांची सुरुवात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये करण्यात आली. दि. १३/२/२०१७ रोजी केंद्राचे अधिकृतरित्या उद्घाटन मा. प्राध्यापक ए.बी. उगले, भूगोल विभाग प्रमुख, न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सद्यःस्थिती, स्पर्धा परीक्षा, पायाभूत अभ्यास, विविध क्षेत्रांतील सुसंधी, आत्मविश्वास, चिकाटी इत्यादीमार्फत ध्येयप्राप्ती कशी साधावी याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.

सध्या एकूण पंधरा विद्यार्थी येथे शिक्षण व प्रशिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या माध्यमातूनच त्यांना नैतिक मूल्ये, स्वयं शिस्त, व्यावहारिक ज्ञान, सकारात्मक दृष्टिकोन इ. रूजवणूक व शिकवण विद्यार्थ्यांना दिली जात आहे. मार्गदर्शन केंद्रामध्ये नियमित तासिकांचे आयोजन करून विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करून घेण्यात येत आहे. पारंपारिक अध्यापनाबरोबर आधुनिक पावर पॉईंट प्रेझेंटेशन, इंटरनेट, विविध क्लिष्ट संकल्पना समजावून सांगण्यासाठी व्हिडीओ क्लीप्सचा वापर केला जात आहे. स्पर्धा परीक्षांना आवश्यक असणारी पुस्तके, दैनिक वर्तमानपत्रे व इतर सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

यासाठी संस्था, महाविद्यालयीन प्रशासन, प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका सतत प्रयत्नशील असतात. श्री. शिवाजीराव साबळे (सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) यांनी आदरणीय मारूतरावजी घुले पाटील यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयास भेट देऊन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी रु. ५०००/- (पाच हजार) देणगी दिली. या देणगीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पुस्तकांची खरेदी करण्यात आली आहे.

आम्हा सर्वांना विश्वास आहे की, या माध्यमातून विद्यार्थी भविष्यामध्ये उत्तम, कुशल, कर्तबगार, जबाबदार प्रशासक, नागरिक तयार होतील.

**– सहा. प्रा. अमोल शंकरराव दरंदले**
भूगोल विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रमुख

# प्रसिद्धी विभाग

महाविद्यालयामध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांना या विभागामार्फत प्रसिध्दी दिली जाते. यामध्ये स्थानिक वर्तमानपत्रामध्ये फोटो, कार्यक्रमाचा घोषवारा, बातमी देण्यात येते. ज्या विभागाचा उपक्रम किंवा कार्यक्रम घेतला आहे. त्या विभागाकडून त्या उपक्रमाची सविस्तर प्रेस नोट तयार करून या विभागाकडे दिल्यानंतर विविध वर्तमानपत्रात दिली जाते. सदर कामकाजासाठी प्रा. डॉ. पिसाळ. के.आर., प्रा. दहातोंडे. एस.बी., श्री. दळवी. पी.व्ही. यांची मदत घेतली जाते. सदर बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर कात्रण फाईलला लावले जाते. अशा प्रकारे कात्रण फाईल महाविद्यालयाच्या स्थापनेपासून तयार करून ठेवलेली आहे. तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रम व कार्यक्रमांचे फोटो संग्रहित करून महाविद्यालयीन वार्षिक अंक 'क्षितिज' यामध्ये समाविष्ट करून उपक्रमाची माहिती दिली जाते. या विभागामुळे सर्व उपक्रमांना प्रसिद्दी दिली जाते व महाविद्यालयाचा इतिहास संग्रहित करून ठेवला जातो.

**– प्रा. मरकड एस.व्ही.**
प्रसिध्द विभाग प्रमुख

# ENVINONMENTAL AWARENESS PROGRAMME

Since 2004 Savitribai Phule Pune University has been decided to make compulsory " A course in Environmental Awareness" at the second year of undergraduate degree courses Viz-BA, Bcom, BSc, BSc computer etc. with the basic objectives that to create awareness, awakening among . The students about the planet Earth, human sustenance, human health etc. and so The college is also offering the course.

Today's society lays more emphasis on materialistic progress. It has neglected the environment which in fact, forms the very basis of human existence. The world has been facing issues like climate change, natural disasters, loss of bio diversity, ecological imbalances, will degradation, population explosion, malnutrition, diseases and much more. Therefore a paradigm shift is essential with practical applications of environmental awareness among students. Thus, it can be said that the quality of our adions determine the quality of The environment.

field visits etc.

In order to protect, save, enrich, sustain The environment efforts have been done by the college. The college organizes environmental awareness campaigns, tree plantation activities, environmental day celebrations, field visits etc. The College is also conducting lectures with using power point presentations, environmental documentaries, internet and so on, Besides, field works with project report have also undertaken by the students.

**Assist. Prof. Amol Shankarrao Darandale**
Head, Dept. of Geography

# महिला तक्रार निवारण समिती

महाविद्यालयाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २००९-१० ला झाली. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०११-१२ ला महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली. या समिती अंतर्गत मुलींच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्येवर उपाय करून त्यांना शिक्षणास प्रवृत्त केले जाते. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या दैनंदिन समस्या या समितीच्या अंतर्गत सोडविल्या जातात. यामध्ये विशेषतः महाविद्यालयात मुलींवर होणारी रॅगिंग, छेडछाड, मानसिक छळ तसेच मुलींच्या वैयक्तिक अडीअडचणी याची दखल महिला तक्रार समितीद्वारे घेतली जाते. महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण आनंदी व आल्हाददायक राहण्यासाठी ही समिती शिस्त कमिटीलाही मदत करते.

विद्यार्थीनींना निर्भयकन्या अंतर्गत सक्षम बनविण्यासाठी महाविद्यालयात आय.पी.एस. अधिकारी पूजा बक्षी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते. या कार्यक्रमास विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**महिला तक्रार निवारण समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. पाऊलबुध्दे ए.आर. | प्रमुख |
| २) | प्रा. सांगळे ए.एन. | सदस्य |
| ३) | प्रा. सोनवणे जी.एस. | सदस्य |
| ४) | प्रा. ढोबे के.आर. | सदस्य |
| ५) | कु. भालसिंग एम.एस. | विद्यार्थीनी सदस्य |
| ६) | कु. जवळकर डी.एस. | विद्यार्थीनी सदस्य |

# परीक्षा विभाग

महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा, अंतर्गत परीक्षा तसेच प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठाच्या नियमानुसार घेण्यात येतात. शै. वर्ष २००९ पासून महाविद्यालय सुरु झाले. या वर्षी प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गाच्या परीक्षा विद्यापीठामार्फत घेण्यात आली. शै.वर्ष २०१०-११ मध्ये प्रथम व द्वितीय वर्षाच्या कला, वाणिज्य व विज्ञान परीक्षा विद्यापीठामार्फत घेण्यात आली. शै. वर्ष २०११-१२ पासून प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या कला, वाणिज्य व विज्ञान व संगणक विज्ञान या वर्गांच्या परीक्षा विद्यापीठामार्फत घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेत महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा आहे. विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयातील एक प्राध्यापक परीक्षा अधिकारी म्हणून नियूक्त केला जातो. त्यानुसार शै. वर्ष २००९-१० ते शै. वर्ष २०११-२०१२ प्रा. मरकड एस.व्ही. यांनी काम पाहिले.

शै. वर्ष २०१२-१३ पासून प्रा.एस.बी. दहातोंडे हे परीक्षा अधिकारी म्हणून काम पाहतात. महाविद्यालयाच्या नूतन इमारतीत सुसज्ज असा परीक्षा विभाग तयार करण्यात आला असून त्यामध्ये झेरॉक्स, इंटरनेट आदी सुविधा आहेत. नवीन इमारतीत विद्यार्थी संख्येनुसार आसनव्यवस्था अतिशय सुसज्ज आहे. महाविद्यालयात विद्यापीठीय परीक्षा निकोप वातावरणात घेतल्या जातात. महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम आहे. शै. वर्ष २०१५-१६ पासून महाविद्यालयीन स्तरावर पदवीग्रहण समारंभ आयोजित केला जातो. यानुसार संस्थापातळीवर जिजामाता महाविद्यालय भेंडे येथे पदवीग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला. २०१५-१६ मध्ये महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांना पदवीग्रहण समारंभात पदवी प्रदान करण्यात आली. शै. वर्ष २०१६-१७ मध्ये ८ विद्यार्थांना पदवीग्रहण समारंभात मा. डॉ. क्षितिज नरेंद्र घुले पाटील यांचे शुभहस्ते पदवी प्रदान करण्यात आली.



# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२।।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।४।।
चलां कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणींचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडीत ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।८।।
येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।

# महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवकवृंद




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम.वराट यांचे समवेत कला शाखा व वाणिज्य शाखेतील प्राध्यापक वृंद




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांच्या समवेत शास्त्र शाखा व संगणक शास्त्र शाखेतील प्राध्यापक वृंद




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे समवेत कार्यालयीन सेवकवृंद

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- भव्य व सुसज्ज इमारत
- अनुभवी व उच्चशिक्षित प्राध्यापकवृंद
- समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका
- अद्ययावत स्वतंत्र प्रयोगशाळा कक्ष
- अद्ययावत संगणक कक्ष
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- प्रशस्त क्रीडांगण
- राष्ट्रीय सेवा योजना
- विद्यार्थी समुपदेशन केंद्र
- महिला तक्रार निवारण समिती
- बहि:शाल शिक्षण केंद्र
- विद्यार्थी विकास मंडळ
- डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना
- गुणवत्ता सुधार योजना
- विद्यार्थी विमा योजना
- विविध सांस्कृतिक उपक्रम
- विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सुविधा
- शैक्षणिक सहलींचे आयोजन
- अनुकूल व आनंददायी शैक्षणिक वातावरण

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहीगाव ने संचालित
**मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अहमदनगर**
श्री राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव रोड, अ.नगर
फोन : ०२४१-२७७९४९७, Email : mgpcollege@gmail.com / website : www.mgpcollege.com